मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

'विदर्भ-साहित्य-संघा'चें मुखपत्र

(१)



आजच्या अंकांत—

कै. श्री. कृ. कोल्हटकरकृत
'मायाविवाह' नाटक

युगवाणी

वार्षिक वर्गणी
पांच रुपये

*

या अंकाची किंमत
तीन रुपया

संपादक :
वामन नारायण देशपांडे

जून, जुलै, ऑगस्ट १९४६

अनुक्रमणिका

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी',
यवतमाळ [वऱ्हाड].

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

यु ग वा णी

वर्गणी, जाहिराती यासंबंधी पत्रव्यवहाराचा पत्ता—
प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी
एम्. ए.
सरचिटणीस,
वि. सा. संघ, अमरावती.

वर्ष १ लें
अंक ६, ७ व ८ वा

जून, जुलै, ऑगस्ट १९४६

वार्षिक वर्गणी रु. ५
किरकोळ अंकास .॥.

अनुक्रमणिका

पृष्ठ

'युगवाणी'चा पुढील अंक

छपाईच्या अनिवार अडचणींमुळे 'युगवाणी'च्या प्रसिद्धीचा सर्वच नियोजित कार्यक्रम ढासळला. प्रस्तुतचा तिजोड अंक १ आक्टोबर रोजीं प्रसिद्ध व्हावयाचा, तो १ नोवेंबर रोजीं होत आहे आणि **'दिवाळी अंक'** म्हणून जो दिवाळीच्या दिवसांत प्रसिद्ध करण्याचें योजिलें होतें, तो आता नोवेंबर अखेरीस (जेव्हा छापून होईल तेव्हा !) प्रसिद्ध होईल ! या अंकांत

महाविदर्भ, वाङ्मय व बोलपट क्षेत्रांत

हें अभिनव स्वरूपाचें सदर देण्यांत येत असून त्यांत विदर्भांतील नामवंत साहित्यिकांचे निरनिराळ्या वाङ्मयप्रकारांचें समालोचन करणारे लेख समाविष्ट करण्यांत आले आहेत.

मी कां लिहितों ?

या सदराखाली महाविदर्भांतील चार विख्यात लेखकांचे आत्मपर लेख याच अंकांत येणार आहेत. खेरीज औरंगाबादचे प्रसिद्ध कवि रा. वा. रा. कांत यांचें

'अग्निपथ' हें अभिनव स्वरूपाचें खंडकाव्य

या अंकांत प्रसिद्ध होईल, हें सर्व मुद्रादेवतेची कृपा झाल्यास !

युगवाणी

वर्ष १	संपादक	जून-जुलै-ऑगस्ट
अंक ६-७-८	वामन नारायण देशपांडे	१९४६

मायाविवाह नाटक

लेखक—कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

अंक पहिला

प्रवेश १ ला

[डॉक्टर पद्माकर व माधव.]

पद्माकर—माधव, आज ललितेचा अठरावा वाढदिवस. असें असतां आज सकाळपासून तूं तिच्याकडे फिरकला सुद्धा नाहीस! बारा वाजतां मीं बाबासाहेबांचें मृत्युपत्र उघडून वाचून दाखवीपर्यंत तिची मुळीच भेट न घेण्याचा तुझा निश्चय दिसतो!

माधव—पद्माकर, वाढदिवसाबद्दल तुझ्या पुतणीचें अभिनंदन करून तिच्या भावनाप्रधान चित्तावर थोडें सुद्धा अयोग्य दडपण घालणें मुळीच योग्य होणार नाही. आजपर्यंत तिच्या सान्निध्यांत बाहेर उचंबळून येणारे भाव मनांतल्या मनांत दाबून ठेवून मीं जें आत्मसंयमन आचरिलें, त्याचें श्रेय दोन तासांकरितां दवडून बसूं म्हणतोस? बाबासाहेबांनी मृत्युपत्राच्या पाकिटावर लिहून ठेवलेली आज्ञा विसरलास की काय?

पद्माकर—ललितेच्या अठराव्या वाढदिवसापर्यंत तिनें आणि तूं कोणाशींहि कायमचा संबंध घडवून आणायचा नाही, हीच ना? आणि तिच्या करितांच का तूं बाबासाहेबांच्या मरणापासून आजपर्यंत तिच्याशीं इतक्या तुटकपणें वागत आलास?

माधव—होय. आज तरी त्या आज्ञेचें अप्रत्यक्षपणें सुद्धा उल्लंघन होतां कामा नये!

पद्माकर—बाबारे, यांत अत्यंत प्रामाणिकपणा असेल. पण व्यवहारचातुर्य मात्र मुळीच नाही. सुंदर आणि श्रीमंत मुलीवर अनेक गिधाडांचे डोळे असायचे! ती त्यांच्या भक्ष्यस्थानीं पडूं नये, असें वाटत असेल, तर त्यांच्यापूर्वी तिच्या अंतःकरणावर जोराचा हल्ला करून तें हस्तगत करून घेतलें पाहिजे. तें रिकामें राहूं दिलें की कोणता चोर तें बळकावून त्याजवर सत्ता गाजवूं लागेल, याचा नेम नसतो! येथे 'हजीर तो वजीर' हाच न्याय लागू व्हायचा! ललितेच्या अल्प वयांत तूं तिला शिकवीत असतांना तिचें मन अंकित केलें नाहीस, हें ठीक झालें. पण आता तिचें शिक्षण पूर्ण झाल्यावर असें मागेमागे रेंगाळणें म्हणजे तुझ्या धाडसी प्रतिस्पर्ध्यांना तुझ्यावर मात करण्याचें आव्हानच देण्यासारखें नाही का?—असें रत्न संपादन करण्याकरितां एखाद्या प्रतिस्पर्ध्यानें कपटाचा आश्रय केला, तर मला त्यांत आश्चर्य वाटणार नाही!

माधव—तूं म्हणतोस, त्याप्रमाणें, मीं जर तिचें मन काबीज करण्याचा प्रयत्न केला असता, तर त्यानेहि बाबासाहेबांच्या आज्ञेचें उल्लंघन नसतें का झालें? प्रेमबद्धता ही वचनबद्धतेच्या आधीची पायरीच नाही का?

पद्माकर—बाबासाहेबांच्या आज्ञेवरून सुद्धा तुमचें उभयतांचें लग्न व्हावें, अशीच त्यांची इच्छा दिसते. तेव्हा तूं ललितेचें प्रेम आकर्षून घेतलें असतेंस, तरी तुजकडून त्यांच्या आज्ञेचा भंग न होतां तिचें पालनच झालें असतें!

माधव—माझा आणि ललितेचा विवाह होऊं नये, असाहि त्या आज्ञेचा अर्थ होऊं शकेल!

पद्माकर—वेड्या, ज्यावेळीं ललितेच्या मनाला धीर व आनंद देण्याची विशेष जरूर, त्याच वेळीं तूं असें बेफिकीरपणाचें वर्तन केलेंस, हें एकंदरीने चांगलें झालें नाही!

माधव—मीं तिचें प्रेम आकर्षिलें असतें, तरीहि एखाद्या स्वार्थसाधूने त्यांत विश्वा घातलाच नसता, याचा कोणी नेम सांगावा? (पद्माकर सुस्कारा सोडतो.) पद्माकर, तुझ्या हृदयावर मीं केवळ नकळत हा आघात केला, आणि त्याची, बुजत चाललेल्या जखमेची, पुन्हा खपली काढली!

पद्माकर—पद्मेचें आणि माझें एकमेकांवर इतकें गाढ प्रेम बसलें होतें की, तें कलुषित होण्याचें कारण, मीं कितीहि विचार केला, तरी लक्ष्यांत येत नाही. त्या नीच रंगनाथाने खात्रीने तिजवर मोहिनीमंत्राचा प्रयोग केला असला पाहिजे! पण आजच्या मंगलप्रसंगीं माझ्या मृत प्रेमाचा विचारच कशाला पाहिजे? माधव, तुझा आणि ललितेचा विवाह होऊन तुम्हांला सुखाचें आयुष्य प्राप्त व्हावें, अशी आमरण अविवाहित राहण्याचा संकल्प केलेला तुझा स्नेही सदिच्छा प्रकट करीत आहे!

माधव—ललितेची प्राप्ति होण्याइतकें माझें भाग्य असलें तरी तुझ्या सुखांत कमतरता आहे तोंपर्यंत माझेंहि सुख अपूर्णच राहणार!

पद्माकर—तुझ्या सुखापासून मला सुख झालें नाही, तर तुझा स्नेही म्हणवून घेण्याची माझी योग्यताच नाही, असें मी समजेन!

माधव—मला तरी पूर्ण सुख मिळेल असें तुला वाटतें? काय असेल तें असो, पण बारा वाजण्याची वेळ जवळ येऊं लागली आहे, तों तों माझ्याहि देवाच्या घड्याळाच्या काट्यांचा अधःपात होणार की काय, अशी शंका मनांत उद्भवूं लागली आहे!

पद्माकर—(खिशांतील घड्याळ काढून) अरे, साडेदहा वाजलेच की! स्नान जेवण करून तयार होण्याला दीड तासाचा अवधि फार नाही. कृष्णा, अरे कृष्णा, [कृष्णा प्रवेश करतो.] मला आज एका महत्त्वाच्या कामाकरितां जायचें आहे. परत यायला जरा उशीर होईल. माझ्या मागे दवाखाना नीट सांभाळशील ना?

कृष्णा—मी आपल्याकडून होईल तितकें करतोंच.

पद्माकर—तूं करशील हवें तितकें. पण तुझें चित्त ठिकाणावर पाहिजे ना? नवीन लग्न झालें म्हणून बायकोचें इतकें कांही वेड नको लागायला! तूंच एकट्याने बायको करून आणिली आहेस, असें थोडेंच आहे? परवा त्या घेलाभाईला पाचक चूर्ण द्यायचें होतें. त्याला स्वतःची तपकीरच दिलीस, आणि डोक्याला लावायला मलम तयार केलें होतें, तें लेह म्हणून चाटायला दिलेंस! तसें नको. आज प्रत्येक रोग्याला शुद्धोदकाचे टक दे म्हणजे झालें!

प्रवेश २ रा

[ललिता व रंगनाथ]

ललिता—कोण आहे तें?

रंगनाथ—मी आहें रंगनाथ.

ललिता:--कोण?-आपण? मला किती तरी आनंद झाला म्हणून सांगूं? आपण माझी संकटांतून मुक्तता केली, तेव्हा मी आपल्या उपकाराची फेड कशी करूं, असें विचारलें असतां त्याचें उत्तर प्रत्यक्ष भेटींतच देण्याचें आपण कबूल केलें. तेव्हापासून मी सारखी आपल्या वाटेकडे डोळे लावून बसलें होतें. दिवसांमागून दिवस जाऊं लागले, तरी आपण येण्याचें लक्षण दिसे ना! तेव्हा मग मला धीर निघेना. काकांपासून आपलें नांव आणि पत्ता काढून आपणाला एक पत्र पाठविलें. आपणांकडून त्याचें उत्तर आलें नाही, तेव्हा आपल्या प्रकृतीबद्दल चिंता वाटूं लागली, आणि मीं पुन्हा लागोपाठ दोन पत्रें

पाठविली. पण त्यांचीहि तीच वाट लागली! माझ्या संकटांची आणि सुटकेची हकीकत कोणाच्याहि कानांवर न घालण्याची आपण मला शपथ घातल्यामुळे मनांतल्या मनांत काळजी करण्याशिवाय मला गत्यंतर उरलें नाही!

रंगनाथ—काळजी करण्यासारखीच माझी प्रकृति झाली होती. मीं तुला त्या दुष्टांच्या तावडींतून सोडविलें खरें, पण त्यांनी पळून जातां जातां मला सुऱ्यांनी जे निसटते वार केले, ते त्या वेळीं जरी फार जाणवले नाहीत, तरी त्यांमुळे मागाहून अतोनात रक्तस्राव होऊन मला भयंकर ग्लानि आली, सडकून ताप भरला, आणि माझी शुद्ध गेली! जीवन आणि मरण यांच्यामधील संधिकालांत मी किती तरी दिवस पडून राहिलों होतों!

ललिता—हें जिवावरचें दुखणें केवळ माझ्याकरितांच आपणाला काढावें लागलें!

रंगनाथ—माझ्या यातनांत तेंच काय तें मला एक मोठें समाधान होतें! आणि, तें होतें, म्हणूनच मी माझ्या जिवावरच्या दुखण्यांतून उठलों तरी! तुझीं सारीं पत्रें मला मिळालीं आणि मला बरें वाटण्याला त्यांचें बरेंच साहाय्य झालें. त्यांचीं उत्तरें देण्याइतकी शक्तीच माझ्या अंगीं नव्हती. जरा शक्ति येतांच तुझी भेट घेणार होतों. पण मनांत असा एक प्रश्न उद्भवला की, त्यामुळे तुझी भेट घेण्याचा माझा सारा उत्साहच मावळून गेला!

ललिता—असा कोणता बिकट प्रश्न पडला आपणांला?

रंगनाथ--संकटांत मी तुझ्या उपयोगी पडलों, म्हणून तूं माझे उपकार फेडण्याची मनीषा दर्शविलीस; पण त्या संकटाची जबाबदारी जर मजवरच येत असेल, तर त्यांतून सोडविण्याबद्दल कृतज्ञता वाटण्याचें कारण नाही. आणि, तुझी कृतज्ञताच जर निराधार असेल, तर मीं तुजवर केलेल्या उपकारांचें बक्षीस तरी कोणत्या तोंडाने मागणार?

ललिता--त्या संकटाची जबाबदारी आपणांवर येते म्हणतां? आणि, ती कशी?

रंगनाथ—संकट कसें आलें, याचा नीट विचार केलास, तर तें तुझ्या नीट लक्षांत येईल. आम्हां कलाभवनाच्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक संमेलनप्रसंगीं आम्ही जो नाटकप्रयोग करून दाखविला, तो पाहण्याकरितां तूं, तुझा चुलता पद्माकर आणि माधव यांना सपरिवार येण्याबद्दल आम्ही आग्रहाच्या निमंत्रणपत्रिका पाठविल्या होत्या. आणि त्यांना मान देऊन तुम्ही आलांतहि. नाटक मीं स्वतःच लिहिलें असून त्यांतील पदांच्या चालीहि स्वतःच बसविल्या होत्या. नाटकाच्या तालमी मींच घेतल्या असून पडदे, देखावे, किंबहुना कपडेहि, मीं स्वतःच तयार केले होते. सारांश, तो प्रयोग म्हणजे मीं संपादिलेल्या कवित्व-गायन-चित्रादि कलांचें एक प्रदर्शनच होतें!

ललिता--आणि, त्या प्रदर्शनाचा आत्मा आपल्या रूपाने रंगभूमीवर संचार करीत होता, असें म्हटल्यास मुळीच अतिशयोक्ति होणार नाही. आपलें नाटक, गायन, अभिनय भाषण-सारेंच कांही अप्रतिम होतें. प्रयोग चालू असतां माझा वेळ जितक्या आनंदांत गेला, तितका आनंद ब्रह्मांच्या मागे माझ्या वाट्याला कधीच आला नव्हता!

रंगनाथ—तुझें अनुकूल मत त्याच वेळीं तुझ्या आश्चर्योन्नत भृकुटीवरून, कुतूहलपूर्ण नेत्रांवरून, मान्यतादर्शक स्मितावरून आणि प्रफुल्लित मुद्रेवरून मला कळून चुकलें! किंबहुना, माझ्या नाट्याची आणि गायनाची शिकस्त करण्याला मला प्रेक्षकांच्या टाळ्यांपासून प्रेरणा न मिळतां तुझ्या मूकमान्यतेपासूनच मिळत गेली! आणि, अंतरावरून मिळणारी तुझी मुकी पसंती विश्रब्धालापांतील निघालेल्या उद्गारांच्या रूपाने माझ्या कानांवर केव्हा पडेल, याची मला तळमळ वाटूं लागली! त्या अनुभवाने मला एक मोठें तत्त्व शिकविलें.

ललिता—तें कोणतें?

रंगनाथ—प्रत्येक कलेचें जनन व पोषण सौंदर्यापासूनच होत असतें; आणि त्याच्या आश्रयाने ती उत्कर्षाचें अत्युच्च शिखर गाठूं शकते. उलट त्याचा आधार नसेल, तर तिच्या वाट्याला

क्षणभंगुर व खुरटलेलें आयुष्य येत असतें, हें तत्त्व मला शिकविणाऱ्या माझ्या पाहुणीची, प्रयोगानंतर लागलीच, गाठ घेऊन व तिचे आभार मानून तिला सुरक्षितपणें घरीं पोचविण्याची तजवीज करणें माझें कर्तव्य होतें. त्यांत मी चुकल्यामुळे तिची दिशाभूल झाली!

ललिता—माझी दिशाभूल झाली नाही. माझी मुद्दामच फसगत करण्यांत आली! मी आणि राधाबाई नाटकगृहाच्या बाहेर पडण्याच्या बेतांत होतों, इतक्यांत डॉक्टरसाहेब आणि आप्पासाहेब तुमची वाट पाहत उभे आहेत, त्यांनी तुम्हांला तावडतोब बोलाविलें आहे, असें एकाने येऊन मला सांगितलें. राधाबाईला "हं, चला माझ्या पाठोपाठ"-असें म्हणून मी त्यांच्या मागे जाऊं लागलें. राधाबाई कृष्णरावांशीं बोलण्यांत गढून गेल्या होत्या, म्हणून माझ्याबरोबर न येतां मागेंच रेंगाळत राहिल्या. मी एकटीच त्या माणसाबरोबर निघालें, ती थोडयाच वेळांत एका ओसाड आणि काळोख्या बोळांत येऊन पोचलें. इतक्यांत ते दुष्ट अचानक तेथे आले. आणि, माझ्या तोंडांत बोळा कोंबून व माझे डोळे रुमालाने घट्ट बांधून ते तेथून मला घेऊन जाऊं लागले! इतक्यांत आपण तेथे आलांत. मी आपणाला नुसत्या आवाजाने ओळखिलें.

रंगनाथ—मला मात्र तुझी ओळख पटण्यापूर्वी तुझें नांव विचारावें लागलें. तुझ्या संकटाला कारण झाल्याबद्दल दिलगिरी दाखविण्याला मात्र मला मुळीच सवड मिळाली नाही. कारण ती दाखविण्यास मी ओठ उघडण्यापूर्वी तूंच माझ्या उपकाराबद्दल आभार प्रदर्शित करून ऋण कसें फेडायचें, असा प्रश्न केलास; आणि त्या प्रश्नाचें उत्तर देण्याकरितां तुझी पुन्हा गाठ घेण्याचें कबूल करून घडलेला प्रकार कोणासहि न सांगण्याचें मी तुला बजावतों न बजावतों, तोंच पद्माकर आणि माधव तुझा शोध करीत आले; आणि म्हणून मला तेथून निघून जावें लागलें.

ललिता—आपण मला निमंत्रण पाठविलें आणि सुरक्षितपणें पोचविण्याची हयगय केली, म्हणून का आपण माझ्या संकटाची जबाबदारी आपणावर ओढून घेतां? भारीच बाई आपला हळवा स्वभाव!

रंगनाथ—नाही, त्याला आणखीहि एक कारण आहे : त्या बेरडांना तुझें हरण करून नेण्याची कल्पना माझ्या नाटकावरूनच सुचली असली पाहिजे, अशी मला जबरदस्त शंका येते! माझ्या रंगभूमीच्या संसारांत प्रतिनायकाने नायिकेवर जो प्रसंग आणिला, त्याचीच नक्कल त्यांनी संसाराच्या रंगभूमीवर करून दाखविली! ते त्या प्रयोगाच्या प्रेक्षकांपैकी किंवा नटांपैकीहि असण्याचा संभव आहे. माझी घरीं जाण्याची वाट तीच होती, म्हणून बरें झालें. मी जर त्या वेळीं त्याच नाटकांतल्या नायकाप्रमाणे अचानक येऊन सोडविलें नसतें, तर माझें मन मला जन्मभर खात राहिलें असतें!

ललिता—आपण आपल्या उपकाराचें महत्त्व कमी करण्याचा जों जों प्रयत्न करितां, तों तों माझी कृतज्ञता दुणावत आहे! आपण जर ऐन वेळीं येऊन माझें रक्षण केलें नसतें, तर त्या मेल्यांनी माझे दागिने तर लांबविलेच असते, पण मी बोभाटा करीन या भीतीने माझ्या प्राणांचा घात करण्यालाहि मागे पुढे पाहिलें नसतें!

रंगनाथ—तुझ्या दागिन्यांवर त्यांचा डोळा होता, असेंच का तुला अजून वाटतें? ललिते, तूं खरोखरीच अगदी अननुभवी आणि भाबडी आहेस!

ललिता—माझ्या अंगावर दागिन्यांशिवाय दुसरा कोणता मोलवान जिन्नस त्या वेळीं होता?

रंगनाथ—या तुझ्या अज्ञानाचा उगम तुझ्या अकृत्रिम विनयांतच आहे! ललिते, तुझें कौमार्य आणि सौंदर्य यांचें मोल तुझ्या दागिन्यांच्या कोटि पटीने अधिक नाही काय! माझ्या नाटकांतील नायिकेचें शील हरण करण्याचा प्रतिनायकाचा जसा डाव होता, तसाच त्या हरामखोरांचाहि होता!

ललिता—अगबाई! खरेंच की काय? मग आपण माझ्या प्राणांचेंच केवळ नव्हे, तर

कौमार्याचेहि रक्षणकर्ते आहांत तर! आपल्या डोंगराएवढ्या उपकारांच्या भाराखाली माझें मन अगदी चिरडून जाण्याच्या बेताला आलें आहे! बोला, बोला लवकर, मी त्या उपकारांतून कशी मोकळी होऊं तें!

रंगनाथ—सौंदर्य हेंच माझें जीवन असल्याची मला त्या रात्रीं जी जाणीव झाली, तिचा त्याच रात्रीं लागोपाठ घडून आलेल्या प्रकारांशीं मेळ घातलास, म्हणजे विधिसंकेता-बरोबर याचनेचें स्वरूपहि तुझ्या लक्ष्यांत सहज येण्यासारखें आहे.

ललिता—आपणाला सौंदर्याची इतकी आवड असेल, तर माधवपाशीं जो एक सुंदर आणि मोठा चित्रसंग्रह आहे, तो मी आपणाला त्याच्याकडून देववीन.

रंगनाथ—माझ्या द्वेष्टयाचा चित्रसंग्रह मी घेऊं म्हणतेस? अशक्य!

ललिता—द्वेष्टयाचा?

रंगनाथ—होय, ती एक मोठी कथाच आहे. पण ती थोडक्यांत सांगतों. माझ्या एका दूरच्या बहिणीला पद्माकर एकदा आपल्या प्रेम-पाशांत अडकवूं पाहत होता. तिच्या पालकांना पसंत नसल्यामुळे मी त्यांत 'खो' घातला. हेंच काय तें द्वेषाचें कारण! आणि, जो पद्माकराचा वैरी, तो माधवाचाहि असायचाच! याशिवाय त्याचा आणि माझा हेवादावा असण्याचें कांही कारण नाही. मी, पद्माकर आणि माधव एकाच वर्गांत होतों: त्यांनी विद्याध्ययन करून द्रव्य-संपादनाचा मार्ग स्वीकारिला. माझा प्रथमपासूनच कलेकडे ओढा असल्यामुळे मी परीक्षांच्या शर्य-तींत त्यांच्या मागे पडलों! विद्येबरोबर येणाऱ्या संपत्तीलाहि मी अर्थात्‌च पारखा झालों आहें! तरी मला त्याचा खेद नाही. तुझा चुलता वैद्यकींत हजारो रुपये मिळवीत असला आणि तुझ्या वडिलां-च्या वकिलीची सारी गिऱ्हाइकी माधवाकडे जाऊन तिच्या आधाराने तो जरी फावडयाने रुपये ओढीत असला, तरी मला त्यांचा मत्सर नाही!

ललिता—अस्सें! आपणांत इतकें वैर होतें, म्हणूनच-वाटतें—आपण मला त्या दिवशीं घडलेला प्रकार गुप्त ठेवायला सांगितलें होतें! बरें आहे. आपणाला माधवाचा उपकार नको असेल, तर माझा आग्रह नाही. मी आपणांला बाबांच्या मृत्युपत्राच्या वाचनाचा जो दिवस पत्रां-तून कळविला होता, तो आजचाच आहे. आज मला आपण मागाल तें द्रव्य देऊन आपली उतराई होतां येईल.

रंगनाथ—तूं कळविलेल्या दिवशींच, पण मृत्युपत्राच्या वाचनापूर्वी मी तुझी मुद्दाम भेट घेतली आहे.

ललिता—मी नाही समजलें!

रंगनाथ—माझी याचना द्रव्यनिरपेक्ष आहे, हें सिद्ध करण्याकरितांच मी तुला आधी भेटलों. तुला मृत्युपत्राने एक कपर्दिका जरी मिळाली नाही, तरी माझी निराशा होणार नाही!

ललिता—बाबांच्या एकुलत्या एक मुलीला कांही एक मिळणार नाही, असें व्हायचेंच नाही मुळी! पण तें कसेंहि असलें, तरी आपल्या मागण्याचा द्रव्याशीं कांही संबंध नाही, याचा अर्थच मला कळत नाही! आपणांस पाहिजे आहे तरी काय?

रंगनाथ—अगदी अकल्पित अशी मागणी ऐकायला तूं मनाचा धडा केला पाहिजेस. तिने कदाचित् तुझ्या मनाला धक्काहि बसेल.

ललिता—बोला, माझी तयारी आहे. आपली इच्छा पूर्ण करणें कितीहि कठीण असलें, तरी मी हार खाणार नाही!

रंगनाथ—मलाहि तुझ्या भोळेपणामुळे स्पष्ट बोलण्याशिवाय दुसरा मार्गच मोकळा राहिला नाही! ललिते, मी स्पष्ट बोलतों, पण शेत राखणारें कुंपण स्वतःच शेत खाऊं लागलें, असा आरोप मात्र मजवर करूं नकोस!

ललिता—तो आरोप आपणांवर कसा येणार?

रंगनाथ—का बरें? ज्या वस्तूचें मी रक्षण केलें, तिचीच जर मी भिक्षा मागूं लागलों, तर तो आरोप मजवर आल्यावाचून कसा राहील?

ललिता—कोणती ती वस्तु?

रंगनाथ—तुझें कौमार्य !

ललिता—(दचकून) काय, आपण माझ्याशीं लग्न करणार ? (सचिंत उभी राहते.)

रंगनाथ—माझ्या मागणीने तुझ्या मनाला खरोखरच धक्का बसल्यासारखा दिसतो !

ललिता—तसें नाही. आपणाप्रमाणेच माझा दुसराहि उपकारकर्ता आहे. त्याच्याहि ऋणांतून मला मुक्त झालें पाहिजे !

रंगनाथ—तुझें त्याजवर प्रेम आहे काय ?

ललिता—असेलसें वाटत नाही. त्याजबद्दल पराकाष्ठेचा आदर मात्र वाटतो ! त्याने मला बाळपणापासून धर्माचें व नीतीचें शिक्षण दिलें आणि विद्यासंपन्नहि केलें.

रंगनाथ—त्याला तूं धर्मगुरूसारखा आणि विद्यागुरूसारखा मान देणें योग्य होईल ! गुरुदक्षिणा म्हणून तूं त्याला आपली संपत्ति अर्पण करणेंहि वावगें होणार नाही ! सरस्वतीचा योग्य मोबदला लक्ष्मी हीच होय ! उलटपक्षीं, तूं आपलें कौमार्य त्याच्या रक्षणकर्त्यालाच वाहणें उचित होईल ! तूं त्या दुसऱ्या उपकारकर्त्याला आपलें शरीर अर्पण केलें नाहीस, तर त्याची विशेष निराशा होणार नाही. त्याचें प्रेम दुसरीवर बसलें असल्यास तुझ्याशीं विवाहबद्ध होणेंहि त्याच्यावर एक मोठी आपत्तीच कोसळल्यासारखें होईल ! उलटपक्षीं, कला ही माझा आत्मा आणि सौंदर्य हें कलेचा आत्मा असल्यामुळे तुझें सौंदर्य दुरावल्यावर माझें कलाजीवन, किंबहुना माझी जीवनकलाच नष्ट होईल ! खरें सांग : तुझा दुसरा उपकारकर्ता माधव ना ?

ललिता—होय.

रंगनाथ—त्याने तुझ्या वडिलांच्या मृत्यूपासून तुझ्याशीं फार तुटकपणाचें वर्तन ठेविलें आहे, असें मी ऐकतों. तें तूंहि पाहिलें असशीलच !

ललिता—तें मीं पाहिलेंहि आहे, आणि मला तें विलक्षण वाटलेंहि आहे !

रंगनाथ—त्यांत विलक्षण तें काय आहे ! तुझ्या वडिलांचीं सारीं कुळें त्याच्याकडे गेल्यावर पैशाच्या दृष्टीने त्याची चांगली चलती सुरू झाली आहे. शिवाय, बाबासाहेबांच्या मृत्युपत्रांत त्यांची बरीच जिंदगी त्याजकडे जाण्याचा संभव आहे. आता राहिला बायकोचा प्रश्न ! त्याचें अजून दुसरीवर प्रेम बसलें नसेल कदाचित्. पण त्याला तुझें महत्त्व द्रव्यप्राप्तीच्या इतकें वाटत नाही, याबद्दल मात्र शंका नको ! बाबासाहेबांनी माधवाला तुझ्याशीं लग्न करण्याच्या अटीवर द्रव्य दिलें असेल, तर मात्र गोष्ट निराळी !

ललिता—मी मोठ्या संकटांत पडल्यासारखी झालें आहें !

रंगनाथ:—तुझी संकटांतून सुटका करणारा रंगनाथ तुला संकटांत कधीच टाकणार नाही ! ललिते, मी या संकटांतून सुद्धा तुझी आनंदाने मुक्तता करतों. तूं वाटेल त्याच्याशीं लग्न करण्याला मोकळी आहेस ! तूं अडाणी व धर्मभोळी असतीस, तर आपल्या वचनभंगाबद्दल घोर नरकवास भोगावा लागेल, अशी भीति तुला वाटली असती. पण तूं चांगली शिकली-सवरलेली आणि समंजस आहेस, तेव्हा तुला त्या बागुलबुवाचें भय वाटण्याचें कारण नाही ! तुझी मला प्राप्ति झाली नाही, तर एका कलावंताचा त्याच्या कलेसह समूळ नाश होईल ! पण तुझ्यासारख्या श्रीमंत विदुषीला त्याचीहि खंत वाटण्याचें कारण नाही !

ललिता—नका, नका, असें बोलून माझ्या हळव्या चित्तावर डागण्या देऊं नका ! माझ्या वडिलांनी माझ्यावर आणि माधवावर असा एक कडक निर्बंध घातला आहे की, त्यांच्या मृत्युपत्राचें वाचन होण्यापूर्वी आम्ही दुसऱ्याशीं कोणतेंहि कायमचें बंधन उत्पन्न करूं नये. मी आपणांस कोणत्याहि प्रकारचें आश्वासन दिलें, तर तो निर्बंध मोडल्यासारखें नाही का होणार ? शिवाय, बाबांनी मृत्युपत्रांत लग्नाची अट घातली आहे की नाही, हें नको का पाहायला ?—आपणच सांगा. बाकी, मी कृतघ्न ठरणार नाही, याबद्दल आपली खात्री असूं द्यावी !

रंगनाथ—तुझें म्हणणें रास्त आहे, हें मीहि कबूल करितों. मी आतापर्यंत त्या मृत्युपत्रा-

बद्दल बेफिकीर होतों! पण तुझ्या बोलण्यावरून त्याचा माझ्या भावी सुखाशीं फारच निकटचा संबंध दिसतो! त्याचें वाचन चालू असतां मला त्यांतला प्रत्येक शब्द ऐकूं यावा, अशा सोईची एखादी खोली या घरांत मला मिळूं शकेल का?

ललिता—या दिवाणखान्याला लागूनच माझी अभ्यासाची खोली आहे. तिच्या दाराच्या फटींतून, किंवा कुलपाच्या छिद्रांतून, आपणांला सारें कांही ऐकूं येईल. त्या खोलींत आजपर्यंत माझ्या निकटच्या आप्ताशिवाय कुणाहि पुरुषाचा प्रवेश झाला नाही. पण त्याच कारणाकरितां आपलाहि तेथे प्रवेश होणें योग्य होणार नाही!

रंगनाथ—दुसरी कोणचीहि जागा नाही म्हणतेस. पण अधिक बोलायला सवडच नाही! कारण, ते पहा, पद्माकर आणि माधव इकडेच येत आहेत. आणि, मला त्यांच्या दृष्टीस पडायचें नसेल, तर त्या खोलीचा आश्रय करण्यावाचून गत्यंतरच नाही! [रंगनाथ खोलींत जाऊन दार लावून घेतो. पद्माकर व माधव प्रवेश करितात.]

ललिता—काका, आप्पासाहेब, अगदी वेळेवर आलांत.

पद्माकर—ललिते, माधवाला 'आप्पासाहेब' म्हणून त्यांचा बहुमान करण्याचा तुझा उद्देश असेल. पण अशा उपचारांनी त्याला आनंद वाटण्याऐवजी दुःख मात्र वाटेल, हें जाणण्याइतका तुला त्याचा परिचय असला पाहिजे!

ललिता—माझें भाषण जर औपचारिक, तर तुमच्या वर्तनाला काय म्हणायचें? आज माझा वाढदिवस. आज तुम्ही उभयतां मला भेटायला याल, म्हणून मी वेडीसारखी सकाळपासून वाट पाहत होतें. पण तुम्हांला भेटीकरितां आता फुरसद मिळते आहे! होय ना?–आणि, ती फुरसद सुद्धा बाबांचें मृत्युपत्र वाचायचें होतें, म्हणून तुम्हांला काढावी लागली! काका, तुमची दोघांची या पोरक्या मुलीवर मोठी मेहेरबानी झाली, बरें का!

पद्माकर—ललिते, माझ्याविषयी विचारशील, तर आज माझा दवाखाना म्हणजे मत्यूचा मूर्तिमंत दरबारच बनून गेला होता! त्या दरबारांत पडसें, अजीर्ण यांसारख्या क्षुल्लक मानकऱ्यांपासून क्षय, पंडुरोग, जलोदर यांसारखे बडे अमीर-उमराव मानवी शरीरें धारण करून हजर झाले होते! त्यांची निगा राखतां राखतां नाकीं नव आले! एकाला मलमपट्टी लाव, दुसऱ्याचा कान धू, तिसऱ्याचा दांत उपट, चवथ्याला गुळण्या दे—असे उपाय करितां करितां मी स्वतःच रोगी बनायच्या बेताला आलों!

ललिता—खरोखर, काका, तुझा धंदा इतका त्रासदायक आणि दुःखमय आहे की, मला तुझी दया येते! अष्टौप्रहर दुःख, यातना, शोक यांच्याशींच प्रसंग! रोग्याकडून रात्रीं बेरात्रीं केव्हा बोलावणें येईल, याचा नेम नाही! जगांतील सारे प्राणी दुःखीकष्टी आहेत, असें वाटून मन निराशावादी बनून जायचें!

पद्माकर—बरें, मला मदतनीस तरी चांगला दक्ष पाहिजे होता. तेंहि नाही! कृष्णाचें लग्न झाल्यापासून त्याचा मला काडीचाहि उपयोग होत नाही! सारखा आपला बायकोच्या चिंतनांत निमग्न असतो!

ललिता—दवाखान्यांत टिकून राहतो, हेंच नवल! आमच्या राधेकडे त्याच्या कोणत्या ना कोणत्या तरी निमित्ताने सारख्या येरझारा चालल्या असतात! आणि, आला म्हणजे सारखा स्वयंपाकघरांत घोटाळायचा! नवऱ्याशीं बोलण्याच्या नादांत तिचें तरी सैपाकाकडे लक्ष्य असतें कुठे? परवा तिने आमटीचा मसाला चहांत आणि चहाची पूड आमटींत टाकिली!

पद्माकर—कृष्णाचें तरी काय, अलीकडे असेच धांदरटपणाचे प्रकार चालू आहेत! परवा त्याने लेकराच्या आकडीवरचें औषध म्हाताऱ्याला दिलें; आणि, म्हाताऱ्याच्या संधिवातावरचें औषध लेकराला दिलें! काल तर एका पुरुषाच्या मिशीला लागलेल्या चाईवर लावायचें मलम एका बाईच्या दुखऱ्या कपाळावर फासलें, आणि सुलभ प्रसूतीचें औषध एका पुरुषाला पाजलें! आणि, चमत्कार हा की, त्या सर्वांना गुणहि आला!!

ललिता—पुष्कळदा औषधापेक्षा हाताला आणि वैद्याच्या ज्ञानापेक्षा रोग्याच्या भावालाच

गुण येतो. बरें, काका, तुला यायला का उशीर झाला, त्याचें कारण कळलें. पण वकीलसाहेबांना उशीर होण्याचें कारण नाही कळलें ! त्यांचें वकील-पत्र घेऊन कांही बोलायचें नाही का ? त्यांच्या कार्यालयांतहि भांडखोर, कज्जेदलाल अशिलांची अगदी गर्दी झाली असेल, नाही ? वैद्याला जसा रोग्याशींच नेहमी प्रसंग यायचा, तसा वकिलाला तंटेखोरांशींच यायचा ! आणि, वैद्याला जसें जगांत औषधालाहि आरोग्य दिसत नाही, त्या-प्रमाणे वकिलाला सालसपणा दिसत नाही ! तुझा दवाखाना आणि यांचें कार्यालय शरीर-मनाप्रमाणे अगदी लागूनच असल्यामुळे रोगी-अशिलांची मोठीच सोय झाली आहे म्हणायची !

पद्माकर—माधवाचें कारण अगदीच निराळें आहे : तो किती हळव्या आणि संकोची वृत्तीचा आहे, तुला माहीत आहे ना ? त्याला वाटलें की, तुझें वाढदिवसाबद्दल अभिनंदन करायला तो येथे आला, आणि त्याने तुला एखादी भेट नजर केली, तर त्या गोष्टीचा आज वाचावयाच्या मृत्युपत्राशींच संबंध जोडला जायचा ! खरेंच की ! आजचें मुख्य काम बाजूला राहून नमनालाच घडाभर तेल खर्च झालें ! हं, माधव, ललिते, अशीं माझ्यासमोर बसा, आणि मी हें मोहोरबंद पाकीट तुमच्या देखत फोडून मृत्युपत्र वाचून दाखवतों, तें लक्ष्यपूर्वक ऐका. (खिशांतून पाकीट काढून फोडतो व आंतून कागद काढून त्याची घडी उलगडतो.) अगदीच थोडा मजकूर आहे की ! पण या थोड्या ओळींचा तुमच्या भावी आयुष्यावर मोठाच परिणाम होणार आहे, तेव्हा त्याचें महत्त्व कमी नाही. तुम्ही मजकूर ऐकायला उतावळे झालां असाल, म्हणून प्रास्ताविक भाग वाचीत नाही. ऐका, "माझी लाडकी ललिता साधीभोळी, निष्कपट व निष्पाप असून ती तशीच राहावी, म्हणून, मी तिला आजपर्यंत धूर्त, कपटी व पापी जगापासून शक्य तितकी अलिप्त ठेवण्याची खबर-दारी घेतली. तसेंच, तिच्या नाजूक मनाला दुःखाचा वाराहि लागूं नये, म्हणून, हरएक प्रकारें जपलों. तिनें यापुढेहि नेहमी सुखांत राहावें, अशी माझी इच्छा आहे. तिच्या सुखाची माझ्याप्रमाणेंच काळजी घेण्याला एकच पुरुष योग्य आहे, आणि तो माझा दूरचा आप्त माधव हा होय ! तो प्रेमळ व प्रामाणिक आहे. मी त्याला बाळपणापासून पितृतुल्य प्रेमाने वाढवून जें शिक्षण दिलें, त्याची फेड त्याने ललितेला योग्य शिक्षण देऊन केली आहे. त्या उभयतांचें एकमेकांवर निस्सीम प्रेम आहे. त्यांनी परस्परांशीं विवाह करून त्या प्रेमाला शाश्वत स्वरूप दिलें, तर ललिता जन्माची सुखी होईल, याबद्दल माझी खात्री आहे. पन्नास हजार रुपये किंमतीचें एक घर, त्यांतील सामान व एक लाख रुपये-एवढीच माझी मालमत्ता आहे. ललिता माझ्या इच्छे-प्रमाणे माधवाशीं लग्न करण्याला कबूल झाली, तर ती माझ्या सर्व मालमत्तेची मालकीण होईल. जर तिने त्याच्याशीं लग्न न करितां दुसऱ्या कोणा पुरुषाशीं—पण माधवाच्या संमतीने—लग्न करण्याचें ठरविलें, तर सामानासुद्धा घर आणि पन्नास हजार रुपये तिला मिळतील; आणि उरलेले पन्नास हजार रुपये माधवाला मिळतील. तिने माधवाच्या इच्छेविरुद्ध दुसऱ्या कोणाशीं लग्न करण्याचें, अगर आजन्म कुमारी राहण्याचें ठरविलें तर माझ्या घराचा आणि आंतील सामानाचा तिला जन्मभर उपभोग घेतां येईल, पण याशिवाय तिला कांही एक मिळणार नाही; तर एकट्या माधवाचीच माझ्या सर्व जिंदगीवर मालकी राहील. ललितेने विवाहासंबंधीचा आपला निर्णय मृत्युपत्राच्या वाचनाचे वेळींच कळविला पाहिजे. ती माझ्या इच्छेप्रमाणे वागली, तर देव तिचें कल्याण करील. ती माझ्या इच्छेविरुद्ध वागली, तर जशी ईश्वराची मर्जी असेल, तसें होईल ! या मृत्युपत्राची अंमलबजावणी करण्याचें काम मीं आपला चुलत भाऊ पद्माकर याजकडे देत आहें. मी त्याला दिलेलें शिक्षण, त्याचा माधवाबद्दलचा अकृत्रिम स्नेह व ललितेवरील बंधुतुल्य प्रेम हीं मनांत बाळगून तो तें काम निःस्पृहपणें बजावील, अशी माझी खात्री आहे." झालें, संपलें मृत्युपत्र !

माधव—या मृत्युपत्रावरून बाबा-

साहेबांचें ललितेवरील प्रेम जसें दिसून येतें, तसें मजबद्दलचें अनुकूल मतहि दिसून येतें !

पद्माकर—मला तर हें मृत्युपत्र लग्न-पत्रिकेसारखेंच वाटतें !

ललिता—आप्पासाहेब, या मृत्युपत्रा-वरून बाबांचें तुमच्याबद्दलचें अत्यंत अनुकूल मत दिसून येतें, हें खरें. त्याने त्यांचें मजवरचें प्रेमहि दिसून येत असेल. पण विश्वास मात्र मुळीच दिसून येत नाही ! स्वतःकरितां योग्य पति निवडण्याची योग्यता तर माझ्या अंगीं नाहीच, पण तसा पति दुसऱ्याने माझ्याकरितां निवडला, तर तो द्रव्याच्या आमिषाशिवाय पत्करण्याचा निर्लोभीपणाहि माझ्यांत नाही असाच, ना या मृत्युपत्राचा भावार्थ ? मला रुपेरी शृंख-लांनी बद्ध करून जन्मठेपीची शिक्षा देतांना बाबांनी माझ्या बुद्धीची आणि नीतिमत्तेची चांगलीच पारख केली म्हणायची !

माधव—हा तर मजवर वज्राघातच झाला!

पद्माकर—ललिते, काय अभद्र शब्द बोललीस हे ! तुला जन्म देऊन तळहातावरच्या फोडाप्रमाणे वागविणारा तुझा बाप तुला जन्म-ठेपेची शिक्षा देईल का ? माधव, तूं तिचें काय मनावर घेतोस ?—ते शब्द तिच्या तोंडून चुकून बाहेर पडले !

ललिता—नाही, नाही. मी ते शब्द पूर्ण विचार करूनच बोललें.

पद्माकर—काय म्हणतेस, पोरी ! या चालत आलेल्या लक्ष्मीला तूं लाथाडणार ?

ललिता—लक्ष्मी जर माझ्या मनाचें स्वातंत्र्य हिरावून घेऊं लागली, तर तसें करण्या-वाचून मला कोणतें गत्यंतर उरलें, तूंच सांग, काका !

पद्माकरः—तुझ्या मनाचें स्वातंत्र्य ! आणि, तें कसें काय हिरावलें जाणार ? माधवाशीं लग्न बाबासाहेबांच्या आज्ञेवरून न करितां तूं स्वेच्छेनेच कर, म्हणजे झालें. त्याच्याशीं लग्न करण्याचें मनांत असतां तशी बाबासाहेबांची इच्छा आहे म्हणून केवळ त्याला नकार देशील, तर तुझ्यासारखी शहाणी तूंच म्हटली पाहिजेस ! अत्यंत प्रेमळ नवरा आणि अत्यंत विपुल संपत्ति मिळण्याची संधि आली असतां तूं त्यांना झिड-कारून आकाशाईला मिठी मारणार ! मनाच्या स्वातंत्र्याची तुझी कल्पना कांही मुलखावेगळीच दिसते ! बोल, तुझें माधवावर प्रेम नाही का ?

ललिता—मीं कधी नाही म्हटलें ?

पद्माकर—नाही म्हणत नाहीस, आणि लग्नालाहि कबूल होत नाहीस, या विसंगतपणाला काय म्हणायचें ?

ललिता—लग्नाला पाहिजे तशा प्रकारचें तें प्रेम नाही, काका !

पद्माकर—मग कशा प्रकारचें आहे, कळूं तरी दे !

ललिता—आप्पासाहेबांनी माझ्यावर आजपर्यंत भावाप्रमाणे नाही का प्रेम केलें ?—मग माझें त्यांच्यावर बहिणीप्रमाणे प्रेम जडलें, तर त्यांत नवल तें कोणतें, काका ? त्यांनी आपल्या पाठच्या बहिणीची घ्यावी इतकी माझ्या प्रकृतीची आणि शिक्षणाची काळजी घेतली. रोजच्या रोज मला पाठ द्यावे आणि मजकडून अभ्यास करून घ्यावा. त्या दिवसांत त्यांनी माझ्याशीं गुरूला शोभेल असेंच पवित्र वर्तन ठेवलें. प्रणयाचा एक शब्दहि मुखावाटे काढिला नाही !

पद्माकर—त्याने एवढा मनोनिग्रह दाखविला, हा त्याचा गुण की दोष ? आणि त्या-बद्दल त्याला बक्षीस द्यायचें, की शासन करायचें ?

ललिता—बाबांनीहि मृत्युपत्रांत यांना पितुतुल्य प्रेमाने वागविल्याचा निर्देश करून माझ्या बंधुप्रेमाचें गर्भितपणें समर्थनच नाही का केलें ?

माधव—ललिते, बाबासाहेबांच्या मृत्यू-नंतर तूं मला 'आप्पासाहेब' या नांवाने संबोधूं लागलीस, तेव्हाच तुझ्या मनांत वसत असलेलें द्वैत माझ्या लक्ष्यांत यायला पाहिजे होतें !

ललिता—आप्पासाहेब, तुम्ही बडे वकील झालांत, तेव्हा तुम्हांला 'अरे-जारे' करणें बरें तरी दिसेल का ?

माधव—तूं याप्रमाणे तुटकपणें वागत असतां मी मात्र तुझें आणि माझें हिताहित

एकच समजून चालत आलों आहें. लहानपणीं मला खाऊ मिळाला की, त्याचा निम्मा वाटा तुला दिल्याशिवाय मी कधीहि राहिलों नाही! एखादे वेळीं धावतांना जमिनीवर पडून तुला खोक पडली, तर ती धुऊन तिला उपचार करण्याचें काम मी आपणाकडेच घेई! तुझ्या आजारांत तुझ्या उशाशीं जागत आणि आजाराने फिक्कट झालेल्या, पण त्यामुळे अधिकच सुंदर दिसणाऱ्या चेहऱ्याकडे टक लावून पाहत मी प्रहरन् प्रहर घालवीत असें! वडील माणसें बोलल्यामुळे तुझ्या मनाला वाईट वाटून तूं टिपें गाळूं लागलीस, म्हणजे तीं चुंबण्याचा मोह मला अनावर होई, पण तो मी मनांतल्या मनांत दाबून ठेवीं! एखाद्या वेळीं तुझें थोर हृदय आणि उदार स्वभाव पाहून तुला पोटाशीं धरण्याची ऊर्मि अंतःकरणांत जोराने उचंबळून येई, पण मी ती तितक्याच जोराने दाबून टाकीं! बाबासाहेबांनी ठेविलेल्या विश्वासाचा घात करण्याचें मीं मनांत आणलें असतें, तर मी आज तुझ्या अंतःकरणाचा स्वामी होऊन बसलों असतों! प्रेमाच्या जोडीस विश्वासघातकीपणा नव्हता, म्हणूनच आज माझ्या वाट्याला निराशा आली आहे!

ललिता—तुम्हांला आपल्या प्रामाणिकपणाबद्दल पश्चात्ताप तर होत नाही ना?

माधव—प्रामाणिकपणाचें मोल जर मी प्राणापेक्षा, फार काय, प्राणाहून प्रिय अशा तुझ्यापेक्षा सुद्धा अधिक समजतों, तर पश्चात्ताप कुठून होणार?

ललिता—आप्पासाहेब, तुमच्याबद्दल मला आदर आणि अभिमान वाटतो. पण भगिनीप्रेमाहून निराळें प्रेम वाटत नाही, याबद्दल क्षमा करा. याला आपलाच मनोनिग्रह कारण झाला, तोच मनोनिग्रह तुम्हांला निराशा सहन करण्याचें बळहि देईल.

माधव—तुझें हल्ली मजवर दयितेचें प्रेम नसेल कदाचित्. तें पुढे उत्पन्न होईल, अशी आशा करण्याला तरी मला जागा आहे का?

ललिता—प्रेमाचें प्रमाण वाढेल. पण स्वरूप कसें बदलणार?

माधव—मग आत्यंतिक निराशाच माझ्या वाट्याला आली असें मी समजूं?

ललिता—तुम्हांला आशा दाखविणें म्हणजे तुमची फसवणूक केल्यासारखें होईल.

माधव—ललिते, तुझा निर्णय मला शिरसामान्य आहे. तुला सुख देणें हीच जर मला माझ्या जीविताची इतिकर्तव्यता वाटते, तर तुझ्या इच्छेला मला मान वाकविलीच पाहिजे. तूं माझी सहधर्मिणी व्हायला तयार झाली असतीस, तर मला स्वर्गसुख हातीं आल्यासारखें वाटलें असतें. तुझ्या प्रतिकूलतेमुळे माझें जीवन जरी दुःखमय होणार आहे, तरी तुझ्या सक्तीच्या खुषीपेक्षा तेंहि पुरवलें. माझ्या जन्माच्या सुखाकरितां मी तुला एका क्षणाचेंहि दुःख देणार नाही. मग यातनामय जन्मठेप कशी देईन? तूं मजवर तिळमात्र प्रेम न करितां तुझें आजन्म रक्षण करण्याचा हक्क जरी मला दिलास, तरी मी संतुष्ट राहीन.

पद्माकर—ललिते, अशा एकनिष्ठ स्नेह्याला मृत्युपत्रावरील रागाने लाथाडून टाकलेंस ना? शाबास तुझी! पण तुझ्यासारख्या मूर्ख मुलीपासून शहाणपणाची तरी कशी अपेक्षा करावयाची? तुझी आई तुझ्या बालपणांतच निवर्तल्यापासून तुझ्या वडिलांनीच तुझा पत्कर घेतला आणि तुझे हवेतसे लाड करून तुला डोक्यावर बसवून घेतलें. तुला शाळेंत न घालतां खासगी शिक्षणावरच सारी मदार ठेवली. आणि, तुला बरोबरीच्या मुलांमुलींत मिसळूं न देतां घरकोंबडी करून ठेवली! अशा व्यवहारशून्य मुलीकडून रागाच्या भरांत असें उद्दाम आणि कृतघ्नपणाचें वर्तन झालें नाही, तरच नवल!

ललिता—काका, ललिता मूर्ख आणि व्यवहारशून्य असेल, पण कृतघ्न मात्र मुळीच नाही. बाबा आपली सारी संपत्ति मला एकहि अट न घालतां देतील, अशी माझी समजूत होती. तिला एकदम धक्का बसल्यावर मला रागाचा अंमळ झटका आला, हें मी क़बूल करतें. पण त्यांच्या आणि अप्पासाहेबांच्या अनंत उपकारांची आठवण होऊन तो झटका लवकरच ओसरला आणि पुढे पुढे तर माझें मन विरघळून

जाऊं नये, म्हणून मला रागाचें उसनें अवसान आणावें लागलें !

पद्माकर—ऐका ! रागाचें अवसान म्हणे ! सज्ञान होतांच बापाची अर्धी संपत्ति दडवून बसणाऱ्या अज्ञान पोरीला राग किंवा त्याचें अवसान आणण्याचा हक्कच काय पोचतो ?

ललिता—काका, मला राग आला नसता, तर माझें अप्पासाहेबांवर प्रेम नाही, ही गोष्ट माझ्या ओठावाटे बाहेर पडली असती का ? आणि, मी रागाचा आव आणिला नसता, तर त्यांच्या हृदयद्रावक आणि हृदयभेदक शब्दांपुढे माझा निभाव लागला असता का ?

पद्माकर—आता रागाचा जोर ओसरल्यावर सुद्धा माधवाला निराश करण्याचा तुझा बेत कायमच आहे तर !

ललिता—त्याला माझा निरुपाय आहे ! आणि, मी त्याबद्दल अप्पासाहेबांची मनापासून क्षमा मागतें. अप्पासाहेब-माधवराव-अप्पा-माधव, माझ्यावर रागावलास होय !

माधव—मला बालपणापासून आजपर्यंत मिळालेल्या या चार नांवांनी उलट क्रमाने संबोधून तूं मला बालपणापर्यंत खेचीत नेलेंस आणि माझ्या हृदयमंदिराचें एकेक दालन उघडीत अगदी आतल्या गाभाऱ्यांत येऊन पोचली आहेस. माझा प्राथमिक अभ्यासक्रम सुरू होईपर्यंत लोक मला 'माधव' या नांवाने ओळखीत असत. माझा दुय्यम शिक्षणक्रम सुरू होतांच मी 'अप्पा' झालों. उच्च शिक्षण घेऊं लागतांच 'माधवराव' आणि वकिली सुरू करितांच 'अप्पासाहेब' हें नांव मिळविलें. तथापि या सर्व स्थित्यंतरांतून तूं मला 'माधव' या एकाच नांवाने हाक मारीत होतीस आणि तेंच माझें नांव अत्यंत आवडतें होऊन बसलें. बाबासाहेब निवर्तल्यापासून मात्र तूं मला 'अप्पासाहेब' म्हणूं लागलीस आणि माझ्या आयुष्यांतील सारें सुख मावळल्यासारखें झालें ! आज पुन्हा तूं मला 'माधव' म्हणून तुझ्या हृदयांतील माझ्या पूर्वीच्या जागेवर स्थापना केलीस, हें पाहून मला धन्यता वाटते. कृपा करून याच नांवाने मला अखेरपर्यंत संबोधीत जा. माझें तुझ्यापाशीं दुसरें कोणतेंहि मागणें नाही.

ललिता—माधव, तूं माझ्याशीं फटकून वागूं लागलास, तेव्हा मला तरी तुला 'अप्पासाहेब' या आदरवाचक नांवाने संबोधल्यावांचून कोणता मार्ग शिल्लक होता बरें ?

माधव—पण आता तरी माझ्या तुटक वर्तनाचें कारण तुला कळलें ना ?

ललिता—होय. आणि, तूं मला नेहमी यापुढे माधवच राहणार. पण मला तूं पूर्ण क्षमा केलीस ना ?

माधव—तुझें माझ्यावर प्रणयिनीचें प्रेम नाही, हा तुझा अपराध नसून माझें दुर्दैव आहे !

ललिता—आणि माझेंहि !

पद्माकर—ललिते, माधवाशीं विवाह करण्याच्या नाखुषीमुळे तूं पन्नास हजार रुपयांवर पाणी सोडावयाला तयार आहेस, असेंच ना मी समजावयाचें ?

ललिता—काका, ते पन्नास हजार रुपये माधवाला मिळणार, याहून त्यांचा आणखी तो दुसरा कोणता सद्व्यय होणार ?

पद्माकर—आता बाकीच्या पन्नास हजारांची विल्हेवाट लावावयाची राहिली. तूं माधवाला नकार दिलास, यावरून तुझें मन अजून स्वतंत्रच आहे, असें समजावयाचें की, तें दुसऱ्याच्या कह्यांत गेलें आहे असें समजावयाचें ? दुसऱ्याच्या कह्यांत गेलें असेल, तर त्याच्याशीं लग्न करण्याला माधवाची संमति आहे की नाही, हें पाहावें लागेल.

ललिता—माधवाची संमति मिळण्याला फारशी अडचण पडेल, असें मला वाटत नाही.

माधव—म्हणजे तुझें मन आधीच गुंतून गेलें आहे की काय ?

ललिता—नाही. पण परिणाम तोच झाला आहे. मला प्रेम नसतांच एकाशीं लग्न केलें पाहिजे.

पद्माकर—प्रेम नसतां लग्न ? माधवावर प्रेम नाही, या सबबीवर तूं त्याच्याशीं लग्न करण्याचें नाकारलेंस; आणि आता प्रेमावाचूनच लग्न करणार ? अशक्य ! अगदी अशक्य !!

ललिता—त्या माणसाने मला उपकार-बद्ध केलें आहे.

पद्माकर—आणि, माधवाने तुला अपकार केला आहे की काय ?

ललिता—त्याने माझ्यावर अनंत उपकार केले आहेत, पण ते निराळ्या प्रकारचे आहेत. त्याने मला गुरूप्रमाणे विद्यादान दिलें.

पद्माकर—आणि त्या माणसाने तुला प्राणदान दिलें वाटतें ?

ललिता—प्राणांपेक्षाहि मोलवान अशा माझ्या कौमार्याचें रक्षण केलें.

पद्माकर—आणि म्हणून तूं त्याला आपलें कौमार्य अर्पण करणार होय ? खाशी सोय ! ऋण ज्या स्वरूपाचें, त्याच स्वरुपाची त्याची फेड असली पाहिजे, हा देवघेवीच्या व्यवहारांतील न्याय असेल. पण तो नैतिक व्यवहाराला मुळीच लागू पडत नाही. गुरु शिष्याला विद्या देतो, पण शिष्य त्याला विद्या देत नाही. आईबाप अपत्याला जन्म देतात, पण तें त्यांना जन्म देत नाही.

ललिता—गुरूला शिष्यापासून विद्येची आणि आईबापांना अपत्यापासून जन्माची अपेक्षा नसते.

पद्माकर—आणि, तुझा हा उपकारकर्ता तुझ्यापासून देहाची अपेक्षा करतो, असेंच ना ? श्रीमंत बापाच्या एकुलत्या एक मुलीच्या देहाची त्या बापाच्या मरणानंतर किंमत ओळखणारा हा उपटसुंभ रत्नपारखी आहे तरी कोण ?

ललिता—त्यांना द्रव्याची मुळीच हाव नाही, काका !

पद्माकर—तुझ्या सौंदर्याचीच काय ती आहे म्हणतेस ?

ललिता—ते चित्रकार आहेत.

पद्माकर—मग जुळलें. चित्रकाराला सौंदर्याचा मोह पडावयाचाच. बायको कवि आणि नवरा चित्रकार. तिने चित्रकाव्यें रचायचीं आणि त्याने काव्यमय चित्रें रखाटावयाचीं.

ललिता—त्यांनाहि कवितेचा नाद आहे. त्यांनी कांही छंदोबद्ध कविता लिहिली आहे.

पद्माकर—मग कांही हरकत नाही. तसें नसतें, तर सारा छांदिष्टपणा तुझ्या वाट्याला येऊन नुसती अर्थदृष्टि त्याच्याकडे गेली असती !

ललिता—ते नाट्यांतहि प्रवीण आहेत.

पद्माकर—त्याने तुला प्रेमाचें नाटक बेमालूम करून दाखविलें, तेव्हा नाट्याच्या निराळ्या शिफारसपत्राची जरूरच नाही. आता एकच महत्त्वाची कला राहिली. त्याला गाणें कितपत येतें ?

ललिता—त्यांत सुद्धा खोड काढावयाला जागा सापडणार नाही.

पद्माकर—तूं एवढी तारीफ चालविली आहेस, यावरून तो बराच सुरेख असावासा दिसतो. 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते' ही जशी पुरुषांची दृष्टि असते तशी 'सर्वे गुणाः सौंदर्यमाश्रयन्ते' ही बायकांची दृष्टि असायची.

ललिता—त्या ओळींत एक मात्रा जास्त झाली, काका.

पद्माकर—आम्ही डॉक्टरलोक वैद्याप्रमाणे मात्रेकडे लक्ष देत नसतों !

ललिता—माझा त्यांच्या गुणांविषयी विनाकारण पक्षपात आहे, असें मुळीच नाही. त्यांचे गुण तुम्हा दोघांच्याहि दृष्टीला पडले आहेत.

माधव—ललिते, तुझी निवड योग्य असेल, तर मी आपली संमति देण्याला तयार आहें.

पद्माकर—तुझ्यासारखा निर्मत्सर प्रतिस्पर्धी मिळाला, हें त्या इसमाचें नशीबच म्हटलें पाहिजे !

माधव—इचा पति होण्याच्या भाग्याला मी तर आचवलोंच आहें. मग त्या भाग्याबद्दल दुसऱ्याचा हेवा करून मला काय मिळणार ? पण इच्या वर्णनावरून मला एक भलतीच शंका येते आहे. आणि तीच खरी ठरणार, अशी माझी मनोदेवता मला सांगत आहे.

पद्माकर—ललिते, तुझ्या संकल्पित वराचें नांव कळूं दे अगोदर. मलाहि माधवाच्या प्रमाणेच शंका येते आहे.

ललिता—त्यांचें नांव आणि पत्ता तूंच नाही का त्या दिवशीं मला सांगितलास ? मग मीच कशाला नांव सांगितलें पाहिजे ?

पद्माकर—काय म्हणतेस, पोरी! त्या नीच रंगनाथाशीं तूं लग्न करणार?

माधव—रंगनाथाशीं! त्याने तुझ्यावरहि आपलें कपटजाल पसरलें की काय?

पद्माकर—आणि, त्याचा पत्ता नुसत्या जिज्ञासेने नव्हताच विचारलास तर! पत्र लिहावयाचें होतें वाटतें त्याला!

ललिता—होय.

पद्माकर—आणि, तें कशाकरितां?

ललिता—त्यांनी माझी एका मोठ्या संकटांतून सोडवणूक केली होती. त्या उपकाराची मी कोणत्या रीतीनें फेड करावी, हें सांगण्याकरितां ते स्वतः मला भेटावयाला येणार होते. त्याप्रमाणे ते न आल्यामुळे मला काळजी वाटून मी त्यांना पत्रें लिहिलीं.

पद्माकर—पत्रें! अशीं कितीशीं पत्रें लिहिलींस?

ललिता—तीन.

पद्माकर—त्यांचीं उत्तरें तरी त्याजकडून आलीं का?

ललिता—नाही.

पद्माकर—तूं त्या पत्रांत आपल्या उतावळ्या, उदार आणि मोकळ्या स्वभावाला अनुसरून असा कांही अघळपघळ मजकूर लिहिला असशील की, त्याचा वाटेल तसा विपर्यास करितां यावा. "मी आपली जन्माची ऋणी आहें, आपले उपकार फेडण्याला, आपली इच्छा पूर्ण करण्याला मी आतुर झालें आहें आणि आपली चातकाप्रमाणे वाट पाहात बसलें आहें"—अशा वाक्यांची मारे रेलचेल केली असशील! (ललिता स्तब्ध रहाते)...तूं कृतज्ञतेच्या भरांत जें लिहून गेलीस, त्याच्या अर्थाचा रंगनाथासारख्या नीच माणसाकडून कसा अनर्थ करण्यांत येतो, याची तुला अजून कल्पना नाही. आणि पत्राखाली 'आपली ललिता' अशी सही करून त्या साऱ्यावर कळस चढविला असशील! तुझ्या लिहिण्याचा मतलब त्याच्या उत्तरांतून ओळखितां आला असता. पण तें साधनहि त्याने तुझ्या हातीं लागूं दिलें नाही. बरें, ही गोष्ट आमच्या पासून गुप्त ठेवण्याचें कारण?

ललिता—त्यांची पुन्हा भेट होईपर्यंत ती गुप्त ठेवण्याचें त्यांनी माझ्यापासून वचन घेतलें होतें.

पद्माकर—म्हणजे, त्याचा कावा कोणाच्या लक्ष्यांत येऊं नये! चांगला कडेकोटच बंदोबस्त केला होता की! पण तुझ्यावर असें कोणतें मोठें संकट आलें होतें की, त्यांतून तुझी सुटका करण्याकरितां त्याला धावून यावें लागलें?

ललिता—त्या संमेलनाच्या नाटकाच्या रात्रीं तुम्ही माझा शोध करीत आलां नव्हतां का?

पद्माकर—होय. तुझी वाट चुकली होती, म्हणून तुझा माग काढीत आलों होतों.

ललिता—माझी वाट चुकली नव्हती. एका भामटयाने माझी मुद्दामच दिशाभूल केली होती. त्याचे साथीदार मला जबरदस्तीने घेऊन जाऊं लागले. इतक्यांत त्यांनी येऊन त्यांना पळवून लाविलें.

पद्माकर—अस्सें! आता सारा ग्रंथ लागला. तुझ्या सुटकेचें नाटक करितां यावें, म्हणून त्यानेच आपल्या साथीदारांकडून तुझ्यावर खोटेंच संकट आणविलें. आम्हांला तो प्रकार कळला असता, तर आम्ही त्याचें कारस्थान ओळखिलें असतें, म्हणून त्याने पुन्हा गाठ पडेपर्यंत कोणापाशीं वाच्यता न करण्याचें तुझ्याकडून वचन घेतलें.

ललिता—तुम्हांला असा संशय येईल, असें त्यांनीहि भाकीत केलें होतें.

पद्माकर—केलेंच असावयाचें. खाई त्याला खवखवे!

ललिता—तसें असतें, तर तें भाकीत बोलून दाखविण्याचें धाडस त्यांना मुळीच झालें नसतें. त्यांनीच जर माझ्यावर संकट आणिलें असतें, तर माझी सुटका करितांच माझें नांव कशाला विचारिलें असतें?

पद्माकर—ती नाटकांतील एक बतावणीच होती.

ललिता—काका, खरें कोणतें आणि त्याची बतावणी कोणती, हें न कळण्याइतकी का मी अज्ञान आहें ? त्यांचें सारें बोलणेंचालणें नाटक मानायला सांगणें म्हणजे संसाराला मृगजल म्हणायला सांगण्यासारखेंच आहे. बरें, माझ्यावर हल्ला करणारे त्यांच्या नटवर्गापैकी असावेत, असा संशय दाखवून त्यांनी त्या संकटाची जबाबदारी आपणांवर ओढून घेतली, ती कां ? उपकाराचा मोबदला घेण्याला ते इतके नाखूष तरी कां म्हणून दिसले ?

पद्माकर—आणि, मोबदला घेण्याला नाखूष दिसणाऱ्या या साळसुदानेच पडत्या फळाची आज्ञा मिळतांच गुडघ्याला बाशिंग बांधण्याची तयारी दाखविली ना ?

ललिता—त्यांना लग्नाची इतकी उतावळी असती, तर त्यांनी माझी पुन्हा गाठ घेण्याला इतका उशीर कां केला असता ?

पद्माकर—तुझी अस्वस्थता आणि उत्सुकता वाढवून तुझ्यापासून शक्य तितकीं पत्रें उकळण्याकरितां. त्याने कबूल केल्याप्रमाणे तुझी गाठ घेतली तर ? आणि, त्या भेटींत तुझ्यापाशीं लग्नाची याचना केली. होय ना ? (ललिता खाली पहाते.)

माधव—पद्माकर, किती निर्दयपणाने हा प्रश्नांचा भडिमार चालविला आहेस ! ललिते, रंगनाथ माझा आणि पद्माकराचा सहाध्यायी होता. तेव्हापासून आम्ही त्याला ओळखितों. त्या स्वार्थसाधूने खरोखरच नाटक करून तुला फसविलें. त्याने आजपर्यंत अनेक स्त्रियांना याचप्रमाणें भुरळ घालून त्यांचा सत्यानाश केला आहे.

ललिता—तूं म्हणतोस त्या वर्तनाचे ते असते, तर त्यांनी माझा सत्यानाश करण्याची संधि नाटकाच्याच रात्रीं साधली नसती का ?

माधव—या खेपेचा त्याचा डाव नेहमीपेक्षा अधिक महत्वाकांक्षी आणि दीर्घसूत्री स्वरूपाचा आहे. तुझें शील आणि वित्त बरोबरच हरण करण्याचा त्याचा हेतु दिसतो.

ललिता—तें कसेंहि असलें, तरी निदान माझ्याशीं तरी त्यांचें वर्तन शुद्धच झालें आहे.

माधव—कालसर्पाच्या मुखांतून कधी तरी अमृत बाहेर पडेल का ? शक्यच नाही.

ललिता—माधव, अपकाराची फेड उपकाराने करण्याची तुझी मला नेहमी शिकवण असायची. तोच तूं उपकाराची फेड अपकाराने करण्याचा मला उपदेश करितोस ना ? ओठांनी दिलेलें वचन कृतीने अक्षरशः पाळणाऱ्या गुरूने आपल्या शिष्यिणीने पत्रद्वारें दिलेल्या वचनांचा भंग करण्याचा तिला उपदेश करावा ! माधव, हा उपदेश तुला शोभत नाही, आणि तो अनुसरणें मलाहि शोभणार नाही. वचन देतांना मी उतावळेपणा केला असेल. पण एकदा तें दिल्यावर मला पाळिलेंच पाहिजे. पाळिलें नाही, तर मला जन्मभर तळमळ लागून राहील !

माधव—अशा उलट्या काळजाच्या माणसाने कपटाने घेतलेलें वचन पाळायला तूं मुळीच बांधलेली नाहीस. तेव्हा वेळींच सावध हो, आणि तो दुरात्मा तुझ्या गळ्याभोवती आवळीत असलेले पाश ताडकन तोडून टाक. तसें न करशील, तर जन्मभर पश्चात्ताप करीत बसशील !

पद्माकर—ललिते, माधव म्हणतो त्याप्रमाणे तो खरोखरच उलट्या काळजाचा आहे. त्याच्यासारखा स्त्रीघातकी, दुराचारी, पापी त्रिभुवनांत सापडणार नाही !

ललिता—काका, केवढ्याने बोलतोस हें ? भिंतीला सुद्धा कान असतात हो !

पद्माकर—मला भय आहे का कुणाचें असें बोलायला ? मी हें वाटेल त्याच्या देखत सांगायला तयार आहें.

ललिता—काका, माणूस समोर नसतां त्याची अशी निंदा करणें अन्यायाचें नाही का ? शिवाय अशा निंदेने ऐकणाराला त्या माणसाबद्दल सहानुभूति वाटते, ती निराळीच.

पद्माकर—ललिते, त्याची निंदा करून तुझ्या मनाला दुखविण्यांत मला आनंद होतो असें का तुला वाटतें ? तूं माझी कोणी नसतीस आणि त्या चांडाळाच्या कसाब-करणीचा मला अनुभव आला नसता, तर मीं ही निंदा तुला ऐकविली नसती. पण तुझ्यापुढे 'आ' वासून

बसलेल्या भयंकर संकटाची कल्पना आली की, मन कातर होतें, तसें तुझें हृदय शब्दांनी विदीर्ण करण्याइतकें धीटहि होतें. ललिते, तुझी अब्रू एकदा भंगली की, ती कल्पांतींहि सांधणार नाही. इतक्याहि उप्पर चुलत्याला आलेला अनुभव पुतणीलाहि यावा, अशी ईश्वराची इच्छा असेल, तर तिला मान वाकविलीच पाहिजे.

ललिता—काका, माणसाचा एकदा अधःपात झाला, म्हणजे त्याला सुधारणें अगदी अशक्य असतें, असें का तुझें म्हणणें ?

पद्माकर—तूं का त्याला सुधारणार ? त्याला पुष्कळ सुधारूं पाहशील. पण त्या प्रयोगाला त्याची पात्रता पाहिजे ना ? तो अग्नीच्या ज्योतीबरोबर उन्नति करून घेणाऱ्या हविर्भागाच्या जातीचा नसून स्वतःबरोबर दिव्य ज्योतीचा अधःपात घडविणाऱ्या धोंड्याच्या जातीचा आहे, समजलीस ?

ललिता—माधव, काकाचा त्यांच्याबद्दल गैरसमज होण्याला कारण तरी झालें आहे. तशी गोष्ट तुझी नाही. तूं नाहीस का आमच्या लग्नाला आपली संमति देणार ?

माधव—नाही. प्राण गेला तरी तुझा सत्यानाश करणारी संमति या ओठांबाहेर पडणार नाही. रंगनाथ सज्जन असता, तर मी त्याचें त्याच्या भाग्याबद्दल अभिनंदन केलें असतें. तो दुष्ट असूनहि तुझें त्याच्यावर प्रेम असतें, तरी मी तुमच्या लग्नाला हरकत घेतली नसती. कारण नवऱ्याकडून होणारा छळहि स्त्रीला प्रेमामुळे गोड वाटतो. पण तुझें त्या दुष्टावर प्रेम नसतां मीं तुमच्या लग्नाला संमति देणें म्हणजे तुझी हत्या करण्यासारखें होईल !

पद्माकर—शाबास, माधव शाबास ! खऱ्या प्रेमी माणसाला प्रसंगीं कठोरहि होतां येतें, हें तूं आपल्या वर्तनाने सिद्ध केलें आहेस. ललिते, माधव आपली संमति देत नाही. रंगनाथाशीं लग्न करण्याचा हेका सोडून देण्याला तूं तयार आहेस का ?

ललिता—काका, मी मोठ्या बुचकळ्यांत पडलें आहें. ज्यांनी माझ्या कौमार्याचें रक्षण करण्याकरितां आपल्या प्राणांवरहि संकट ओढवून घेतलें, त्यांची उतराई मला कसेंहि करून झालेंच पाहिजे. उतराई होण्याचा लग्नाशिवाय दुसरा कोणताहि उपाय त्यांनी मला ठेविलेला नाही. त्यांचा उपकार म्हणजे नुसतें नाटक होतें, हें निमित्त पुढे करून मी जर त्यांतून सुटका करून घेऊं लागलें, तर माझ्या पदरीं अधमपणा मात्र येणार आहे. बरें, निर्णय देण्याला मला बाबांनी थोडी तरी सवड ठेविली आहे का ? नाही ! मला तो याच क्षणीं दिला पाहिजे.

पद्माकर—होय. सांग तर तुझा निर्णय काय ठरला तो.

ललिता—त्यांच्या उपकाराची फेड करण्याचें माझें लेखी वचन त्यांच्यापाशीं अडकलें आहे, तोंपर्यंत तरी मला तें वचन मोडितां येणार नाही. मला याबद्दल फार वाईट वाटतें. पण कर्तव्यापुढे काय करणार ?

पद्माकर—मग तुझा उरलेल्या पन्नास हजार रुपयांवरील हक्क राहिला नाही, हें ओघानेच आलें. मलाहि याबद्दल फार वाईट वाटतें. पण माझाहि कर्तव्यापुढे निरुपाय आहे. आता तो निःस्वार्थ रंगनाथ तुझ्याशीं लग्न करतो की काय, हें आपोआपच दिसेल.

ललिता—त्यांना द्रव्याचा लोभ नाही आणि मलाहि नाही. बाबांची संपत्ति मला मिळावी, अशी माझी योग्यताच नाही. ती मला मिळाली असती, तरी ती मी अविचाराने थोड्याच वेळांत घालवून बसलें असतें. ती सत्पात्रीं जाऊन पडली, यांत मला आनंदच आहे. वाईट एवढेंच वाटतें की, माधवावर आता मत्सराचा किंवा लोभीपणाचा विनाकारण जनापवाद येणार.

माधव—मी जनापवादाला मुळीच भीक घालीत नाही. तुला स्वतःला तो संशय येतो का ?

ललिता—बाबांनी मृत्युपत्रांत अशीच कांही चमत्कारिक अट घातली आहे की, तूं माझ्या लग्नाला हरकत घेतांच माझा तरी तुला अभिलाष असला पाहिजे, किंवा द्रव्याचा तरी असला पाहिजे, असा कोणालाहि संशय येईलच.

पद्माकर—अजून त्या मृत्युपत्रावरचा राग धुमसतोच आहे वाटतं ?

माधव—एकूण मी तुला लाख रुपयांचें आमिष दाखवून माझ्याशीं लग्न करण्याला तरी भाग पाडीत होतों, किंवा तुला लग्न करण्याची मनाई करून ती रक्कम स्वतःच गिळंकृत करायला पाहत होतों, असा तुलाहि संशय आहे तर ? (ललिता स्तब्ध राहते.) हा संशय मला असह्य झाला आहे. याचें निर्मूलन मी कसें करूं ? माझ्या अंतःकरणाचें शुद्धत्व सिद्ध करण्याकरितां ? तूं सांगशील तें दिव्य करण्याला मी तयार आहें.

पद्माकर—माधव, अविचाराने कोणतीहि प्रतिज्ञा करूं नकोस. पुढे तुला त्याचा पश्चात्ताप होईल.

माधव—पद्माकर, काटा काट्यानेच काढावा लागतो. त्याप्रमाणे ललितेच्या हृदयांत दृढमूल होऊन बसलेला संशयरूपी अविचार काढून टाकण्याला मला अविचाराचाच आश्रय केला पाहिजे. हं, झाला माझा निश्चय. ललिते, ऐक माझी प्रतिज्ञा : हा माधव आजपासून तुझ्या शरीरालाहि स्पर्श करणार नाही आणि तुझ्या लग्नाला हरकत घेतल्यामुळे मिळालेल्या लाख रुपयांनाहि स्वार्थाकरितां स्पर्श करणार नाही !

पद्माकर—माधव, माधव, काय करून बसलास हें ?

ललिता—माधव, मला क्षणभर तुझ्या निरपेक्षपणाबद्दल संशय आला होता, तो दूर झाला. पण तो घालविण्याकरितां तुला केवढा तरी स्वार्थत्याग करावा लागला !

माधव—ललिते, तुझ्या कल्याणाकरितां मी याहिपेक्षा मोठा स्वार्थत्याग करावयाला तयार आहें.

ललिता—पण मी संपत्तीला मुकल्यामुळे माझें कल्याण तें काय होणार ?

माधव—तूं निष्कांचन झालीस, असें पाहून रंगनाथ पुन्हा तुझ्या वाटेला जाणार नाही. त्याने जर तुझा नाद सोडला, तर तूं आपला हट्ट सोडशील ना, ललिते ?

ललिता—मग रे माझा आग्रह कसा चालणार ? मी तुला नकार देतांच तुझा आग्रह नाही का नाहीसा झाला ? तसा त्यांनी नकार दिल्यावर माझा तरी कुठून टिकणार ? पण मला वाटत नाही, मला ते नकार देतीलसें !

पद्माकर—पैशाकरितां तो वाटेल तें पाप करावयाला तयार होईल. आणि, ज्या अर्थी तुम्ही दोघांनी लाख रुपयांवरचा आपापला हक्क सोडून दिला आहे, त्या अर्थी या कामीं खर्च करावयाला बराच पैसाहि जवळ राहणार आहे.

माधव—ललिते, तूं रंगनाथाशीं तीन पत्रांनी वचनबद्ध झाली आहेस, तीं पत्रें जर त्याने मला विकलीं, तर त्याने तुजवरील हक्क सोडला, असें समजण्यास तूं तयार आहेस का ?

ललिता—अर्थातच.

माधव—तर मग तीं पत्रें हस्तगत करण्याचा मी प्रयत्न करतों. तो निष्फळ ठरेपर्यंत त्याच्याशीं लग्न न करण्याचें तूं माझ्यापाशीं कबूल केलें पाहिजेस.

ललिता—तुझ्या स्वार्थत्यागाबद्दल मी एवढेंहि वचन देणार नाही, तर मी कृतघ्न ठरेन. शिवाय द्रव्यलोभाने आपल्या भावी पत्नीचीं पत्रें हातावेगळीं करणाऱ्या माणसाशीं लग्न करून मला सुख तरी काय होणार ? माधव, तुझी अट मी आनंदाने मान्य करितें. कारण माझीं पत्रें तुला मिळणार नाहीत, ही माझी खात्रीच आहे.

माधव—आणि, तीं आजच्या आज मिळणार, अशी माझीहि खात्री आहे. ती परत आणीपर्यंत मी येथे पाऊल ठेवणार नाही.

ललिता—म्हणजे मला तुझी इतःपर भेटच व्हायला नको ?

माधव—पाहूं या, काय होतें तें. आम्ही जातों तर आता परत. आम्ही येथे ज्या आशेने आलों, तिची जरी पुरी निराशा झाली आहे, तरी तुझें रंगनाथापासून रक्षण करण्याची आशा अजून शिल्लक आहे. आणि, जोंपर्यंत कोणती ना कोणती तरी आशा मनांत वसत असते, तोंपर्यंत जीवित अगदीच शून्य आणि कंटाळवाणें वाटण्याचें कारण नसतें.

(माधव व पद्माकर जातात. रंगनाथ दार उघडून प्रवेश करतो.)

रंगनाथ—दोघांचीं मनें माझ्याविरुद्ध कशीं विथरून गेलीं आहेत, पाहिलींस ना ?

ललिता—त्यांच्या तोंडून आपणांला स्वतःची फारच निंदा ऐकावी लागली. त्यांचीं मनें आपणांविषयीं शुद्ध नसल्याबद्दल आपण जर मला सूचना केली नसती, तर त्या निंदेचा माझ्यावरहि अनिष्ट परिणाम झाला असता.

रंगनाथ—त्या निंदाग्नीच्या वर्षावांत तूं मात्र आपलें डोकें थंड ठेविलें होतेंस. तुझ्या सत्य-निष्ठेचा मला पाठिंबा नसता, तर माझा हेतु जाग-च्या जागींच राहिला असता. तुझ्या साह्यानें मात्र तो पूर्णपणें सिद्धीस नेण्याची मला खात्री वाटते.

ललिता—माझें आपणांला पूर्ण साहाय्य राहील.

रंगनाथ—तूं औदार्याची आणि एक-निष्ठपणाची पुतळीच आहेस. तुझ्या खंबीरपणा-वरच माझ्या साऱ्या प्रयत्नांची मदार राहणार आहे.

ललिता - आपण काय करायचें योजिलें आहे ?

रंगनाथ—आपल्या योजनेची रूपरेषा त्यांच्या चेतास अनुसरूनच आखली पाहिजे. त्यांची सारी भिस्त माझ्या निर्धनपणावर व लोभीपणावर आहे. म्हणून मी आज निर्धन असलों, तरी नेहमी तसाच राहणार नाही; आणि, लोभी तर मुळीच नाही, हें मला त्यांना पटवून दिलें पाहिजे. तुझीं पत्रें मी माधवाला विकीन, असें त्या दोघांना वाटतें. आणि, तीं मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न फसला, म्हणजे आपल्या विवाहाला मान्यता देण्यावाचून त्यांना गत्यंतरच राहणार नाही. पण माधवानें आपल्या प्रयत्नाला कालाची कांहीं तरी मर्यादा ठेविली आहे का ? मुळीच नाही. प्रयत्न चालू आहे, सिद्धीस जाण्याच्या मार्गाला आहे, असें म्हणत त्यानें तुला महिनाभर, वर्षभर किंब-हुना जन्मभर, झुलवीत ठेविलें, तरी त्याला ठेवितां येईल. आणि, मी तर इकडे स्वतःचा निर्लोभीपणा सिद्ध करण्याला कसा उतावळा झालों आहें !

ललिता—येत्या लग्नसराईपर्यंत वाट पाहायला हरकत नाही.

रंगनाथ—छे, छे ! इतका धीर मला कसा निघणार ? धीर काढिलाहि असता. पण समज, आपण तोंपर्यंत थांबलों आणि मध्यंतरीं आपलें लग्न अशक्य होण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली, तर ?

ललिता—अशी कोणती परिस्थिति उत्पन्न होणार ?

रंगनाथ—त्याचा काय नेम ! माधव तुझें शील भ्रष्टहि करायचा. त्यानें तुझीं पत्रें परत मिळविण्याचा चंग बांधिला आहे, यावरून तर त्याचा तुला आपलीशी करण्याचा निर्धार उघड दिसतो आहे.

ललिता—छे, छे ! त्याच्या सारख्या निष्पाप माणसाच्या हातून तसें होणें शक्य नाही. मला स्पर्श न करण्याची त्याची प्रतिज्ञा आपण विसरतां.

रंगनाथ—त्या प्रतिज्ञेवर अननुभवी आणि व्यवहारशून्य माणसाखेरीज कोण विश्वास ठेवील ? शिवाय प्रेमांत आणि युद्धांत सारें कांहीं क्षम्य समजलें जातें.

ललिता—इतका शंकेखोरपणा चांगला का ?

रंगनाथ—चांगला नसेलहि कदाचित्. पण तो क्षम्य आहे. अतिस्नेह पापशंकी असाय-चाच. तुझ्यासारखें रत्न हातून जाण्याचा दूरचाहि संभव असला, तरी तो मला कसेंहि करून नाहीसा केला पाहिजे. लग्नाच्या हंगामापर्यन्त आपल्या लग्नाला किती विघ्नें येतील, कुणास ठाऊक ! तसें पाहिलें, तर तोंपर्यंत थांबण्याचें आपणाला मुळीच कारण नाही. माधवाच्या उद्गारावरून पत्रें आजच्या आज हस्तगत करण्याची त्याची खात्री आहे, असेंच कुणालाहि वाटलें असतें.

ललिता—असें खरें.

रंगनाथ—झालें तर. तूं आजच्या दिवस थांबलीस, म्हणजे त्याचा तुजवर ठपका येण्याचें कारण नाही. वास्तविक पाहिलें, तर एवढा वेळ सुद्धा खोळंबण्याचें कारण नाही. पत्रें मजपासून

मिळवून माधव माझा लोभीपणाच शाबीत करणार ना ? पण तूं निर्धन झाली असतां तुझ्याशीं लग्नच उरकून टाकिलें, तर तो 'मूले कुठारच' घातल्यासारखा होईल. तें कांही नाही. आपला विवाह आज रात्रींच पार पडला पाहिजे; आणि, तोहि अत्यंत गुप्तपणाने. कारण उद्याच्या उद्या मला तुला पूर्ण सुखांत ठेवितां येईल, इतकें धन मिळविण्याकरितां येथून कूच केलें पाहिजे; आणि, आपलें लग्न जाहीर झाल्यास माझ्यामागे तुझ्या आप्ताकडून तुझा अतोनात छळ होईल. थोडयाच दिवसांत धन संपादन करून मी परत येईन आणि मग आपलें लग्न जाहीर करण्याला हरकत राहणार नाही.

ललिता—आपण बोलतां त्याचा मला मुळीच मेळ घालतां येत नाही. आपलें लग्न मुहूर्तावाचून आणि उपाध्यायाच्या मध्यस्थीवाचून कसें होणार ?

रंगनाथ—आपलें लग्न ब्राह्म विधीने न होतां गांधर्वविधीनेच व्हायचें आहे.

ललिता—मला एकाच विधीचें लग्न माहीत आहे.

रंगनाथ—नोंदणीच्या कायद्या अन्वयें होणारें लग्नहि तुला ठाऊक नसेल ?

ललिता—नाही.

रंगनाथ—तुझ्यासारख्या कोंवळ्या अनुभवाच्या मुलीला नोंदणीच्या नव्या लग्न विधीप्रमाणें पुरातन काळचा गांधर्वविधि माहीत नसावा, यांत नवल वाटण्यासारखें कांही नाही. गांधर्व विवाहाला मुहूर्ताची आणि भटाची मुळीच जरूर नसते. शुभस्य शीघ्रम् हा त्याचा मुहूर्त आणि तो सर्वसाक्षी परमेश्वर हा त्याचा साक्षीदार.

ललिता—पण हें असें लग्न शास्त्रसंमत होईल का ?

रंगनाथ—त्याची तुला काळजी नको. आपला धर्म मोठा उदार आहे. तो आपल्या उदरांत पुण्यवानाला जशी जागा देतो, तशी पाप्यालाहि देतो. त्यांत ईश्वरप्राप्तीचे तपश्चर्येसारखे खडतर मार्ग आहेत, तसे केवळ नामोच्चारासारखे सुगम मार्गहि आहेत. त्यांत कडक वैराग्याचें महत्त्व आहे, तसें विषयलोलुपांस आचरण्याला सुलभ अशा वाममार्गाचेंहि आहे. त्यांत देहदंडाने पापाचें क्षालन करून घेतां येतें, तसें दक्षिणादानाने किंवा पोथ्यांच्या पारायणांनीहि करून घेतां येतें. असा धर्म उतावळ्या वधूवरांचीच उपेक्षा कशी करील ? त्याने विवाहाचे एकंदर आठ प्रकार सांगितले आहेत. आपण बहुधा ब्राह्म विधीनेच लग्नें करितों. गांधर्वविवाहपद्धति तितकी रूढ नसली, तरी पूर्णपणें सशास्त्र आहे. शकुंतला, सत्यवती, शर्मिष्ठा आदि करून आर्य स्त्रियांनी याच पद्धतीने विवाह केले. त्रिभुवनपावन गंगेने सुद्धा याच पद्धतीचा अंगीकार केला. शूद्रांत अजून ही पद्धत प्रचारांत आहे.

ललिता—शूद्र लोक गंधर्व लावितात, असें मीहि ऐकिलें आहे.

रंगनाथ—झालें तर. आणि, तुझ्यासारख्या अप्सरेला गांधर्वविधीच योग्य आहे.

ललिता—हा विधि शास्त्रसंमत असेल, तर माझ्याहि मनाचें समाधान होईल. आपणांला खरें सांगूं ? माझ्या प्रेमळ आप्तांच्या इच्छेविरुद्ध आपणांशीं विवाहबद्ध होण्याचा मी जो निश्चय केला आहे, तो कितपत योग्य आहे, अशी मला हुरहुर लागली आहे, ती त्या विवाहाने एकदाची शांत होईल. पण पहिल्याने त्याच्या सशास्त्रपणाबद्दल माझी खात्री झाली, तर बरें होईल.

रंगनाथ—तुझी खात्री कशी करणार ? एखाद्या वकिलाला आणून तुझी खात्री पटवितां आली असती. पण त्याच्या कानावर ही गोष्ट घातली, तर विवाहाचा गुप्तपणाच नाहीसा होईल.

ललिता—माधवाशिवाय दुसऱ्या वकिलावर माझा मुळी विश्वासच बसणार नाही.

रंगनाथ—जेथे तेथे मला माधव नडतो आहे. ललिते, मी आपल्या गुप्त विवाहाचा माधवापाशीं परिस्फोट करून त्या विवाहाला अपशकून करून घ्यावा, असें का तुझें म्हणणें आहे ! शिवाय तो येथे येणार तरी कसा ? पत्रें मिळत तोंपर्यंत या घरांत पाऊलहि न टाकण्याची त्याने प्रतिज्ञा केली आहे ना ?

ललिता—मी आतापर्यंत अविश्वास दाखविला, याबद्दल क्षमा असावी. परस्पर विश्वास हा विवाहाचा पाया आहे. तो मी आणखी शंका

काढून डळमळीत करीत नाही. माझी गांधर्व-विवाहाला पूर्ण संमति आहे, असें समजावें. त्या विवाहाचा विधि तरी असा काय असतो ?

रंगनाथ—या विधींत दर्भसमिधांची खटपट किंवा होमकुंडाचा खटाटोप नसतो. यांत भटांची बडबड नसते आणि वाजंत्र्यांची कटकटहि नसते. वायबारांचा कडकडाट नसतो आणि विहिणींचा तडफडाटहि नसतो. आपली नेहमीचीं लग्नें बाहुलाबाहुलींचीं असल्यामुळे त्यांचें स्वरूपहि त्यांना शोभण्यासारखें पोरकट असतें. उलट गांधर्वविवाह ज्या काळीं प्रौढ स्त्रीपुरुषांचे विवाह होत त्या काळचा अवशेष असल्यामुळे त्यांत फक्त मुद्दयाच्या गोष्टींचाच समावेश होतो.

ललिता—आपण माझी उत्कंठा अधिक अधिक वाढवीत आहांत. त्या विधींत इतकें महत्त्वाचें असतें तरी काय ?

रंगनाथ—असतें काय, म्हणून विचार. वधूने वराची षोडषोपचारांनी पूजा करायची, उभयतांनी एका ताटांत भोजन करायचें, एकमेकांना घास घ्यायचे, एका पात्राने पाणी प्यायचें, भोजनोत्तर वधूने वराला अत्तर-गुलाब द्यायचा, पुष्पहार घालायचे, तांबूल अर्पण करायचा, पंचारतीने ओवाळायचें.

ललिता—हें ऐकून माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले !

रंगनाथ—साहसांत कुतूहलाचा जो अंश असतो, त्यापासून होणारा आनंद भित्र्यालाहि धाडशी करितो. लाडके, (ललिता मागे सरते.) मी सांगितला यापेक्षाहि या विधीचा तपशील रहस्यमय व मधुर आहे. पण त्याचा विचार करण्याची तूर्त आपणांला फुरसत कोठे आहे ! उद्या मी येथून निघून गेल्यावर काय काय करायचें, याचा आपणांस प्रथम विचार केला पाहिजे. मी एका लक्षाधीशाकरितां एक सुंदर चित्र तयार करणार आहें. तुझ्या प्राप्तीमुळे माझ्या कलेचा किती उत्कर्ष झाला आहे, याचें तें चित्र एक बिनतोड प्रमाणच होणार आहे. त्यांत तुझें सौंदर्य आणि माझी करामत यांचा सुंदर समागम पाहावयास मिळेल. त्यापासून होणाऱ्या प्राप्तीवर आपला संसार बिनधोक चालायला हरकत नाही. आता यापुढे पद्माकराच्या हुकुमाने तुझ्यावर नोकरांचा कडक पहारा राहण्याचा संभव असल्यामुळे पत्रव्यवहार करणें धोक्याचें होईल. तुझ्या पत्रांवरच मला आपल्या विरहाकुल अंतःकरणाचें समाधान करून घ्यावें लागेल. तुझ्यावर देखरेख करण्याच्या कामीं ज्या तुझ्या नोकरमाणसांची योजना होणार, तीं आहेत तरी किती ?

ललिता—येऊन जाऊन दोनच माणसें तर आहेत. घरकाम करायला एक मोलकरीण. आणि सोबतीला राधाबाई, त्या माझा स्वयंपाकहि करतात. त्यांचा नवरा कृष्णराव आमच्या घरचा बाजारहाट करतो. त्यांचें बिऱ्हाड आमच्याच घरीं आहे.

रंगनाथ—हीं माणसें चाणाक्ष कितपत आहेत ?

ललिता—मोलकरीण तर अगदीच वेंधळी आहे. राधाकृष्णांचें जोडपें हुशार आहे. पण त्यांचें यंदाच लग्न झालेलें असल्यामुळे त्यांचें इतरांपेक्षा एकमेकांकडेच लक्ष्य असतें. नवरा दिवसांतून कितीदा तरी मालकाला गुंगारा देऊन येथे येतो आणि सैपाकघरांत बायकोशीं घटका घटका गुलगुल गोष्टी करीत बसतो !

रंगनाथ—तुझ्या अभ्यासाच्या खोलीच्या बाहेरील दाराला जें अंगचें कुलूप आहे, त्याची एक किल्ली मी जवळ बाळगिली, तर मला तुझ्या नोकरांचा डोळा चुकवून वाटेल तेव्हा या घरांत प्रवेश करून घेणें विशेष जड जाणार नाही असें दिसतें !

ललिता—नाही.

रंगनाथ—उद्या मी येथून निघून गेल्यावर माधवाला पत्रांकरितां माझ्या घरीं बरेच हेलपाटे घालावे लागणार. पण त्याला माझा नाइलाज आहे. मी परत येईपर्यंत त्याचें औत्सुक्य कळसाला जाऊन पोचेल. आणि मी मागितल्यास तो पत्रांबद्दल हजारो रुपये मोजण्यास माघार घेणार नाही. पण मी ते रुपये लाथेने दूर झुगारून देईन. आणि, स्वार्थत्यागी म्हणून मिरविणाऱ्या माधवालाहि निरपेक्षपणाचा धडा शिकवीन. त्याच्या

स्वार्थत्यागाच्या प्रदर्शनाने तुझे डोळे दिपल्यासारखे दिसतात. पण तुझ्या प्राप्तीची आशा नष्ट झाल्यावर तुला स्पर्श न करण्याची प्रतिज्ञा आटोक्यापलीकडील द्राक्षे आंबट म्हणून त्यांचा मोह सोडणाऱ्या कोल्ह्याच्या वैराग्यापेक्षा अधिक श्रेष्ठ नाही. विवाहाच्या दुसऱ्याच दिवशीं तुझा मोह बाजूला सारणाऱ्या माझा स्वार्थत्याग त्याच्यापेक्षा कितीतरी उच्च प्रतीचा आहे! एक लाख रुपयांवर तिलांजलि देणाऱ्या माधवाची तुला थोरवी वाटते, पण तुझ्या तीन पत्रांची किंमत कोणी मला लाख रुपये जरी दिली, तरी तीं विकण्याचें नाकारून मी त्याच्या इतकाच मोठा निःस्पृहपणाचा चमत्कार करून दाखविणार आहे! ललिते, तूं निवडलेला पति जितका प्रेमळ व एकनिष्ठ, तितकाच निर्लोभी आहे, अशी तुझी लवकरच खात्री होईल.

(पडदा पडतो.)

अंक दुसरा

प्रवेश १ ला

[पद्माकर व पद्मा]

पद्मा—डॉक्टरसाहेब, आज मी आपलें साहाय्य मागायला आलें आहे.

पद्माकर—साहाय्य? आश्चर्य आहे.

पद्मा—इतर सार्‍यांना सोडून मी आपणांकडेच धाव घेणें हें आश्चर्य तर खरेंच! पण आपणाशिवाय सर्व जगावरचा माझा विश्वास उडाल्यावर आणि आपण अजूनहि मला साहाय्यच कराल, अशी खात्री असल्यावर मी तरी दुसरें काय करूं?

पद्माकर—एक काळ असा होता की, ज्या वेळीं आपणाला हरएक प्रकारचें साहाय्य करणें माझें कर्तव्य, किंबहुना, माझा हक्कच होता. पण दुर्दैवाने त्या हक्काला मी पूर्णपणें अंतरलों आहें.

पद्मा—त्या सार्‍या प्रकारांत मी किती निर्दोष होतें, हें प्रथम आपणाला समजावून सांगतें, आणि, आपली खात्री पटली, तरच आपण मला साहाय्य करावें.

पद्माकर—पद्मे, नव्हे पद्माबाई, क्षमा करा. एक वेळ तुम्हांला एकेरी नांवाने हाक मारण्याचा मला हक्क होता. पण त्यालाहि मी वंचित झालों आहें. असो. तुम्ही म्हणतां की, माझ्या प्रेमभंगाच्या बाबतींत तुम्ही निर्दोष आहांत. पद्माबाई, तर मग मी दोषी होतों का?

पद्मा—नाही, नाही. आपणांकडेहि मुळीच अपराध नव्हता.

पद्माकर—तुम्ही परिचारिकेचें शिक्षण घेत असतां मी तुम्हांला अनेक उपयुक्त पुस्तकें आणून देईं, तुमच्या शंकांचें समाधान करीं, तुम्हीं अभ्यासाने थकून गेल्यावर तुमची करमणूक करण्याकरितां मी तुमच्यापाशी बोलत बसें आणि त्या नादांत स्वतःच्या अभ्यासाची हेळसांड करीं. ही तर माझी चूक नव्हती ना?

पद्मा—छे, छे! तें आपलें औदार्य मी जन्मभर विसरणार नाही.

पद्माकर—औदार्य कसलें त्यांत? तो एक बाह्यात्कारीं उदारपणाचा दिसणारा स्वार्थाचाच पर्याय होता. कारण त्यांत तुम्हांला होई त्यापेक्षा समाधान आणि आनंद मला वाटे. असो. तो माझा गुन्हा नव्हता, तर मी तुम्हांला रोजरोज ताज्या सुगंधी वेण्या आणि गजरे आणून देईं, तुमची आवड-नावड ओळखून तऱ्हेतऱ्हेचीं रेशमी पोलकीं आणि बांगड्या नजर करीं, ती तरी माझी चूक असली पाहिजे.

पद्मा—छें, छे, असे कठीण शब्द बोलून माझ्या अंतःकरणाला घरे पाडूं नका. त्या देणग्यांनी माझ्या शिरावर उपकारांचें जें ऋण झालें, तें मी जन्मभर वागवीन.

पद्माकर—त्यांतहि माझा परोपकार नसून स्वार्थच होता. तीं पोलकीं लवकरच त्यांच्यापेक्षाहि मृदु आणि नाजूक अंगावर जाऊन बसणार आणि त्या बांगड्या त्यांच्यापेक्षाहि तेजस्वी मनगटांवर विराजमान होणार, या गोड कल्पनेने मी त्या नजर करण्यापूर्वीं त्यांचें कितीदा तरी चुंबन घेत असें, आणि त्या निर्जीव वस्तूंच्या त्या अमूर्त चुंबनांतहि मला इतका आल्हाद होई की, तितका त्या वापरतां-

नाहि तुम्हांला होत नसेल. पण त्यांत परोपकार-बुद्धि नसे, तशी अपकारबुद्धिहि नसे. असें असतां त्याचा आपणांला राग कां यावा?

पद्मा—डॉक्टरसाहेब, रोग्याच्या शरीरावर हलक्या हाताने शस्त्रक्रिया करण्यांत आपलें दिसून येणारें कौशल्य या हृदयविदारणाच्या कामांतच आपणांला कसें सोडून गेलें ? कृपा करा आणि हा भडिमार पुरे करा.

पद्माकर—या हृदयविदारणाच्या क्रियेंत तुमचेंच हृदय काय तें विदीर्ण होतें आणि माझें शाबूत राहतें, असें का तुम्हांला वाटतें ? तो सुखाचा काळ आठवतांना तो कायमचा नष्ट झाला, या विचाराने अंतःकरणांत स्मशानतुल्य शून्यता आणि भीषणता पसरते !

पद्मा—शाश्वत निराशेने ग्रस्त झालेल्या आपल्या मनाच्या अवस्थेची मला आपल्याइतकीच तीव्र जाणीव आहे. कारण ज्या प्रकाराने आपणांला निराशेच्या गर्तेत लोटून दिलें, त्याने मलाहि तिच्यांत ढकललें. आपण आणि मी समदुःखी आहोंत, येवढीच हल्ली दुःखांत समाधान मानायला जागा आहे.

पद्माकर—तर मग तुम्ही माझी वंचना केली, असा मी तुमच्यावर निष्कारणच आळ घेतला म्हणायचा. पद्माबाई, क्षमा करा. पण माझ्या आणि आपल्या या जीवन्मृतावस्थेची जबाबदारी माझ्याप्रमाणें तुमच्यावरहि नाही, तर ती आहे तरी कोणावर ?

पद्मा—दुर्दैवावर, दुसरें काय ?

पद्माकर—आपल्या प्रेमांत बिघाड होण्याचें कारण मला सांगण्याचें तुम्ही वचन दिलेंत ना ? मग अजून हा अविश्वास आणि हा गुप्तपणा कशाला ?

पद्मा—ऐका तर माझ्या दुर्दैवाची कर्मकथा. आपला उभयतांचा शिक्षणक्रम पुरा झाल्यावर विवाहबद्ध होण्याचें आपलें ठरलें होतें, हें आपल्या लक्ष्यांत असेलच.

पद्माकर—तें माझ्या अंतःकरणावर वज्रलेप होऊन बसलें आहे. पुढे ?

पद्मा—माझा शिक्षणक्रम आपल्या आधी संपून मी परिचारिकेचा धंदा सुरू केला, हेंहि आपणांला माहीत आहेच.

पद्माकर—अर्थातच. स्वतःचा शिक्षणक्रमहि शक्य तितका लौकर पुरा करण्याकरितां मी रात्रीचा दिवस करून जिवापाड श्रम केले, पण दैवाला आमचें सुख पाहणें आवडलें नाही. मला शेवटच्या परीक्षेंत यश आलें, आणि धंदा सुरू करणार, तोंच माझ्या मस्तकावर ती आकाशींची कुऱ्हाड पडली. ओठाशीं आलेला गोड घास दुर्दैवाने हिरावून दूर भिरकावून दिला. पद्माबाई, तुमचें प्रेमळ आणि कोमल अंतःकरण इतकें कठोर कसें हो झालें ?

पद्मा—आपली उत्सुकता एक क्षणभर थोपवून धराल, तर मला माझें मन दगडाहून कठोर कां करावें लागलें, हें आपणाला कळून येईल. परिचारिकेच्या धंद्यांत तरुण स्त्रीवर कसकसे दारुण प्रसंग येतात, याची आपणांला माहिती असेलच. अशांपैकीच एक प्रसंग एक दिवस मजवरहि आला. एका अडलेल्या स्त्रीची प्रसूतीच्या वेदनांतून सुटका करण्याचें बोलावणें आल्यावरून मी घाईघाईने शहराबाहेरच्या एका बंगल्यावर गेलें. आंत जातें, तोंच माझ्या तोंडांत बोळा कोंबण्यांत आला. पुढचा प्रकार—

पद्माकर—समजलों सारें.

पद्मा—माझ्या भ्रष्ट कौमार्याचें निर्माल्य माझ्या हृदयमंदिरांतील देवाला वाहण्याला उपयोगी पडण्यासारखें नव्हतें. तेव्हा तें मला पतित करणाऱ्या त्या दैत्यासच वाहणें भाग पडलें. आम्ही हल्ली विवाहाच्या वचनाने बद्ध आहोंत.

पद्माकर—आणि, तुझ्या कौमार्यावर दरोडा घालणारा चोर तो रंग्याच ना ? अरेरे ! काय करूं ? पुन्हा माझ्या तावडींत सापडला, तर त्याचें नरडें दाबून प्राणच घेईन, सोडणार नाही.

पद्मा—ते कसेहि असले, तरी माझे भावी पति आहेत.

पद्माकर—तें मी विसरलोंच होतों. पण हा विचार अजून कृतींत कां आला नाही ? तुमच्या या विचाराला सयुक्तिक कारणें असतीलच ?

०

पद्मा—होय.

पद्माकर—मग माझें कांही म्हणणें नाही.

पद्मा—मला त्यांनी लग्नाचें वचन दिलें खरें. पण तें लौकर अमलांत आणण्याचा त्यांचा विचार दिसत नाही. गेल्या वर्षांत त्यांनी अनेक वायदे केले. पण त्यांतला एकहि पार पडला नाही. अशा प्रकारें मला बरेच दिवस झुलवून अलीकडे माझ्या तगाद्यांना त्यांनी उडवाउडवीचीं उत्तरें देण्यास सुरवात केली आणि गेल्या दीड महिन्यापासून ते नापत्ता झाले आहेत! मग त्यांनी आपल्या जिवाचें कांही बरें वाईट केलें की काय, कुणास ठाऊक.

पद्माकर—बऱ्यावाइटाची पर्वा न करितां दुसऱ्याच्या वित्ताशीं, प्राणांशीं, अब्रूशीं वाटेल तसा धिंगाणा घालणारा इसम स्वतःच्या जिवाचें बरें-वाईट करील, अशी शंका तरी तुम्हांला कशी येते? एका स्त्रीच्या जन्माचें मातेरें केल्यानें त्याच्या अधाशी मनाचें समाधान कसें होणार! त्याने दुसरीवर आपल्या कपटाचें जाळें पसरलें आहे. तिचा पुरा नाश केल्यावाचून तो तें जाळें आवरणार नाही.

पद्मा—अशी दुर्दैवी स्त्री तरी कोणती? तिच्याकडे मी गेलें, तर मला त्यांचा पत्ता काढितां येईल आणि साधल्यास तिला त्यांच्या कचाटयांतून सोडविण्याचें श्रेयहि मिळवितां येईल. सांगाल का तिचें नांव?

पद्माकर—तिच्या नांवाचा बोभाटा न करण्याचें कबूल कराल, तर सांगतों.

पद्मा—नाही करणार.

पद्माकर—माझा तुमच्यावरील विश्वास परत आल्यामुळेच मी हें रहस्य तुम्हांला सांगायला तयार झालों. ती स्त्री माझी पुतणीच आहे. त्या उभयतांमध्ये पत्रव्यवहार झाला असून तिचा त्याला वरण्याचा संकल्पहि झाला आहे.

पद्मा—अरेरे! गरीब बिचारी गाय! तिला या संकटाच्या कर्दमांतून वर काढितां येईल, तर मी आपल्या या विश्वासाला पात्र ठरून आपल्या उपकाराच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त होईन.

पद्माकर—या वेळीं आमच्या ललितेच्या चारित्र्यावर आणि रंगनाथाच्या हालचालींवर जागरूकपणें पहारा करणारें खात्रीचें माणूस पाहिजेच होतें. तें काम तुमच्यापेक्षा चांगलें कोणाकडूनच होणार नाही. तुम्ही जर रंगनाथाला कैचींत पकडून विवाहाचें वचन पार पाडायला लाविलें, तर त्यामुळे तुमच्याच केवळ नाही तर ललितेच्याहि शीलाचें रक्षण होईल. मी आमच्या कृष्णाला आणि त्याच्या बायकोला रंगनाथाच्या मागावर राहायला मुद्दाम बजाविलें आहे. पण त्यांच्यापेक्षा जिव्हाळ्याचें माणूस या कामीं मला पाहिजेच होतें. तुमच्या येण्याने ती उणीव आपोआपच दूर झाली आहे. मात्र यापुढे तुमच्यावर किंवा ललितेवर कोणताहि बिकट प्रसंग येऊं नये, म्हणून मी ही गुप्ती तुम्हांला नजर करितों तिचा स्वीकार करा आणि ती काळजीने जपून ठेवा. (गुप्ती देतो).

पद्मा—आपला कृपाप्रसाद म्हणून मी तिचा आदराने स्वीकार करितें, आणि माझी संरक्षक देवता म्हणून मी तिला नेहमी जवळ बाळगीन.

पद्माकर—आमचा कृष्णा तुमच्याबरोबर ललितेचें घर दाखवायला येईल. तिचें घर येथून जवळच आहे. कृष्णा, अरे कृष्णा, इकडे ये पाहूं. (कृष्णा येतो.) पद्माला ललितताईचें घर दाखीव.

कृष्णा—हा पहा मी तयारच आहें. चला, पद्माबाई.

पद्माकर—आणि डोक्यावर टोपी न घालतांच निघणार वाटतें! पण अलीकडे तूं डोकेंच हरवून बसला आहेस. मग टोपीची जरूर कशाला भासेल?

कृष्णा—हा पाहा, टोपी घालून धावतच आलों.

पद्माकर—घर दुरून दाखविलेंस, तरी चालेल. दाखविल्याबरोबर परत ये.

कृष्णा—(खट्टू होऊन) घरांत जाऊं नको म्हणतां!

पद्माकर—असा खट्टू होत असशील, तर घरांतहि जाण्याची परवानगी देतों. मात्र तेथे फार

वेळ थांबूं नकोस. राधेच्या हातचा चहा घे, आणि ताजातवाना होतांच परत ये. नुकतेंच तुला जें काम सांगितलें, तेंहि ध्यानांत असूं दे. तो गृहस्थ घराभोवती घिरट्या घालतांना दिसला, तर तावडतोब मला वर्दी दे. (कृष्णा जातो.) पद्माबाई, कृष्णा परत येईपर्यंत मी ललितेला देण्याकरितां तुम्हांला एक परिचयपत्र लिहून देतों. चला. (जातात.)

प्रवेश २ रा

[रंगनाथ व ललिता]

ललिता—उशिराने का होईना, आपण आलांत, हें बरें झालें. मी आपलीच वाट पाहत होतें.

रंगनाथ—विवाहाच्या वेळीं तुझ्या चित्ताला जो धक्का बसला आणि माझ्याबद्दल जी दहशत उत्पन्न झाली, त्यांच्यानंतर माझें तुझ्याकडून आनंदाने स्वागत होईल, अशी मला कल्पना नव्हती.

ललिता—त्याला तसेंच कारण झालें आहे.

रंगनाथ—माधवाने आपल्या लग्नाला संमति आणि पन्नास हजार रुपये देण्याचें कबूल केलें की काय?

ललिता—छे, आपण गेल्यापासून माधव इकडे फिरकलाहि नाही. पत्रें परत मिळत तोंपर्यंत येथे न येण्याची त्याने शपथच वाहिली आहे ना! तो सारखा आपल्याच शोधांत आहे आणि वाटेल तें करून तीं पत्रें परत मिळविण्याचा त्याने ध्यासच घेतला आहे, असें काका सांगत असतो.

रंगनाथ—त्यांबद्दल तो एक लाख रुपये देईल?

ललिता—त्याने त्या रुपयांवरचा हक्क केव्हाच सोडून दिला आहे, मग न द्यायला काय झालें? पण त्याची प्रचीती कशी यायची? आपणाला त्या पत्रांची किंमत थोडीच मागायची आहे?

रंगनाथ—मागायची नसली, तरी पत्रें परत देण्याचें नाकारून त्या किंमतीवर पाणी तर सोडायचें आहे ना? मला आधी माधवाला भेटलें पाहिजे.

ललिता—आणि, माझी आनंदाची बातमी ऐकल्यावाचूनच आपण जाणार?

रंगनाथ—माधव त्या पत्राकरितां लाख रुपये द्यायला तयार आहे, याहूनहि आनंदाची बातमी आहे म्हणतेस?

ललिता—ती ऐकून आपल्या आनंदाला पारावार राहणार नाही. पण ती सांगण्यापूर्वी आपणाला एक प्रश्न विचारला पाहिजे. नवऱ्याचें बायकोवर विशेष प्रेम कशाने जडतें?

रंगनाथ—त्याला तिजपासून द्रव्यप्राप्ति झाल्याने.

ललिता—माझी मोठी निराशा झाली. सोन्यासारखें मूल द्रव्यापेक्षाहि मोलाचें नसतें का?

रंगनाथ—सोन्यासारखें असतें, म्हणूनच त्याचें मोल.

ललिता—मूल सोन्यासारखें नसून वेडेंविद्रें असलें, तरी आईला तें अमोलच वाटतें.

रंगनाथ—पण तसें बापाला वाटण्याचें कारण नाही. मूल मोठें झालें, म्हणजेच त्याच्यापासून पैशाची प्राप्ति होणार. तोंपर्यंत तें खर्चाला आणि त्रासाला मात्र कारण होतें! आईच्या तारुण्यावर घाव घालून तें बापाच्या सुखाचा उच्छेद करितें, तें निराळेंच.

ललिता—मुलाच्या जन्माने नवऱ्याचें बायकोवरील प्रेम दृढ होण्याऐवजी उडूनच जातें तर! एकंदरींत पुरुषांची जात निष्ठुर असते म्हणतात, तेंच खरें!

रंगनाथ—बायका काय कमी निष्ठुर असतात? त्याशिवाय का त्या भ्रूणहत्येसारख्या क्रूर कृत्याला तयार होतात?

ललिता—कोण चांडाळणी होत असतील, त्या असोत! आणि त्यांच्यावर तसाच प्रसंग आल्याशिवाय तशा कसाबकरणीला त्या तयारहि होत नसतील. मूल हा देवाचा कृपाप्रसाद आहे. तो मोठ्या भाग्याशिवाय मिळत नाही. त्याकरितां आम्ही बायका व्रतें-वैकल्यें करितों, बाळंतपणाचे हाल आनंदाने सोसतों आणि म्हातान्या होऊन

नवऱ्याचें प्रेम गमावून बसतों. मग पोटचा गोळा काळाच्या स्वाधीन करायला आमचा हात वाहावेल तरी कसा ? मी नाही ग बाइ माझ्या बाळाला कधी चोट देखील लावणार.

रंगनाथ—आणि मी लावीन वाटतें ?

ललिता—मग आपल्या बाळापासून आपणांला आनंद होईल तर ?

रंगनाथ—अलबत्.

ललिता—त्याच्यापासून पैसा मिळाला नाही, तरी सुद्धा ?

रंगनाथ—पैसा मिळणार आहे, म्हणूनच.

ललिता—पैसा तो कसा मिळणार ?

रंगनाथ—मूल होण्याचा संभव दिसूं दे, म्हणजे सांगेन.

ललिता—मग सांगावेंच तर. कारण तीच आनंदाची बातमी मला सांगायची होती.

रंगनाथ—काय म्हणतेस, ललिते ? खरेंच आहे ?

ललिता—त्याबद्दल मी आपली खात्री करून घेतली आहे.

रंगनाथ—आपला विवाह फलद्रूप झाला तर ? हें ऐकून माझा आनंद गगनांत मावेनासा झाला आहे. आपलें बाळ मोठें सुलक्षणी निपजणार. इतर मुलें बापाच्या मरणानंतर त्याची जिनगी लाटतात. पण आपलें बाळ जन्मापूर्वीच बापाला दौलत मिळवून देणार ! माझी लाडकी खरोखर लक्ष्मीचा अवतार आहे. तिचीं पत्रें म्हणजे मोठमोठ्या किंमतीच्या दर्शनी हुंड्या आणि तिचें अपत्य म्हणजे मोठ्या मोलाची मुदतीची-नव्हे, दर्शनी हुंडी आहे.

ललिता—पैशाच्या ध्यासानें आपणाला तरी भ्रम झाला आहे, किंवा मला तरी आपल्या म्हणण्याचा अर्थ कळला नाही.

रंगनाथ—लवकरच कळेल. मी राणीसाहेबांना पुन्हा भेटेन, तेव्हा रिक्त हस्तानें भेटणार नाही, येवढेंच तूर्त सुचवून ठेवितों. (जातो. ललिता कांहीं वेळ त्याच्याकडे पाहते व नंतर दीर्घ निःश्वास सोडून निघून जाते.)

प्रवेश ३ रा

[कृष्णा व पद्मा]

कृष्णा—हें पाहिलेंत ललितातांईचें घर. मी जातों आंत चहा घ्यायला. (जातो, रंगनाथ प्रवेश करितो.)

पद्मा—आजपर्यंत मला गुंगारा दिलात. पण अखेरीस मी आपणाला गाठलेंच.

रंगनाथ—कोण ? माझी लाडकी पद्मा ! आणि, तूं इकडे कुणीकडे ?

पद्मा—हा प्रश्न मलाच आपणांला विचारला पाहिजे. आपलें या घरीं बरेंच येणें-जाणें दिसतें. येथे एखादीचा पूर्वजन्मींचा दावा तर नाही ना साधायचा ?

रंगनाथ—पद्मे, तुला सोडून मी दुसरीचा--

पद्मा—गळा कसा कापीन म्हणतां ? माझा कापलांत तसाच.

रंगनाथ—हें तुझें मजवर केवळ कुभांड आहे.

पद्मा—मग आजवर दडी देऊन कां बसलां होतां ?

रंगनाथ—हें पहा, पद्मे, तुझ्याशीं लग्न करायला मी अगदी उतावळा झालों आहें. पण प्रथम पैशाची सोय केल्याशिवाय लग्न तरी कसें करायचें, तूंच सांग.

पद्मा—कुटुंबाचा योगक्षेम चालवायला मी खबरदार असल्यावर आपणांला त्याची काळजी कशाला ?

रंगनाथ—म्हणजे, मी बायकोच्या जिवावर चैन करूं म्हणतेस ? छे, तें मुळीच होणार नाही आपल्याकडून. त्यांतून तुझा तो सुइणीचा धंदा मला मुळीच पसंत नाही. रात्रीं-अपरात्रीं अनोळखी वस्तींत एकटें जावें लागायचें, आणि अशा एखाद्या प्रसंगीं—

पद्मा—एखाद्या नरपशूनें नामर्दपणें हल्ला केला, तर कसें करायचें म्हणतां ?

रंगनाथ—तूं तर माझा शब्दहि खाली पडूं देत नाहीस.

पद्मा—हं बोला, काय बोलायचें असेल तें,

रंगनाथ—हें पहा, आजच माझ्या हातीं मोठी रक्कम येणार आहे. ती पदरांत पडली की, मी थेट तुजकडेच येतों. कोठे येऊं सांग.

पद्मा—हल्ली मी याच घरीं राहण्याचें ठरविलें आहे.

रंगनाथ—या घरीं ?--आणि, तें कशा-करितां ?

पद्मा—ललिताताईंवर नजर ठेवून त्यांचें एका कामांधापासून रक्षण करण्याचें काम मीं पत्करलें आहे.

रंगनाथ—त्या पद्माकरानेच हें काम तुजवर सोपविलेलें दिसतें. माझ्या शत्रूच्या कामाचा पत्कर घेतांना तुला कांहीं दिक्कत वाटायला हवी होती, पद्मे.

पद्मा--माझाहि त्यांत स्वार्थ आहे. ललिता-ताईंचें रक्षण झालें, म्हणजे माझ्या लग्नासंबंधाने मी निर्धास्त होईन.

रंगनाथ--तुला माझ्यासंबंधाने अजून संशय असेल आणि पद्माकराशीं लग्न करायची तुझी इच्छा असेल, तर मी तुझी मुक्तता करायला तयार आहें.

पद्मा--मुक्तता करायला आपण तयार असाल. पण ती करून घ्यायला मी तयार पाहिजे ना ? आणि देवाला तरी कुत्र्याने उष्टावलेल्या ताटाचा नैवेद्य कसा चालेल ! तें कांहीं नाही. मला तुमच्याशीं आणि तुम्हांला माझ्याशीं लग्न केल्या-शिवाय तरणोपायच नाही.

रंगनाथ—ठीक आहे. रक्कम मिळतांच मी येथे येतों. आणि, मग तूं आणि मी मिळून लग्न करण्याच्या तयारीला लागूं.

पद्मा—पण परत येण्याचें वचन देण्याची ही आपली पहिलीच खेप नाही. तें वचन पुरें करालच, याचा मला भरवसा नाही. कांहीं तरी मजजवळ तारण ठेवल्याशिवाय मी आपणांला मोकळें सोडायची नाही. येथून थेट स्टेशनावर जाऊन दूरचें तिकीट काढून निघून गेलांत तर काय करायचें ! हं, अंगावर आणि खिशांत काय काय असेल, तें माझ्या स्वाधीन करा आधी, आणि मग जा वाटेल तिकडे.

रंगनाथ—मोठी पंचाईत आली बोवा. (खिशांतील पाकीट काढून पद्मेला देतो.) माझ्या अंगावर कांहीं नसतें, हें तुला माहीत आहेच.

पद्मा—ती बोटांतली अंगठी आहे ना ? चांगली मूल्यवान आहे. दोन चार हजार रुपये यायला हरकत नाही. ही तर तुमच्याजवळ राहून मुळींच उपयोग नाही. काढा ती अगोदर. हीच विकून रक्कम उभी करणार नव्हता ना ?

रंगनाथ—छे, छे, अशा देणग्या कुणी विकीत का असतें. (पद्मेला अंगठी देतो.)

पद्मा—देणगी ! कोणा तरी प्रियकरणीचें प्रेमचिन्ह दिसतें आहे, हें.

रंगनाथ—माझ्या दूरच्या एका बहिणी-कडून ती भेट म्हणून आली आहे.

पद्मा—भाऊबिजेची ओवाळणी म्हणून आली असेल. अशा तुमच्या किती तरी दूरच्या बहिणी मला माहीत आहेत. त्या जवळ आल्या म्हणजे मात्र स्वतःच्या बायकांप्रमाणे वाटूं लागतात !

रंगनाथ--तुला आपणाप्रमाणेच सगळें जग वाटतें. हें पहा. ही आंगठी मी तुला दिली आहे. पण ती ललितेला दाखवायची नाही, बरें.

पद्मा—कां बरें ?

रंगनाथ—त्याचें कारण तुला रक्कम मिळाल्यावर सांगेन. तसेंच, तुझा माझा काय संबंध आहे हेंहि तिला सांगायचें नाही. माझी दूरची बहीण आहेस, म्हणून सांगितलेंस तर चालेल.

पद्मा--जवळच्या आप्तांपेक्षा दूरच्या बहिणीच आपल्या फार उपयोगी पडतांना दिसतात !

रंगनाथ--ती आंगठी आधी तुझ्या पाकि-टांत ठेव आणि मग जा आंत. (पद्मा एका बाजूने व रंगनाथ दुसऱ्या बाजूने जातात.)

प्रवेश ४ था

[कृष्णा व राधा]

राधा--येथे येऊन चार मिनिटें सुद्धा झालीं नाहीत. आणि इतक्यांत निघालांत सुद्धा !

कृष्णा—मला तर वाटतें, दोन मिनिटें सुद्धा झालीं नाहीत. पण करायचें कसें ! गेलों

नाही, तर तिकडे दवाखान्यांत बसलेले कपाळशूळ, पोटदुख्या माझ्या नांवाने ओरड करायच्या. पाहूंच या किती वेळ झाला तो. (खिशांतलें घड्याळ पाहून) अरेच्चा ! मला येऊन तब्बल अर्धा तास झाला की ! हीं घड्याळें कोणी तरी अविवाहित अरसिकाने बनविलेलीं दिसतात. तिकडे दवाखान्यांत असलों की, काटे हलतां हलत नाहीत. आणि इकडे आलों की, त्यांची पळण्याची शर्यतच लागते !

राधा—येथला वेळ तरी सगळा सार्थकीं लागायचा होता ! पाऊल टाकलें न टाकलें, तों तिकडची विवंचना सुरू होते. अमक्याची जखमच बांधायची राहिली, तमक्याला औषधच द्यायचें राहिलें, आणि तमक्याला पोटीसच बांधायचें राहिलें, हीच विवंचना सारखी लागलेली असायची. चहा घेतांना हा फलाण्या काढ्यासारखा दिसतो, उसळ दिली तर ती गोळ्यांसारखी दिसते, अशी सारखी तिकडची आठवण होत राहायची !

कृष्णा—तिकडे गेलों की, इकडची आठवण होऊं लागते आणि चोहोंकडे तुझी हसतमुख मूर्ति दिसूं लागते. आज सकाळीं मी रोग्याकरितां म्हणून एक मिश्रण तयार केलें. पण इतक्यांत तो तुझ्या हातचा चहा आहे, असा भास होऊन मी तें स्वतःच घटाघटा पिऊन गेलों, आणि समोर अंधारांत एक दमेकरी म्हातारा बसला होता, त्याला तूंच समजून मी इतक्या जोराने मिठी मारली की, त्याचा जीव कासावीस होऊन गेला !

राधा—मिठ्या मारायला नेहमी म्हातारेच मिळतात ना ? तरण्या-ताठ्या मुली मिळूं लागल्या म्हणजे मलाच तेथे यावें लागेल.

कृष्णा—राधे, तूं जर तेथे परिचारिका होऊन आलीस तर किती किती मौज होईल म्हणून सांगूं ? खरें विचारशील तर तुला औषधें तयार करण्याचें आणि आजाऱ्याची शुश्रूषा करण्याचें काम मुळीच अवघड जाणार नाही. तूं मेतकूटमसाला तयार करतेस ना ? तशींच चूर्णे तयार करायचीं आणि आमटी तयार करतेस, तसा काढा तयार करयचा, बुंदी पाडतां आल्यावर गोळ्या करणें केवळ हातचा मळ, आणि पिठलें आल्यावर पोटीस म्हणजे नुस्ता पोरखेळ आहे ! अरे, पण पोटिसाचा विचार येतांच दवाखान्याची आठवण झाली. जाऊं आता ? मघाच्या अर्ध्या तासानंतर बोलण्यांत पुन्हा अर्धा तास गेला.

राधा—आता पुन्हा केव्हा येणार गडे ?

कृष्णा—डॉक्टर साहेबांनी मला त्या रंगनाथाच्या टेहळणीवर ठेवल्यापासून मला वाटेल तेव्हा येथे येण्याची सोय झाली आहे. टेहळणीचें काम मात्र इमानें-इतबारें होत नाही. राधे, मी दहा मिनिटांतच परत येतों. तोंपर्यंत कसा तरी धीर धर.

राधा—सबंध दहा मिनिटें ? कसा वेळ जाईल, तो खरा ! (कृष्णाला मिठी मारते.)

कृष्णा—अहाहा ! तूं अशी मिठी मारलीस म्हणजे भाजलेल्या भागावर जशी मलमपट्टी, तशी तूं शीतल वाटतेस. पण या मोहांतून सुटका करून घेतलीच पाहिजे. आता एक साखरेचा दिलास म्हणजे निघालोंच.

राधा—छे ग बाई, तें नाही व्हायचें. हें काय ? लागलीच तोंड आंबट केलेंत की !

कृष्णा—या आंबट तोंडांत साखरेचा मिळाला, म्हणचे गोड सरबत होण्याला काय उशीर ?

राधा—गरम चहावर थंड सरबत द्यायचंं एखादं. मी डाक्तर नसलें, तरी मला ही साधी गोष्ट कळते हो ! (जातात.)

प्रवेश ५ वा

[रंगनाथ व माधव]

माधव—रंगनाथ, गेला दीड महिना तुलाच शोधीत होतों. कोठे गेला होतास ?

रंगनाथ—अरे, आम्ही काय तुझ्यासारखे वडे वकील आहोंत एकाच जागीं बसून राहायला ? पोटासाठी वणवण करीत हिंडावें लागतें. माधव, सारीं सोंगें आणितां येतात. पण पैशाचें सोंग आणतां येत नाही. सध्या तर मी अगदी डबघाईला आलों आहें !

माधव—तूं मनांत आणिलें असतेंस, तर तूंहि माझ्यासारखा मिळविता झाला असतास.

रंगनाथ—पण व्यसनांत बुडालों, म्हणून वाया गेलों, असेंच ना तुझें म्हणणें ? कबूल, सर्वस्वीं कबूल. गरिबाला लाज बाळगून उपयोग नाही. मग सुचवितोस का एखादी पैसे मिळविण्याची युक्ति ?

माधव—माझ्या उपयोगीं पडशील, तर मीहि तुझी गरज भागवीन.

रंगनाथ—कबूल आहे. बोल, मी तुझें कोणतें काम करायचें ?

माधव—तुझ्या जवळचीं कांही पत्रें मला पाहिजे आहेत.

रंगनाथ—(खिशांतून पत्रें काढीत) हीं पाहा माझ्या सावकारांच्या तगाद्यांचीं पत्रें. त्यांच्या रकमा देशील, तर तीं तुझ्या हवालीं करितों.

माधव—यापेक्षा नाजूक व्यवहारांतलीं पत्रें मला पाहिजेत.

रंगनाथ—म्हणजे प्रणयपत्रिका वाटतें ?

माधव--नाही, नाही. मला एका स्त्रीचीं साधीं पत्रेंच पाहिजे आहेत.

रंगनाथ—पण मला स्त्रियांचीं साधीं पत्रें कधीच येत नाहीत.

माधव—बरें, प्रणयपत्रिका का म्हणेनास !

रंगनाथ—माधव, तो तुझा विषय नाही, आणि त्यांत तूं पडूं नयेस, हेंच उत्तम. त्या पत्रांत कांही वैचित्र्य असतें, असें समजत असशील, तर ती तुझी चूक आहे. इतर व्यवहारांतल्याप्रमाणें याहि व्यवहारांतील पत्रें अगदी एकाच नमुन्याचीं असतात. वरचा मायना 'माझे परमप्रिय जिवितेश्वर' असा आणि सही 'आपली लाडकी' या विशेषणानिशीं असायची. त्या पत्रांनी तुझी कांहीच करमणूक होणार नाही.

माधव—मला त्या पत्रांनी करमणूक करून घ्यायची नाही. मला तीं वाचायचींहि नाहीत.

रंगनाथ—वाचायचीं नसतील तर तीं अमकीचींच पत्रें, हें तूं ओळखणार कसें ? समज, मी तुजजवळून पांचदहा हजार रुपये घेऊन भलत्याच एखाद्या स्त्रीचीं पत्रें तुझ्या स्वाधीन केलीं, तर माझें कपट तुला उमगावें कसें ? मी कपट करणारा इसम नाही, ही गोष्ट अलाहिदा.

माधव--मी तीं पत्रें लेखिकेलाच नेऊन देईन, म्हणजे झालें.

रंगनाथ--एखाद्या कुमारिकेचीं मला पत्रें आलीं आहेत, असें जरी मी नुसतें तुझ्यापाशीं कबूल केलें, तरी सुद्धा मजकडून तिचा विश्वासघात केल्यासारखें होईल. मग तीं पत्रें तुझ्या हवालीं करण्याचा प्रश्न दूरच राहिला !

माधव—मी ज्या कुमारिकेचीं पत्रें मागतों आहे, तिच्या तर्फेच मी तुला त्यांची मागणी करीत आहें.

रंगनाथ—मग गोष्ट निराळी आहे. पण मला प्रेम दाखवून नंतर माझा विश्वासघात करणारी अशी कोणी कुमारी असेल, असें मला वाटत नाही. तिचें नांव तरी कळूं दे.

माधव—नाही, नाही. तुझा विश्वासघात करण्याचा तिचा मुळीच विचार नाही. तूं तिचीं पत्रें परत करशील, तरच तिने तुझ्याशीं असलेला संबंध सोडून देण्याचें कबूल केलें आहे.

रंगनाथ—म्हणजे एकतर तिचें मजवर प्रेम नसेल किंवा असलें, तर मजकडून प्रेमभंग झालेला पाहून तरी ती माझें नांव सोडणार असेल.

माधव—तिचें तुझ्यावर प्रेम तर नाहीच उलट तुझ्यापासून सुटका झाली, तर करून घेण्याची तिची इच्छा आहे. मग तिचीं पत्रें स्वतःपाशीं ठेवून तिची विनाकारण कुचंबणा कां करतोस ?

रंगनाथ—तूं म्हणतोस तेंहि खरें आहे. पण तिच्यातर्फे इतकी उठाठेव करण्याचें तुला काय कारण ? तिची मजपासून सोडवणूक करून तिला स्वतःच लाटायची आहे वाटतें ?

माधव—छे, छे, ती मला बहिणीसारखीच राहणार.

रंगनाथ—बहीण मानणार असशील, तर कांही हरकत नाही. मी इतका रंगेल. पण माझ्याहि मानीव बहिणी बऱ्याच आहेत. बरें, तुझा तिच्यावर डोळा नसेल तर तिच्या पैशावर तरी असेल !

माधव--मला तिच्याशीं लग्नच करायचें नाही, तर तिचा पैसा तरी मला कुठून मिळणार ? खरें सांगूं ? मला तिच्या वडिलांकडून पैसा मिळण्यासारखा होता. पण मी त्याजवरील हक्क सोडून दिला आहे. मी तुला तिच्या पत्रांची जी किंमत देणार आहें, ती त्या पैशांतूनच देणार आहें. वास्तविक पाहतां त्या पत्रांची तूं किंमतच घेऊं नये. कारण अशा पत्रांची किंमत करणेंच चुकीचें आहे. शिवाय त्या कुमारिकेला स्वतःच अडचणींत घालून त्या अडचणीवर किफायत मिळविणें अधमपणाचेंहि आहे.

रंगनाथ—माधव, मी तुझ्यासारखा पैसे बाळगून असतों, तर तुझ्यासारखाच वेदांत सांगितला असता. पण मी पडलों गरीब माणूस. त्या कुमारिकेसारखाच अडचणींत आलेला ! तेव्हां हा वेदांत मला बोलतांहि येत नाही आणि कळतहि नाही, याची क्षमा कर.

माधव--म्हणूनच तर मी पत्रांबद्दल योग्य मोबदला द्यायला कबूल झालों. बोल, प्रत्येक पत्राबद्दल तूं काय मूल्य घेशील ? शंभर रुपये ? दोनशे ? तीनशे ?

रंगनाथ--तें मूल्य त्या कुमारिकेच्या सौंदर्यावर, कुलावर आणि शीलावर ठरणार. कोळसे आणि हिरे एकाच मापाने विकून कसें भागेल !

माधव--तिचें सौंदर्य, कुलशील सर्व कांही उत्तमांतलीं आहेत, असें समज.

रंगनाथ--मग प्रत्येक पत्रामागे तूं दोन-दोन हजार रुपये मोजलेस, तरी तुला सौदा स्वस्तांत पडल्यासारखा होईल.

माधव—ठीक आहे. मी सहा हजार रुपये मोजून द्यायला तयार आहें. मग सौदा पक्का झाला, असें मी समजूं ?

रंगनाथ—सहा हजार रुपये ? म्हणजे तीन पत्रें झालीं. तीन पत्रें मला एकटया ललितेकडूनच आलीं आहेत. तीं मी पंचप्राणापलीकडे जपून ठेवितों आणि माझ्या हृदयाशीं बाळगतों. तुला तिचींच पत्रें पाहिजेत का ?

माधव—होय.

रंगनाथ—मग हें मघाशींच कां नाही सांगितलेंस ? उगीच इतका वेळ फुकट दवडिलास !

माधव—कां बरें ?

रंगनाथ—मला तीं पत्रें विकायचींच नाहीत. इतर स्त्रियांची गोष्ट निराळी आणि ललितेची निराळी.

माधव—मी मघाशीं तिचें नांव घेतलें नाही, खरें. पण वर्णन बरोबर केलें होतें.

रंगनाथ—ती सुंदर, कुलवान, शीलवान आहे, येवढेंच तूं वर्णन केलें होतेंस. पण ती आपल्या बापाची एकुलती एक मुलगी आणि वारस आहे, हें सांगितलें नव्हतेंस. विकावयाच्या वस्तूच्या वर्णनांत अशी घोडचूक झाली, तर सौदा नाकबूल करितां येतो, हें माझ्यापेक्षा तुलाच चांगलें माहीत असणार. ललितेच्या पत्रांच्या आधाराने मला एक लाख रुपयांचा मालक होतां येणार आहे. तीं पत्रें मी सहा हजारांत देण्याला कबूल झालों, माझ्यासारखा बेवकूब मीच म्हटला पाहिजे !

माधव—रंगनाथ, ललितेच्या वडिलांची सर्व जिनगी ललितेकडे जाणार, अशी जर तुझी समजूत असेल, तर ती चुकीची आहे.

रंगनाथ—चुकीची कशी ?

माधव—ललितेने माझ्या संमतीने लग्न केलें, तर तिला सारे पन्नास हजार रुपये मिळणार असून माझ्या संमतीवाचून लग्न केलें, तर एक कपर्दिकाहि मिळणार नाही. तिच्या व तुझ्या लग्नाला मी प्रतिकूल असल्यामुळे ती आज तुझ्याइतकीच निर्धन आहे, आणि तिच्याशीं लग्न करून तुझा कोणताच फायदा नाही.

रंगनाथ—तूं जर तिच्याशीं भावाप्रमाणे वागणार आहेस, तर आमच्या लग्नाला तुझी आडकाठी कां असावी, हें कळत नाही !

माधव—कारण तुझ्याशीं लग्न करून तिला कांहीच सुख मिळणार नाही, अशी माझी खात्री आहे. आणि, ज्यांत तिला सुख नाही, त्याला मी कालत्रयीं संमति देणार नाही.

रंगनाथ--तूं सुखांत मनःस्वास्थ्याचा समावेश करीत नाहीस, असें दिसतें.

माधव--तिचें तुझ्याशीं लग्न झालें नाही, तर तिचें मनःस्वास्थ्य बिघडण्याचें कारण काय ?

रंगनाथ—माझ्याशीं लग्न न झाल्याने तें बिघडणार नाही. पण माझ्या ताब्यांत तिचीं पत्रें राहिल्याने तें खास बिघडेल !

माधव—त्याकरितांच तर तुला सहा हजार रुपये द्यायचे.

रंगनाथ—मला इतरांकडून त्यांबद्दल तीस हजार रुपये मिळण्यासारखे आहेत. मग मी सहा हजारांवर का संतुष्ट रहावें ?

माधव—काय म्हणतोस, रंगनाथ ! तुझ्या प्रियकरिणीच्या पत्रांचा तूं लिलाव मांडणार ? इतका नीच तूं खास नाहीस.

रंगनाथ—योग्य मोल देणारे मातब्बर खरेदीदार मिळाले, तर मी त्यांचा लिलांव कां करूं नये ? सुंदर विदुषी ललिता इचीं प्रणय-पत्रें विकावयास निघालीं आहेत, असा बोभाटा होण्याचाच अवकाश की शेंकडो रंगेल लक्ष्मीपुत्र दहा-दहा वीस-वीस हजारांच्या थैल्या घेऊन माझे उंबरठे झिजवूं लागतील. आणि, त्यांच्यामध्ये चढाओढ लागली, तर पत्रांच्या किंमतीचा आकडा पांच लाखांपर्यंतहि जाईल. याचा परिणाम असा होईल की, ललितेची अब्रू आज सवालाखाची झाकली मूठ आहे, ती किती पोकळ आहे, हें साऱ्या रंगेल आणि कुटाळ जगाला कळेल, आणि तिच्या मनावर या घटकेला एकाची सत्ता आहे, तिच्याऐवजी तीन जणांची सुरू होईल ! बाकी, एकतंत्री राज्यापेक्षा शिष्टजनसत्ताक राज्य केव्हाहि श्रेष्ठच असतें !

माधव—नीचा, हे घाणेरडे फूत्कार सोड-णारी तुझी जिव्हा तिच्या बिळांतून क्षणार्धांत उपटून टाकिली असती ! पण ह्याने ललितेच्या मनाला दुःख होईल, म्हणूनच तुझी गय करतों !

रंगनाथ—ललितेच्या मनाला सुख देण्याचें ढोंग आता पुरें कर. तुझी तशी इच्छा असती तर तूं मघाशींच तीस हजार रुपये हसत माझ्या पदरांत घातले असतेस.

माधव—(खिशांतून नोटा काढून व रंगनाथाच्या अंगावर फेकून) हं, चल, घे या नोटा आणि तीं पत्रें मुकाट्याने माझ्या स्वाधीन कर. आणि, एक शब्दहि बोलूं नकोस. (रंगनाथ नोटा घेतो व खिशांतून पत्रें काढून माधवास देतो.)

रंगनाथ—हें पहा, माधव, तूं नोटा माझ्या अंगावर फेकून मारिल्यास. पण सुंदर स्त्रीच्या लाथांचा मार मला जितका गोड वाटेल तितकाच लक्ष्मीच्या या लाथांचाहि वाटत आहे. आणखी तीस हजारांच्या नोटा असतील, तर त्यांचा माझ्या अंगावर खुशाल मारा कर !

माधव—आता तुझ्या दृष्टीला एक छदामहि पडणार नाही.

रंगनाथ--पाहूं या पडतो की नाही, तें ! माझ्याजवळ असलेल्या ललितेच्या वस्तूच्या जोरावर मला तीस हजार मिळवितां आले. आता तिच्याजवळ असलेल्या माझ्या एका वस्तूच्या जोरा-वर आणखी सत्तर हजार काढीन, आणि शिवाय तिच्याशीं लग्न करण्याबद्दल परवानगी मिळवीन. इतकेंच नव्हे, तर विनंती आणि मनधरणी तुजकडून करून घेईन, तरच नांवाचा रंगनाथ.

माधव--रंगनाथ, तूं बोललास त्याचा अर्थ तरी काय ?

रंगनाथ--माझे शब्द तुला कडू वाटतात. तूं त्याचा अर्थ ललितेलाच विचार. (एका बाजूने माधव जातो व दुसऱ्या बाजूने रंगनाथ थोडेंसें जाऊन परत फिरतो व माधवाच्या मागोमाग जातो.)

अंक तिसरा

प्रवेश १ ला

[ललिता व पद्मा]

ललिता--पद्माबाई, तुमची कहाणी ऐकून मला तुमची मनस्वी कीव वाटूं लागली आहे. पण तिच्याबरोबर त्या चांडाळाचा तितकाच संताप आला आहे. सुइणीचा आणि परिचारिकेचा धंदाच असा धोक्याचा ! त्यांत अशा नरपशूंना आपला पापी मतलब साधायला चांगलेंच फावतें. मलाहि आता स्वतःच्या चरितार्थाकरितां एखादी अभ्या-

पिकेची नोकरी शोधून काढावी लागेल. पण ती तुमच्या धंद्यासारखी जोखमीची नाही.

पद्मा--बाईसाहेब, येवढया जिनगीच्या मालकिणीला नोकरी करण्याची पाळी ?

ललिता--माधव नांवाचा माझा एक दूरचा आप्त आहे. बाबांच्या मृत्युपत्रांत अशी एक अट आहे की, मी त्याच्या संमतीवाचून लग्न केलें, तर मला कांही एक मिळूं नये. माझें ज्याच्याशीं लग्न करण्याचें मी ठरविलें होतें, ते मला फसवितील अशी माधवाला भीति वाटल्यामुळे त्याने आमच्या लग्नाला संमति दिली नाही. आणि म्हणून मला सर्वस्वाला मुकावें लागलें!

पद्मा—तुमच्या लग्नांत बिब्बा घालून तुम्हांला निष्कांचन केल्याने त्या मेल्याला काय मिळालें!

ललिता—पद्माबाई, त्या महात्म्याला दूषण लावूं नका. मजवर त्याचें निस्सीम प्रेम असल्यामुळे माझ्याशीं लग्न करण्याची त्याची इच्छा होती, हें खरें. तसेंच, माझ्या लग्नाला हरकत घेतल्याने त्याला माझ्या वडिलांची संपत्ति मिळाली, हेंहि खरें. पण त्याने हरकत घेतली, ती आपल्या निराशेचा सूड घेण्याकरितां, किंवा ती संपत्ति गिळंकृत करण्याकरितां घेतली नाही.

पद्मा--असें कशावरून म्हणतां ?

ललिता--मला आणि त्या संपत्तीला स्पर्श न करण्याची त्याने शपथ वाहिली आहे. आणि ही भीष्मप्रतिज्ञा त्याजकडून पार पडणार, यांत मला तर संशय वाटत नाही. अशा साधुपुरुषांच्या पुण्याईवरच हें जग चाललें आहे!

पद्मा--मग त्याने तुमच्या लग्नांत विघ्न कां आणिलें ?

ललिता—माझ्या पसंतीच्या पतींनी एका गरीब मुलीला फुसलावून वाईट मार्गाला लाविलें, असा कोणी तरी त्याचा गैरसमज करून दिला आहे.

पद्मा--असा निराधार गैरसमज करून घ्यायला माधवराव फारच भोळे असले पाहिजेत!

ललिता--मीं निवडलेल्या पतीची एक दूरची बहीण आहे. तिला बिघडविण्याचा माधवाच्या एका स्नेह्याचा बेत होता. तो बेत माझ्या पतींनी फिसकटविला, म्हणून त्या स्नेह्याने दंश धरून माधवाचे कान भारिले आणि म्हणून त्याने केवळ माझें अकल्याण होऊं नये, म्हणून आमच्या लग्नाला हरकत घेतली.

पद्मा--ते दंश धरणारे स्नेही कोण ?

ललिता--डॉक्टर पद्माकर. ते पडले माझे चुलते. तेव्हा त्यांना दोष कोणी द्यायचा? आपलेच दात आणि आपलेच ओठ!

पद्मा--पण डाक्टरसाहेब कोणाबद्दल विनाकारण गैरसमज करून घेतील, किंवा त्याचा सूड उगवितील, असें त्यांच्या लौकिकावरून वाटत नाही.

ललिता—लौकिक असतो मनुष्याच्या सार्वजनिक वर्तनावर अवलंबून. त्याचें खाजगी वर्तन त्या वर्तनाशीं जुळून असेल, असेंच केवळ नाही. त्यांतून त्याचा प्रेमभंग झाला, म्हणजे तो मत्सराच्या भरांत कोणत्या थराला जाईल, याचा नेम नसतो.

पद्मा--यांत डॉक्टरसाहेबांची चूक नसून तुमच्या निवडीच्या माणसाचीच चूक असण्याचा संभव आहे.

ललिता--पद्माबाई, तुम्हांला पुरुषांचा जो वाईट अनुभव आला आहे, त्यामुळे तुम्ही अशा शंकेखोर झालांत, हें ठीकच आहे. दुधाने तोंड पोळलें, म्हणजे मनुष्य ताक सुद्धां फुंकून पितें. पण मला तिकडचा अगदी निराळा अनुभव आलेला आहे. किती तरी करारी त्यांचा स्वभाव! शिवाय त्यांनी आपला सद्धेतु अशा कांही बिनतोड प्रमाणांनी सिद्ध केला आहे की, त्याबद्दल शंकेखोरालाहि संशय घेण्याला जागा नाही.

पद्मा—म्हणजे? मी नाही समजलें.

ललिता—तुम्ही या चार घटकांतच आपल्या प्रेमळ वर्तनाने मला आपलेंसें करून टाकिलें आहे. तेव्हा तुम्हांला सांगायला हरकत नाही. खरें सांगूं? त्यांनी माझ्याशीं लग्नहि लावून टाकिलें आहे!

पद्मा--लग्न! आणि डाक्टरसाहेबांना तें कसें कळलें नाही!

ललिता--त्यांत तर सारी मौज आहे! आमचें लग्न लागलें खरें. पण तें अगदी गुप्तपणें! मी काकाला आणि माधवाला लग्नाची परवानगी मागितली होती. पण ती त्यांनी दिलीच नाही. अशा वेळीं गुप्त लग्न करण्याशिवाय दुसरा कोणता उपाय होता, तुम्हींच सांगा!

पद्मा--असें गुप्तपणें लग्न करितां येतें, हें मला माहीत नव्हतें.

ललिता--आपल्या पुराणांतरीं किती तरी नायकांनी असे गांधर्व विवाह केल्याचे दाखले आहेत.

पद्मा--तुमची खात्री असेल, तर माझें कांही म्हणणें नाही.

ललिता--मी मागेपुढे माधवालाच ही गोष्ट सांगणार आहे. तो या लग्नाच्या सशास्त्रपणाबद्दल तुमची खात्री करील.

माधव--(प्रवेश करून) ललिते, तुझी भेट घ्यायची आहे. येऊं का आंत?

ललिता--माधव, तुला शंभर वर्षे आयुष्य आहे. किती दिवसांनी भेटलास हा! आतांच तुझी गोष्ट निघाली होती. पद्माबाईपाशीं एका धर्मशास्त्राच्या मुद्द्याचा प्रश्न निघाला होता.

माधव--ललिते, तुला पद्माबाईसारख्या बाई अनायासें सोबतीण मिळाल्या, हें पद्माकराने मला सांगितलें, तेव्हा मला फारच समाधान वाटलें. यापुढे तूं एकटी राहाणें मुळीच योग्य नव्हतें. आणि, यांच्यापेक्षा योग्य अशी दुसरी सोबतीण तुला मिळणें शक्य नव्हतें.

ललिता--यांनी थोड्याच वेळांत माझा पूर्ण विश्वास संपादन केला आहे.

माधव--मग यांच्या देखत वाटेल त्या विषयावर मोकळेपणानें बोलायला हरकत नाही तर?

ललिता--मुळीच नाही.

माधव--प्रथम तुम्हां दोघींत एवढा बिकट प्रश्न तरी कोणता उपस्थित झाला होता, तें सांग पाहूं.

ललिता--आपणांत लग्नाचे एकंदर आठ प्रकार आहेत ना!

माधव--होय. बरें, मग!

ललिता--त्यांत गांधर्व विवाह नांवाचा एक प्रकार आहे ना?

माधव--होय.

ललिता--पाहिलेंत, पद्माबाई? आता तरी तुमची खात्री झाली ना!

माधव--पण हा प्रश्न आज निघण्याचें कारण काय?

ललिता--तें सांगण्यापूर्वी मला तुझी क्षमा मागितली पाहिजे. माझीं पत्रें परत मिळत तोंपर्यंत त्यांच्याशीं लग्न न करण्याबद्दल तूं मला त्या दिवशीं सांगितलें होतेंस ना?

माधव--सांगितलें होतें, इतकेंच नाही, तर त्यानंतर लागलीच मी तीं पत्रें हस्तगत करण्याच्या खटपटीला लागलों. बरेच दिवस रंगनाथाचा शोध केला, पण त्याचा पत्ताच लागेना. सरतेशेवटीं आज त्याची माझी गाठ पडली, आणि तीं पत्रें मी तीस हजार रुपयांच्या मोबदल्यांत त्याच्यापासून विकत घेतलीं. हीं घे, आणि ताबडतोब जाळून टाक. म्हणजे तुझ्या अविचाराचा इतःपर मागमूस राहायला नको! (ललितेला पत्रें देतो.)

ललिता--काय म्हणतोस? त्यांनी तीस हजार रुपये किंमत घेऊन माझ्या पत्रांचा विक्रय केला? छे, मला नाही हें खरें वाटत!

माधव--ते रुपये दोन घटकांपूर्वी माझ्या खिशांत होते आणि आता तेथे नाहीत, असें असतांहि माझें म्हणणें तुला खरें वाटूं नये? शनिमहात्म्यांतील हार जसा खुंटीने गिळला होता, तसे ते रुपये माझ्या खिशाने गिळंकृत तर केले नाहीत ना?

ललिता--गरिबीमुळे त्यांना द्रव्याचा लोभ असेलहि कदाचित्; पण त्यांचें मजवरील प्रेम द्रव्यलोभापेक्षा फारच मोठें आहे! ते यःकश्चित् तीस हजार रुपयांकरितां प्राणापेक्षाहि आवडतीं असलेलीं पत्रें बाजारांत मांडतील, हें मला शक्यच वाटत नाही!

माधव--त्याचें तुजवर निरपेक्ष प्रेम होतें, हेंहि खोटें! आणि तुझ्या पत्रांची त्याला पैशापेक्षा जास्त किंमत वाटत होती, हेंहि खोटें!

अनुक्रमणिका

ललिता--मी बाबांच्या संपत्तीवरचा हक्क सोडून दिला आहे, हें माहीत असतां त्यांनी माझ्याशीं लग्न करण्याची तयारी दाखविली मग त्यांना लोभी कसें म्हणतोस ?

माधव--पण त्या दिवसानंतर त्याचा येथे प्रवेशच झाला नाही, तर त्याला माहीत तरी कुठून होणार आणि तो लग्नाची तयारी तरी काय दाखविणार ?

ललिता--प्रवेश होण्याचा प्रश्नच नव्हता. कारण बाबांचें मृत्युपत्र वाचिलें तेव्हा ते येथेच होते, आणि त्यांनी आपलें सारें संभाषण आडून ऐकिलेंहि.

माधव--असें ! आणि आमचा डाव आमच्यावरच उलटविला, असेंच ना ? अरे, नीचा ?

ललिता--माधव, त्यांच्यावर असा रागावूं नकोस. ही प्रतारणा मजकडूनच झाली. मला क्षमा कर.

माधव--उगीच त्याची कड घेऊं नकोस. जिला साऱ्या जन्मांत कृत्रिम माहीत नाही, ती माझ्याशीं असें कपट करील आणि ज्याचा सारा जन्म फसवेगिरींत गेला, तो या बाबतींतच सच्चा आहे, हें मला खरें कसें वाटावें, ललिते ? असो, झाल्यागेल्या गोष्टीला इलाज नाही. अजून तरी सावध हो. अजून लग्नसराईला अवकाश आहे. त्यापूर्वी त्याने पत्रें परत देऊन तुझी मुक्तता केली आहे. या संधीचा फायदा घे आणि त्याच्याशीं असलेला संबंध कायमचा तोडून टाक.

ललिता—माधव, ती गोष्ट आता माझ्या स्वाधीन राहिली नाही.

माधव—म्हणजे ? पत्रें परत मिळाल्यावर आता त्याला प्रत्यवाय कोणता राहिला ?

ललिता—आमचा विवाह यापूर्वीच झाला आहे !

माधव—ललिते, काय बरळते आहेस हें ? विवाह झाला, याचा अर्थ काय ? कोणत्या मुहूर्तावर झाला ? कोणाच्या साक्षीने झाला ?

ललिता—गांधर्व विवाहाला मुहूर्तांची आणि साक्षीची जरूर नसते ना ?

माधव—असें ! मघाशीं विवाहाचा प्रश्न निघाला होता, तो तुझ्याच संबंधाने तर ?

ललिता—होय.

माधव—तुमचा गांधर्व विवाह झाला, म्हणजे तुम्ही एकत्र राहिलां होतां, असें का तुझें म्हणणें ?

ललिता—याच घरांत गुप्तपणें एक दिवस पतिपत्नी म्हणून राहिलों होतों.

माधव—अरेरे ! पुरा सत्यानाश झाला. ललिते, त्याचा तर सारा जन्मच असल्या धंद्यांत गेला आहे. पण तूं तरी माझी अशी वंचना करायची नव्हतीस ! आता तुझें रक्षण करण्यास एकटा परमेश्वरच समर्थ आहे !

ललिता—माधव, तुझ्या उद्‌गारांनी माझा थरकाप होतो आहे ! गांधर्व विवाह शास्त्रसंमत आहे, असें तूंच ना मघाशीं म्हणालास ?

माधव—नाही, मीं तसें कधी म्हटलें नाही. पुरातनकालीं तो शास्त्रसंमत होता, पण आता तो मुळीच नाही. त्याने तुला धडधडीत फसविलें.

ललिता—नको. माधव, असें बोलूं नकोस. त्यांचाहि मजप्रमाणेच गैरसमज झाला असेल. मला ते कशाला फसवितील ?

माधव—कशाला फसवितील ? तुझ्या वडिलांची लक्ष्मी घशांत टाकण्याकरितां ! नुसत्या पत्रांकरितां त्याने माझ्यापासून तीस हजार रुपये तर उकळलेच. आणखी किती रुपये काढणार आहे, कुणास ठाऊक !

ललिता—आमचें लग्न बेकायदेशीरच ठरणार तर ! नाही, माधव तसें होणार नाही. आपल्या आर्य पूर्वजांच्या गांधर्व विधीने लाविलेला विवाह अशास्त्र कसा ठरेल ?

माधव—ज्याला गांधर्व विधि समजत होतीस तो रंगनाथाच्या दृष्टीने फसवाफसवीचा एक प्रकार होता व असा एकपक्षीय विवाह केव्हाहि झालें तरी अशास्त्रच ठरणार.

ललिता—माधव, मी अगदी घाबरून गेलें आहे ! तूं माझा पाठीराखा म्हणतोस, मग या संकटांतून तुला माझी सुटका नाही का

करितां येणार ? बोल ना ! हें लग्न कायदेशीर ठरविण्याचा कांहींच मार्ग नाही का ? तूं मोठा कायदेपंडित म्हणून लोक तुझी वाखाणणी करतात. तूं मनांत आणिलेंस, तर खात्रीनें कांहीं तरी तोड काढशील. काढीन म्हणून सांग ना ! तुझें माझ्यावर जर निर्मल प्रेम आहे, तर माझ्यासाठी कायदा पाहणेंच तुला जड जावें का ?

माधव—वेडे, कायद्यांत पाहिजे तें सापडतें, अशी एखाद्या अडाणी कुळाप्रमाणे तुझीहि समजूत आहे का ?

ललिता—तुझ्या दृष्टींत इतकें सामर्थ्य आहे की, तूं ती कायद्याच्या रुक्ष वाळवंटावरून फिरविलीस की, त्याच्यांतूनसुद्धा माझ्या सुखाचा झरा वाहूं लागेल. अजूनहि तुझ्या हृदयाला पाझर फुटत नाही ना ? अशानें तुझ्यावर लोक मत्सराचा आरोप नाही का करणार ?

माधव—ललिते, तो आरोप येऊं नये, म्हणून मीं तुला स्पर्श न करण्याची प्रतिज्ञा केली, तरी तुझा संशय जात नाही ! मी आपल्या प्राणांवर तिलांजलि दिली, तर तुझें समाधान होईल का ? मला या निष्प्रेम जीविताबद्दल प्रेम आहे, असें तुला वाटतें होय ? ललिते, तुझ्या भावी कल्याणाची मला काळजी नसती, तर मी या क्षणाला आपला प्राण देऊन तुझी त्या नराधमाच्या हातून सुटका केली असती !

ललिता—माझी या संकटांतून सुटका करणें इतकें का कठीण आहे ? माधव, तुझ्या बुद्धिमत्तेवर माझा पूर्ण भरवसा आहे. तूं मनांत आणशील, तर हें तुला मुळीच अवघड जाणार नाही. मी तुझी बालपणची सोबतीण आणि शिष्यीण ना ? तूं जर माझी सुटका करणार नाहीस, तर कोण करील ?

माधव—ललिते, पुष्कळदा ईश्वर संकटांतच आपल्या भावी सुखाचें बीज ठेवीत असतो. तुझी त्या नीचापासून कायमची मुक्तता व्हावी, अशी त्याची इच्छा असेल, तर ती तुझ्या शाश्वत कल्याणाकरितांच आहे, असें तूं आपल्या मनाचें समाधान करून घेतलें पाहिजेस. आजपासून तुझ्या आयुष्यावर त्या पातक्याची सावलीहि पडतां कामा नये.

ललिता—पतित अवस्थेंत जिणें बालविण्यापेक्षा मृत्यु जवळ करणें शतपट पुरवलें. पण मग माझ्या बाळाची वाट काय ?

माधव—काय म्हणतेस ? ललिते, तुला भ्रम झाला आहे खास ! जरा स्वस्थ पडून रहा, म्हणजे बरें वाटेल.

ललिता—माधव, मी चांगली शुद्धीवर आहें. मी भ्रष्ट झालें आहें, पतित झालें आहें ! या पापिणीपासून दूर रहा ! माझ्या संसर्गानें तुझ्यासारखा महात्मा सुद्धा पतित होईल !

माधव—ललिते, तूं जरी मला अशी दूर लोटूं लागलीस, तरी मी दूर होणार नाही. तूं भ्रमांत नसून चांगली शुद्धीवर आहेस, याबद्दल माझी खात्री झाली. मी रंगनाथाला सोडून इकडे येते वेळीं तो जें विषारी वाक्य बोलला, त्यानें या पूर्वीच ही गोष्ट माझ्या लक्ष्यांत यावयास पाहिजे होती.

ललिता—मग तूं या प्रसंगीं मला आणि माझ्या अपत्याला अंतर देणार नाहीस ना ?

माधव—न देण्याची मला प्रेमाची जशी शिकवण आहे, तशी कर्तव्याचीहि आहे. बाबासाहेबांनी तुला जसें सुखांत ठेविलें, तसें ठेवण्याची त्यांनी मला आज्ञा केली आहे. ती मी मानिली नाही, तर माझ्यासारखा कृतघ्न त्रिभुवनांतहि सापडणार नाही. आता झालेली चूक सुधारण्याचा एकच मार्ग आहे आणि तो मला अनुसरिला पाहिजे. शक्य तितक्या लौकर रंगनाथाला गाठून तुझ्याशीं लग्न करायला त्याला भाग पाडिलें पाहिजे. मग त्यापायीं उरलेले सत्तर हजार खर्च करावे लागले, तरी चालेल. अब्रूची किंमत पैशापेक्षा केव्हाहि अधिक आहे. शिवाय त्या पैशाचा लोभ मीं कधी धरिला नाही, तसा तूंहि धरिला नाहीस. तेव्हा त्यांत आपणाला विषाद वाटण्याचें कारण नाही.

ललिता—त्यांची अनुकूलता मिळविण्याला एवढा खर्च करण्याचें कारण नाही.

माधव—एवढया खर्चावर भागलें तर नशीब !

अनुक्रमणिका

ललिता—माधव, असें संदिग्ध बोलूं नकोस. स्पष्ट सांग काय तें.

माधव—तुझीं पत्रें परत देऊन तुझ्याशीं असलेला संबंध एकदा तोडल्यावर तो संबंध पुन्हः घडवून आणण्याला तो भारी अटीशिवाय कबूल होईल, असें मला वाटत नाही.

ललिता—नाही, नाही. ते खास इतके पाषाणहृदयी नाहीत. त्यांनी माझीं आसवें पाहिलीं आणि विनवण्या ऐकल्या, म्हणजे त्यांचें हृदय विरघळल्याशिवाय राहणार नाही.

माधव—ललिते, तुझा भोळेपणा पाहिला म्हणजे तुझी पराकाष्ठेची कीव वाटूं लागते! ईश्वर करो आणि तुझें जगाबद्दलचें अनुकूल मत असेंच कायम राहो! मी जातों आता. यापुढे कोण-तीहि महत्त्वाची गोष्ट करण्यापूर्वी तूं माझा सल्ला घेतला पाहिजेस. आजपर्यंत झालें तें झालें. पण यापुढे तूं अज्ञान अर्भक असून मी तुझा पालक आहे, असें तुला समजलें पाहिजे. आणि, माझ्या संमतीवाचून कांही एक करितां कामा नये.

ललिता—माधव, एकदा माझा तुझ्या सल्ल्यावर आणि उपदेशावर हक्क होता. पण तो मी आता गमावून बसलें आहें. तुझा संशय खोटा ठरेल, असें अजून मला वाटतें. पण तो जर खरा ठरला, तर माझ्या अविचाराचे परिणाम मला स्वतःलाच भोगले पाहिजेत. तूं माझ्याकरितां बाबांच्या संपत्तीवर पाणी सोडिलेंस तेव्हा मी तुझ्या आड आलें नाही. पण तुझा स्वाभिमान तुला संपत्तीपेक्षा, किंबहुना प्राणापेक्षाहि प्रिय आहे. माझ्यामुळे त्याला किंवा तुझ्या एका कपर्दिकेलाहि धक्का पोचणें मला मुळीच खपणार नाही.

माधव—तुझ्यासारख्या भोळ्या पोरीला रंगनाथ बधणार आहे असें तुला वाटतें होय?

ललिता—ते माझ्याशीं लग्न करायला तयार झाले नाहीत, तर मी हा जीव कांही ठेवणार नाही.

माधव—छे, छे! प्राणत्याग तर तुला मुळीच करतां येणार नाही. तूं एकटी होतीस, तोंपर्यंत आपल्या जिवाची मालकीण होतीस. पण आता एका नव्या जिवाची तुझ्यावर जबाबदारी पडली आहे. आणि, तुझ्या आत्महत्त्येंत त्याच्या हत्येचा अंतर्भाव होणार आहे. रंगनाथाशीं वागतांना तर तुला फारच सावधगिरी बाळगिली पाहिजे. तुझी अब्रू पूर्णपणें त्याच्या ताब्यांत आहे, हें ओळखून त्याच्याशीं नमतें घेतलें पाहिजे आणि आर्जवाने बोललें पाहिजे. पद्माबाई, मी तुमच्या भरवशावर इला एकटीला सोडून जातों आहें. इच्याकडून कोणतेंहि अविचा-रानें कृत्य होणार नाही, याबद्दल जपा.

पद्मा—या माझ्या पाठच्या बहिणीसारख्या आहेत, असें समजा.

माधव—आता मी निर्धास्त झालों. ललिते, लवकरच यश मिळवून परत येतों. कांही काळजी करूं नकोस. (जातो)

पद्मा—ललिताताई, तुमचें नशीब थोर म्हणून तुम्हांला असा पाठीराखा मिळाला.

ललिता—पण मी दिवटी त्याची राख-रांगोळी करायला बसलें आहे ना! त्याची प्रेमाची तहान मजकडून शांत होण्याचें बाजूलाच राहिलें. उलट त्याच्या आयुष्याची धूळधाण होण्याला मात्र मी कारण होणार!

रंगनाथ—(प्रवेश करून) त्याची प्रेमाची तहान शांत करायची असेल, तर त्याला माझी कांही हरकत नाही.

ललिता—अगबाई! एकदमच येणें झालें!

रंगनाथ—मला पाहून तुला फारसा आनंद झालेला दिसत नाही. माधव माझ्यापासून निघून आल्यावर त्याचा आणि तुझा काय संवाद होतो, तो ऐकण्याकरितां मी मुद्दाम मागोमाग आलों आणि तुझ्या अभ्यासाच्या खोलींत बसून तुमचें सारें संभाषण ऐकिलें. तुझें माझ्याशीं लग्न घड-विण्याचा चंग बांधून माधव येथून गेला; आणि मी आपण होऊनच येथे आलों आहें, तरी तूं दुःखी–कष्टीच! याला काय म्हणावें?

ललिता—आपण माझे पति, माझ्या बाळाचे पिते, असें असतां मी आपणांला पाहून दुःखी कष्टी कशी होईन?

रंगनाथ—साफ खोटें! गांधर्वविवाह कायदेशीर नाही, हें त्या महात्म्या कायदेपंडिताचें मत तूं इतक्यांतच कशी विसरली!

ललिता—तो विवाह कायदेशीर नसला, तर त्यांत बिघडलें कोठें ? तो कायदेशीर आहे, अशा समजुतीनेच आपण तो केला. त्या समजुतींत चूक असली, तर ती सुधारण्याला जागा आहे. गुप्तपणें झालेला विवाह आपणाला देवाब्राह्मणांच्या साक्षीने पुन्हा पार पाडितां येईल.

रंगनाथ—येथेहि तूं चुकलीस. माझ्या-सारखा नीच, स्वार्थी मनुष्य स्वतःची तुंबडी भरल्याशिवाय का त्या गोष्टीला कबूल होणार आहे ? मी जर तुझीं पत्रें तीस हजारांना विकलीं, तर आणखी सत्तर हजार वरदक्षिणा म्हणून घेतल्याशिवाय का मी बोहल्यावर चढेन ?

ललिता—माझा त्यावर काडीचाहि भरवसा नाहीं. आपण पत्रांबद्दल तीस हजार रुपये घेतले, ते थट्टेने. आता जें बोलत आहांत, तेंहि थट्टेनेच. होय ना ? मीं माधवालाहि जवळ जवळ असेंच सांगितलें.

रंगनाथ—ही तुझी मजवर मोठी मेहेरबानी झाली. पण माधव म्हणतो त्याप्रमाणे तूं खरोखरच भोळसर आहेस. माझा स्वभाव थट्टेखोर नाहीं, आणि मीं आतापर्यंत कोणतीच गोष्ट थट्टेने केली किंवा म्हटली नाहीं. मी तुझीं पत्रें विकलीं, तीं जाणून बुजूनच विकलीं आणि तुझ्याशीं गांधर्वविवाह केला तोहि त्याचें बेकायदे-शीर स्वरूप समजून उमजूनच केला.

ललिता—तो पैशाच्या लालचीनेच केला का ?

रंगनाथ—होय.

ललिता—मग मला मागणी घातली ती केवळ सौंदर्याच्या मोहाने घातली, हें आपलें म्हणणें खोटेंच होतें तर ?

रंगनाथ—अर्थात्च.

ललिता—आणि, माझी संकटांतून मुक्तता केली ती ?

रंगनाथ—तीहि खोटी होती. आणि, तें संकटहि खोटें होतें !

ललिता—मग तें नाटक मुद्दाम मला फशीं पाडण्याकरितांच केलें होतें तर ?

रंगनाथ—होय.

ललिता—आपण मामे सांगितलें त्या-प्रमाणे नाटकावरून संकट आणण्याची कल्पना सुचली नसून संकटाचा देखावा करितां यावा, म्हणूनच नाटक केलें, असेंच ना ?

रंगनाथ—तूं कार्यकारणभाव बरोबर ताडिलास.

ललिता—आणि, संकटावरून मुक्ततेची कल्पना सुचली नसून मुक्ततेच्या कल्पनेवरून संकटाची कल्पना सुचली ना ?

रंगनाथ—बरोबर ओळखलेंस.

ललिता—आपणांला झालेली जखम, आलेली बेशुद्धि आणि ताप हीं सुद्धा निव्वळ कल्पनिकच असतील ?

रंगनाथ—तुझा तर्क अचूक आहे.

ललिता—माझ्या पत्रांना उत्तर न देण्याचें कारण काकाने सांगितलें तेंच खरें होतें तर ?

रंगनाथ—तंतोतत खरें होतें.

ललिता—आपला खोटेपणा उघड करण्या-करितां आपण जें खरें बोलत आहांत, त्याऐवजी तो झाकण्यासाठी खोटें बोललां असतां, तर मला आनंद झाला असता. आपण एक चित्र काढून त्याबद्दल एका लक्षाधीशाकडून हजारों रुपये मिळविणार होतां, तेंहि साफ खोटेंच ना ?

रंगनाथ—हें अनुमान मात्र साफ चुकलें ! मी आता जे पैसे मिळविणार आहें, ते एका लक्षाधीशाकडूनच आणि एका चित्राच्याच जोरावर मिळविणार आहें.

ललिता—लक्षाधीश कोण ?

रंगनाथ—माधव.

ललिता—आणि, तें चित्र ?

रंगनाथ—आपलें भावी अपत्य !

ललिता—आणि, आपण हें सारें लाज-लज्जा गुंडाळून मोठ्या फुशारकीने बोलत आहांत. मला आपली अगदी चीड-किळस-शिसारी आली आहे !

पद्मा—हं, हं, ललितताई हें काय ?

ललिता—माझ्या आड येऊं नका. माझ्या मनांतली मळमळ मला ओकून टाकिलीच पाहिजे !

पद्मा—असें करून कसें चालेल ? माधवरावांचा उपदेश इतक्यांतच कशा विसरलांत ! आपणाला या वेळीं पडच घेतली पाहिजे.

रंगनाथ—तुला माझी इतकी शिसारी येत असेल, तर माझा नाद सोडून देण्याला तूं मोकळी आहेसच. मीहि आपला गुप्त संबंध चव्हाट्यावर आणायला मोकळा राहीन.

ललिता—बायकांच्या अब्रूच्या भांडवलावर व्यापार करणारा तेंहि करायला चुकणार नाही. मग आपण माझी अडचणींतून सुटका करण्याकरितां सुद्धा पैसा घेणार तर ?

रंगनाथ—मीहि अडचणींतच आहें. तुझी अडचण लग्नाची तर माझी पैशाची, येवढाच काय तो दोहोंत फरक!

ललिता—माझ्या अडचणीला आपणच कारण झालां आहांत. तेव्हा ती दूर करण्याची जबाबदारीहि आपणांवरच आहे,

रंगनाथ—माझ्या अडचणीला माधव कारण आहे मी जर तुला तुझ्या अडचणींतून सोडविणें भाग आहे, तर त्याने मला सोडविणें योग्य नाही का ?

ललिता—आपल्या अडचणीची जबाबदारी त्याच्याकडे कशी जाते ?

रंगनाथ—आपल्या लग्नाला हरकत घेऊन त्याने तुला आणि मला लुबाडलें आहे. त्याने पन्नास हजारांचा अपहार केला, त्याचा मी सव्याज वचपा काढणार. तुम्ही दोघांनी उदार होऊन एक लाख रुपयांवर पाणी सोडिलें. मी आहें गरीब माणूस! ती बिनबारशी रक्कम हाताखाली घालण्याऐवजी मी जर तशीच अधांतरी लोंबत ठेविली, तर माझी महामूर्खांत गणना होऊं लागेल! तूं म्हणतेस, माझ्याशीं लग्न करा. पण लग्न करून घेऊन भीक मागूं का ?

ललिता—मी नोकरी धरून प्रामाणिकपणें कुटुंबाचा चरितार्थ चालवीन. आपण तिकडे पाहण्याचें मुळी सुद्धा कारण नाही.

रंगनाथ—म्हणजे ! मी बायकोकडून पोसून घेऊन तिचा मिंधा होऊन राहूं म्हणतेस ? नाही, तें लाजिरवाणें जिणें मला मुळीच पसंत नाही. का, पद्माबाई, असें जिणें मी पत्करावें, असें तुम्हांला वाटतें का ?

पद्मा—अप्रामाणिक बाणेदारपणापेक्षा प्रामाणिक मिंधेपणा पुरवला !

रंगनाथ—तुम्हीहि मिळवत्या आहांत ना ? मग तुम्हांला तसें वाटायचेंच ! बरें, बायका शिक्षकिणी, सुइणी, परिचारिका होऊन स्वतंत्रपणें उपजीविका चालवूं लागल्या, तर त्यांचें शील भ्रष्ट होण्याचे त्यांच्यावर प्रसंग येतात, हें तरी तुम्हांला कबूल असेल ?

ललिता—नका, नका, त्यांच्या दुःखावर अशा डागण्या देऊं नका !

पद्मा—शठाशीं गाठ पडून शील भ्रष्ट होण्याचा प्रसंग प्रत्येक स्त्रीवर येत नसतो.

ललिता—पद्माबाई एक असामान्य दुर्दैवी स्त्री आहेत.

रंगनाथ—तुला पद्माबाईंनी आपली हकीगत सांगितली तर ? (ललिता मान हलविते.) मग त्यांची गाठ ज्या शठाशीं पडली, त्याचें नांवहि तुला कळलें असेल.

ललिता—नाही, आपल्या भावी पतीची विटंबना कोणती कुलस्त्री करील ?

रंगनाथ—पद्माबाई नमुनेदार आर्य स्त्री आहेत तर ? त्यांच्यावरून मला माझ्या दुसऱ्या एका वल्लभेची आठवण झाली. ती त्यांच्याप्रमाणेच स्वतःची उपजीविका करणारी बाणेदार स्त्री होती. मजकडून तिचें शील भ्रष्ट झाल्यामुळे मला तिच्याशीं वचनबद्ध व्हावें लागलें आहे ! ललिते तिनेहि स्वतःच्या हिंमतीवर आमचा संसार चालविण्याची तयारी दाखविली होती. पण मीं तें नाकारिलें. आणि, लग्न करण्यापूर्वी दोघांचा चरितार्थ चालविण्यास पुरेशी रक्कम हातीं आली पाहिजे, अशी तिला अट घातली. सुदैवाने तुझ्या पत्रांच्या आधाराने मला तीस हजार रुपये आजच मिळाले आहेत. मला तिच्याशीं शक्य तितक्या लौकर लग्न लावून मोकळें झालें पाहिजे !

ललिता —तिच्याशीं लग्न लावून माझ्याशीं लावणें शक्य होईल कां ?

रंगनाथ—एका म्यानांत दोन तरवारी ? मला एकीशींच लग्न केलें पाहिजे. आणि, जिला मी आधी वचन दिलें, तिच्या हक्काला अधिक अग्रता येणार, हें कायद्याचें ठरलेलें तत्त्व आहे !

ललिता—पण माझी स्थिति अधिक अनुकंपनीय नाही का ? मी जशी चिखलांत रुतलें आहें, तशी ती खास रुतलेली नसेल. आपली हरकत नसेल, तर मी तिची सवत म्हणून नांदायला तयार आहें. ती जर या योजनेला कबूल झाली, तर तिला माझ्या प्राणापेक्षाहि प्रिय अशा अब्रूची रक्षणकर्ती समजून तिची सेवा मी मनोभावानें करीन.

रंगनाथ—मोठी पंचाईत आली ! तुझ्या विकट स्थितीकडे लक्ष्य दिलें, तर तुझ्याशीं तूर्तातूर्तच लग्न उरकलें पाहिजे; आणि जवळ मुहूर्त नसल्यामुळे तें मला नोंदणीच्या कायद्यान्वयेंच उरकावें लागेल. बरें, तसें लग्न लाविलें, तर मला दुसरीशीं लग्न करितां येणार नाही. कारण त्या कायद्याखाली तो गुन्हा होतो. दोघींशीं ब्राह्मविवाह-पद्धतीनें लग्न करितां येईल. पण त्याकरितां जवळचा मुहूर्त नाही. लांबचा धरावा, तर तुझी अवस्था फारच विकट होणार. तथापि त्यालाहि एक तोड आहे.

पद्मा—कोणती ती ?

रंगनाथ—तूं विचारलेंस, हें बरें झालें. कारण तुला ती पटली, तर तूं त्या दुसरीचें मन सवत करून घ्यायला अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न तरी करशील. ऐक तर, आपल्या धर्मानें इतर सर्वांच्या सोई पाहिल्या आहेत, तशी गुडघ्याला बाशिंग बांधू पाहणाऱ्या उतावळ्या नवऱ्याचीहि सोय पाहिली आहे. त्यानें गिरीवर जाऊन लग्न केलें तर धर्म तें मान्य करितो. त्या मार्गाला दोघींची तयारी असेल, तर एका मुहूर्तावर दोघींशीं 'शुभ लग्न सावधान' उरकतां येईल !

ललिता—माझ्या अडचणींत मला हा मार्ग स्वीकारिलाच पाहिजे.

पद्मा—मीहि त्या दुसऱ्या बाईला वळवून पाहतें. माझी तिची चांगलीच ओळख आहे म्हटलें, तरी चालेल.

रंगनाथ—मात्र आणखी सत्तर हजार हातीं आल्याशिवाय मी त्या गोष्टीला कबूल होणार नाही, हेंहि सांगून ठेवितों !

पद्मा—त्याची तजवीज माधवराव करणार आहेतच.

रंगनाथ—ठरलें तर ? (ललिता व पद्मा मान हलवितात.) मी जातों आता. पद्माबाई, तुम्ही कुशल सुईण आणि आस्थेवाईक परिचारिका आहांत. हिचें बाळंतपण पुढे तुम्हांलाच करावें लागणार आहे. तेव्हा आतापासून इच्या प्रकृतीला नीट जपा. जर कांही भलतें सलतें झालें, तर सत्तर हजार हातचे जाऊन हिच्याशीं लग्न करण्याचा मार्गहि बंद होईल. तशीच, हिची मनःस्थितीहि असावी तशी नाही. वैतागाच्या भरांत जिवाचें कांही बरें वाईट सुद्धा करून घ्यायची. येथे अफू, सोमल, बचनाग, सुरी, चाकू यांपैकी कांही नाही ना ? कोपऱ्यांत तें काय दिसतें आहे ? (हातांत घेतो.) गुप्ती तर नाही ना ?

पद्मा—गुप्तीच आहे ती.

रंगनाथ—हिनें तुम्ही आपल्या बचावाची तरतूद केलेली दिसते. पण ही शीलरक्षक बया ललितेची प्राणभक्षक होऊन बसायची.

पद्मा—ती माझ्या मालकीची नाही.

रंगनाथ—कुणाचीहि असली, तरी आज रात्रीं या घरांत राहून उपयोगी नाही. (गुप्ती घेऊन जातो.)

ललिता—पद्माबाई, पुरुष इतके निर्दय, उलट्या काळजाचे आणि विश्वासघातकी असतात का हो ? यांच्या या अमानुष वर्तनाला जगांत तोडच सापडणार नाही !

पद्मा—कां बरें ! मला कलंकित करणारा नरपशु याच मासल्याचा नव्हता का ?

ललिता—सारे पुरुष एकाच माळेंतले मणि असतात तर !

पद्मा—असें कोण म्हणेल ? डॉक्टरसाहेब आणि माधवराव पुरुषवर्गांतलेच आहेत, हें आपण लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

ललिता—मला पापिणीला त्यांचा विसरच पडला होता ! पद्माबाई, मी हिरा टाकून खापराला

की हो कवटाळून बसलें! अशी कशी मी आंधळी झालें?

पद्मा—जें पुढे होणार असतें, त्यासारखीच बुद्धि व्हायची!

ललिता—एका क्षणिक चुकीचें केवढें हो भयंकर प्रायश्चित मला मिळालें!

पद्मा—स्त्रीच्या क्षणिक चुकीचें प्रायश्चित्त तिला जन्मभर भोगावें लागतें आणि त्या चुकीला कारण होणाऱ्या पुरुषाला त्या अपराधाचें थोडेंहि प्रायश्चित्त न मिळतां उलट मोठें बक्षीस मिळतें, असा जगांत उरफाटा न्याय आहे, त्याला कोण काय करणार?

ललिता—पद्माबाई, माझ्या अविचाराचे परिणाम येथेच थांबतील, तर किती चांगलें होईल! पण तसें कुठून होणार? माझ्या दुर्दैवाचा हा नुसता आरंभ आहे!

पद्मा—असें अमंगळ बोलूं नका, गडे. अजून सारें कांही व्यवस्थित होईल. देव भल्या माणसाची पाठ कधी सोडीत नाही.

ललिता—तुम्ही म्हणतां सारें कांही ठीक होईल. पण माझ्या लग्नाचा प्रश्न आता दोघांपुरता राहिला नाही.

पद्मा—माधवराव तुमच्या कल्याणाकरितां आपलें सर्व वित्त वेचतील, याबद्दल तुम्हांला शंका वाटते होय?

ललिता—नाही, नाही, त्यांच्या निःसीम स्वार्थत्यागाची मला पूर्ण जाणीव आहे.

पद्मा—मग हरकत कोणाची उरली?

ललिता—माझ्या भावी सवतीची.

पद्मा—तिचीहि काळजी नाही. ती माझी मैत्रीण आहे, हें मीं मघाशींच सांगितलें ना?

ललिता—कितीहि जिवलग मैत्रीण असली, तरी ती सवत पत्करायला तयार होईल का?

पद्मा—जेव्हा नवऱ्याच्या प्रेमाचा प्रश्न असतो, तेव्हा सवतीमत्सर उत्पन्न व्हायचा. जेथे दोघींच्या मनांत नवऱ्याबद्दलचा सारखाच तिटकारा वसत असतो, तेथे त्यांच्यामध्ये प्रेमच राहायचें! नवऱ्याच्या छळाला तोंड देण्याचें अवसान त्यांना एकमेकींच्या प्रेमावाचून आणि पाठिंब्यावाचून कसें येणार?

ललिता—मग ती मला सवत करून घेण्याला तयार होईल म्हणतां?

पद्मा—आनंदाने.

ललिता—पद्माबाई, तसें झालें, तर मी तुमची जन्माची ऋणी होईन. मग आता उशीर कशाला? तिला आणाच ना येथे. मी तिच्या पायीं लोळण घेऊन तिची करुणा भाकीन आणि मला तिची पाठची बहीण समजण्याची विनवणी करीन. मी अगदी अधीर झालें आहे!

पद्मा—कांही नको विनवणी करायला, आणि येथे तिला आणायलाहि नको.

ललिता—म्हणजे?

पद्मा—येथेच ती असल्यावर तिला मुद्दाम आणायला कशाला पाहिजे?

ललिता—म्हणजे? तुम्हींच का त्या?

पद्मा—मीच ती!

ललिता—मग त्यांनी तुमच्या देखत तुमचीच इतकी विटंबना केली तरी कशी? छे, मला नाही खरें वाटत?

पद्मा—निर्लज्ज आणि बेगुमान माणसाला काय दुर्घट आहे, ललितातांई?

ललिता—आणि, त्यांचे माझ्यावर निर्दय प्रहार सुरू असतां तुम्ही अगदी मूग गिळून बसलां होतां, तें कां?

पद्मा—अशा सैतानाला चवताळून सोडण्यांत काय हशील होतें? ती वेळ मुकाट्याने सहन करण्याचीच होती! आज तर हातीं बरेंच धन आल्यामुळे ते फारच उन्मत्त झाले आहेत. माझा आणि तुमचा पूर्ण घात करण्याचें सामर्थ्य अजून त्यांच्या अंगीं आहे, हें इतक्यांतच विसरून चालणार नाही.

ललिता—ते माझा घात करतील. पण तुमचा घात काय करणार?

पद्मा—अजून माझीं पत्रें त्यांच्या ताब्यांत आहेत. तीं परत मिळत तोंपर्यंत माझी अब्रूच त्यांच्या हातीं आहे, असें समजा ना!

ललिता—तुमच्याजवळ त्यांची एखादी वस्तू नाही का, की जी देऊन तुम्हाला तीं पत्रें मिळवितां येतील ?

पद्मा—आज सकाळीं त्यांची भेट झाली तेव्हा त्यांनी मला सोडून चालतें होऊं नये, म्हणून मी त्यांच्याकडून ही अंगठी गहाण म्हणून मागून घेतली आहे. ती तुमचीच असावी, असें वाटतें. घ्या ही परत.

ललिता—पद्माबाई, त्यांच्या कामवासनेला बळी पडलेल्या दुर्दैवी बाई तुम्हीच, अशी आता माझी खातरी झाली. होय, ही अंगठी माझीच आहे. पण ती तूर्त तुमच्याकडेच राहूं द्या. पत्रें मिळविण्याच्या कामीं तुम्हांला तिचा उपयोग करून घेतां येईल.

पद्मा—कांही नको. माझें त्यांच्याशीं एकदा लग्न झालें, म्हणजे त्या पत्रांची मातब्बरी काय राहिली ?

ललिता—पण ते लग्न करतील, याचा तरी नेम कोणी सांगावा ? त्यांना लग्न लावायला भाग पाडायला लालूच म्हणून तरी इचा तुम्हांला उपयोग करितां येईल. पद्माबाई, नाही म्हणूं नका. तुम्ही माझ्यावर केलेल्या प्रेमाची आणि उपकाराची अल्प फेड म्हणून तरी इचा स्वीकार कराच !

पद्मा—त्या प्रेमाबद्दल आणि उपकाराबद्दल कृतज्ञता वाटण्याचें तुम्हांला कांही एक कारण नाही. माझें तुमच्याशीं सवतीपेक्षा आणखी एक निराळें नातें आहे. डॉक्टरसाहेबांनी मला तें परिचयपत्र देण्याचें कारण कळलें का ?

ललिता--नाही.

पद्मा--तुमच्या काकांचें आणि माझें एकदा फार प्रेम असून आम्हीं एकमेकांशीं वचनबद्धहि झालों होतों. मी पतित झाल्यामुळे आमचें लग्न अशक्य झालें.

ललिता--एका दूरच्या बहिणीचा काकापासून बचाव केल्यामुळे त्याचें मन कलुषित झालें आहे, असें जें त्यांनी सांगितलें तें खोटेंच तर मग ?

पद्मा—होय. त्यांच्या इतर बोलण्याचालण्याप्रमाणे सर्वस्वीं खोटें !

ललिता--तर मग तुम्हीं माझ्या प्रेमळ सवत आहांत, तशा मातृतुल्यहि आहांत. मग तर तुम्हांला या अल्प देणगीचा अव्हेर करतांच येणार नाही !

पद्मा—तुमच्या प्रेमाची खूण म्हणून मी तिचा स्वीकार करितें.

ललिता—या अंगठीच्या जोरावर निदान तुमचीं पत्रें जरी परत मिळवितां आलीं तरी पुष्कळ काम झालें, असें समजा; आणि, त्यांच्याशीं लग्न करण्याच्या भरीस पडूं नका. मी अशी अडलें नसतें, तर मी त्यांच्याबरोबर सारा जन्म काढायला कधींच तयार झालें नसतें.

पद्मा--ललिताताई, तुम्ही जरा सूक्ष्म विचार केला, तर आता त्यांच्यावाचून मलाहि तरणोपायच नाही, हें तुम्हीहि कबूल कराल. मीं त्यांजपासून आपली सुटका करून घेतली, तरी मला अनेकांकडून लग्नाच्या मागण्या येतील. त्यांपैकी एखाद्याची मागणी कबूल करण्यापूर्वी मला आपलें रहस्य त्याला सांगावें लागेल. सांगितलें नाही, तर तो निव्वळ विश्वासघात होईल. सांगितलें, तर त्याजकडून माझा स्वीकारच होणार नाही ! बरें, रहस्य सांगायचें तरी किती जणांपाशीं ?

ललिता--प्रत्येकाला नकार देत अविवाहित स्थितींत राहायला काय हरकत आहे ?

पद्मा--तशा स्थितींत धंदा केला असतां केवढे दुर्धर प्रसंग येतात, याचा एकदा अनुभव आल्यावर मी तो मार्ग स्वीकारणें म्हणजे वेडेपणाच नाही का होणार ? प्रौढ कुमारिकेचें काय, किंवा गतभर्तृकेचें काय, सत्व हरण करण्याकरितां कामांध पुरुष काकदृष्टीने टपलेले असतात. ती सनाथ झाली, म्हणजे तिच्याकडे वाकडया नजरेने पाहण्याचें त्यांना धैर्य होत नाही. तें कांही नाही. तुम्हांला जसा त्यांच्यावाचून तरणोपाय नाही, तसा मलाहि नाही.

ललिता—छे, हीं कारणें मला मुळीच पटत नाहीत. यांच्यापेक्षाहि बलवत्तर कारण तुमच्या संकल्पाच्या मुळाशीं असलें पाहिजे.

पद्मा—आहे खरं. मात्र त्याची मी आजपर्यंत कुणापाशींहि वाच्यता केली नाही. पण तुम्हाला सांगतेंच. त्यांच्या विश्वासघाताचा सूड आणि त्यांच्या कामांधतेपासून आपल्या भगि-

नींचें रक्षण हेच माझे हेतु आहेत! मी आता त्यांच्याकडे जाऊन दोघींचा स्वीकार करण्याची विनंती करितें.

ललिता—ईश्वर तुम्हांला पूर्ण यश देवो! (दोघी जातात)

प्रवेश २ रा

[कृष्णा व राधा]

कृष्णा—त्या रंगनाथावर नजर ठेवण्याची कामगिरी होती, तोंपर्यंत उठल्या सुटल्या तुझी राजरोस भेट घेतां येत असे. आता ती कामगिरी सुटल्यामुळे तुझी भेट चोरूनच घ्यायला हवी! आताचेंच पाहाना! तिकडे किती तरी पडशीं, खोकले, पोटदुख्या आणि कपाळदुख्या वाट पाहत बसल्या आहेत. पण मी तहान लागल्याचें निमत्त पुढे करून निसटलों, तों अर्धा तास येथेच पाणी पीत बसलों आहें! त्याने मला जलोदर झाला नाही, म्हणजे मिळविली! मला तहान कसली लागली आहे, हें त्या वेड्यांना कुठून माहीत असणार? माझ्या नांवाने हात चोळतां चोळतां एखाद्याची खरूज वाळायची, माझ्या नांवाने कंठशोष करितां करितां एखादा फुप्फुसाचा रोगी आपोआप बरा व्हायचा, येवढीच त्यांत समाधानाला जागा आहे!

राधा—यापुढे आपलें इकडे येणें जर एखादे वेळींच होऊं लागलें, तर मला तरी दवाखान्याकडे यायला एखादी सबब शोधून काढली पाहिजे. आपल्या जोडीला उमेदवार म्हणून मला सेविकेचें काम नाही का करितां येणार?

कृष्ण—दवाखान्याच्या मस्तकाच्या ठिकाणीं डॉक्टरसाहेबांसारखे निष्णांत धन्वंतरी आणि त्याच्या दिमतीस तुझ्या माझ्यासारखे त्यांना दोन हस्तक मिळाल्यावर रोग्यांची काय वाण पडणार? तूं रोग्यांची सेवा करूं लागलीस, तर आमच्या दवाखान्यांत रोग्यांची इतकी गर्दी होईल की, खरे रोगी कोण आणि खोटे कोण, हें पाहण्याकरितां त्यांच्या खाटांमधून वाट काढणेंहि डॉक्टरसाहेबांना मुष्कील होईल, आणि रोग्यांचे डोळे डॉक्टरांकडे लागण्याऐवजी तुझ्याकडेच लागत जातील! छे, तें नाही उपयोगी. तुला सेवा करण्याची हौसच असली, तर ती माझ्या सेवेवरच भागवून घेतली पाहिजे!

राधा—रोगी होऊन आलें, तर नाही का चालणार?

कृष्णा—रोगी होऊन आलीस, तर शहरांतल्या साऱ्या डॉक्टरांची चिनमोत्रदल्याने तुझी तपासणी आणि शूश्रूषा करण्यांत स्पर्धा लागायची!

राधा—नुसत्या कपाळदुखीकरितां किंवा पोटदुखीकरितां आलें, तरी सुद्धा का ते मेले माझ्याभोवती घोटाळत राहतील?

कृष्णा—तें तर फारच वाईट! कपाळदुखी आणि पोटदुखी बाह्य लक्षणांवरून मुळीच ओळखतां येत नाहीत, म्हणून त्यांची बतावणी सहज होऊं शकते खरी. पण त्याच कारणाकरितां रोगांचें निदान कठीण होऊन डॉक्टर लोकांना रोग्यांचें कपाळ आणि पोट प्रहरन् प्रहर तपाशीत बसण्याची संधि मिळते. कपाळ पित्ताने दुखतें आहे, की वाताने दुखतें आहे, डोळ्याच्या रोगामुळे दुखतें आहे, की कानाच्या रोगामुळे, पोट असेवनामुळे दुखतें आहे की अतिसेवनामुळे, की प्रसूती जवळ आल्याने दुखतें आहे.—

राधा—इश्श! कांहीच्या बाहीच बोलणें! डॉक्टर लोक इतकी चिकित्सा करूं लागले, तर रोगी औषधावाचून बरे व्हायला लागतील आणि रोग औषधालाहि मिळणार नाहीत!

कृष्णा—तसें पाहिलें, तर तुला सगळीं सोंगें साधतील. पण रोगाचें सोंग मात्र कधी साधणार नाही. तुझें हें हसरें मुख पाहून तूं रोगग्रस्त आहेस, हें कोणाला खरें वाटेल? तें पाहून दुसऱ्याची कपाळदुखी नाहीशी व्हायची!

राधा—हसणें, खाणेंपिणें, झोप लागणें, यांवरून निरोगीपणाचा अंदाज बांधणेंहि चुकीचें ठरतें हो!

कृष्णा—तूं म्हणतेस तेंहि खरें आहे. कांही कांही रोगांत उलटींच लक्षणें दिसून येतात खरीं! भस्म रोग्याने कितीहि खाल्लें तरी त्याचें भस्म होऊन जातें, आणि निद्रारोगांत इतकी झोप येते की तिचा शेवट महानिद्रेंत होतो!

राधा--अगबाई, खरं की काय ? असें ! गेल्या महिन्यांत एक दिवस ललितातांई एकदम आजारी पडल्या आणि त्यांना इतकी भूक लागली की त्यांच्या सांगण्यावरून अनेक पक्वान्नें करून त्यांनी भरलेलीं दोन तीन ताटें त्यांच्या खोलींत नेऊन ठेविलीं. पण दुसऱ्या दिवशीं त्यांतील कांही एक शिल्लक राहिलें नाही ! त्या दिवशीं त्या सूर्य बराच वर येईपर्यंत झोपत पडल्या होत्या. माडीवर कोणी जायचें नाही, अशी त्यांनी निक्षून ताकीद केली असल्यामुळे त्यांना पहाटे उठविण्याची सोयच नव्हती ! तेव्हापासून मात्र खिन्नतेशिवाय रोगाचें कोणतेंहि लक्षण त्यांना दिसलें नाही. थोडक्यांत थांबलें, म्हणून बरें झालें !

कृष्णा--असं खरं ! असे दोन भयंकर रोग बळावत जाऊन विकोपाला गेले असते, तर अनर्थ झाला असता !

राधा--मला आपल्या भेटीची आणि आपणाला माझ्या भेटीची इतकी तहानभूक लागते ती एखाद्या रोगामुळे तर नसेल ना ?

कृष्णा--रोगामुळेच. यालाच 'प्रेमरोग' म्हणतात ! औषध दृष्टीसमोर असेल, तोंपर्यंत याचे अनिष्ट परिणाम दिसत नाहीत. पण तें दूर झालें की, हा रोग झपाट्याने बळावत जातो. आणि, पुन्हा औषध दिसेपर्यंत रोग्याला सारखी तळमळ लागून राहते ! कांही सुचत नाही !

राधा--हें वरील अगदी खरें. आता आपली वरचेवर भेट तर झाली पाहिजे, आणि आपलें तर या घराकडे फारसें येणें होणार नाही. तेव्हा मलाच दवाखान्याकडे खेपा घालाव्या लागणार.

कृष्णा--अर्थातच. नेत्रकिरण आणि हास्य-किरण मंत्राने तयार करण्याची आणि कपोलपाक, अधरामृत आणि वाक्शर्करागुटिका बाटल्यांतून पाठविण्याची युक्ति जोंपर्यंत निघाली नाही, तोंपर्यंत तुला स्वतःलाच आलें पाहिजे ! निमित्त मात्र खासें शोधून काढलें पाहिजे !

राधा--चहा घेऊनच येत जाईन, म्हणजे झालें,

कृष्णा--शाबास ! याला म्हणावें डोकें. तूं चहा घेऊन दिवसांतून दहा वेळां आलीस, तरी या शहरच्या चहाबाजांना त्यांत कांही विचित्र वाटायचें नाही. ठरलें तर मग ? (राधा मान हलविते. दोघेजण एकमेकांकडे मागे वळून पाहत दोन बाजूंनी जातात.)

प्रवेश ३ रा

[रंगनाथ व पद्मा]

रंगनाथ—ती अंगठी तूं परत दिल्या-शिवाय मी तुझ्याशीं साफ नाही लग्न करणार.

पद्मा--पण आपणांला माधवरावांकडून ललितातांईच्या पत्रांबद्दल तीस हजार मिळाले असून लग्नाबद्दलहि सत्तर हजार मिळणार आहेत ना ? लाख रुपयांनी नाही का आपली तृष्णा शांत होत ?

रंगनाथ--त्या लाख रुपयांचा तुझ्याशीं काय संबंध ? माधवाने सत्तर हजार दिले तर मी ललितेशीं लग्न करीन. तुला तिची सवत व्हायचें असेल, तर ती अंगठी परत दिली पाहिजे. तसें पाहिलें, तर तुझा तिच्यावर कांही एक हक्क नाही. ती मी तुझ्याकडे परत येण्याबद्दल तारण ठेविली होती. सावकार रिणकोचा माल आपलाच म्हणून बळकावूं लागला, तर त्याला चतुर्भुज व्हावें लागतें, ठाऊक आहे का ?

पद्मा--माझें तरी मागणें मला चतुर्भुज करा, हेंच आहे ना ? मग मी ती अंगठी कशी परत देऊं ?

रंगनाथ--चोरच्या चोर आणि वर शिरजोर !

पद्मा--खरेंच, स्वतःच्या वर्तनाचें तुम्हीं अगदी योग्य वर्णन केलेंत खरें !

रंगनाथ--काय ? मी चोर ? आणि, तो कसा ?

पद्मा--खोटें लग्न लावून अंगठी मिळ-विणाराला, चोर नाही, तर काय म्हणायचें ?

रंगनाथ--आणि, मजपासून अंगठी गहाण घेऊन ती परत न करणारी साव वाटते ?

पद्मा--अंगठीच्या खऱ्या मालकीण ललिताबाई, त्यांना मी ती परत दिली. आणि, त्यांनी ती मला बक्षीस दिली.

रंगनाथ--तिच्या नवऱ्यावर हक्क सांगण्याकरितां होय ? तूं ती अंगठी आता देत नाहीस. पण मी तुम्हां दोघींशीं लग्नें लाविलीं, म्हणजे ती माझीच होणार की नाही ?

पद्मा—मग तिच्याबद्दल इतक्यांतच कशाला तगादा पाहिजे ? लग्न लावा आणि मग घ्या.

रंगनाथ--म्हणजे तूं तिचा उपयोग मजवर लग्नाची जबरी करण्याकरितांच करणार ना ?

पद्मा--तुम्ही तरी मजवर लग्न लादलेंच की नाही ?

रंगनाथ--लग्न लादलें म्हणतेस ? ठीक आहे. मला तरी कुठे त्याची इतकी हौस आहे ? ती अंगठी मिळाली म्हणजे मला तुझ्याशीं लग्न करणेंहि नको, आणि तूंहि नकोस. काढ ती अंगठी अगोदर.

पद्मा--मी नाही काढणार.

रंगनाथ--चौदाव्या रत्नाचा प्रयोग केला की, तेव्हांच काढशील. (पद्मेच्या बोटांतून अंगठी काढण्याचा प्रयत्न करितो, ती धडपड करिते. रंगनाथ पद्मेस ढकलतो. ती लोखंडी पेटीवर आदळून मूर्छित होते, तो तिच्या बोटांतून अंगठी काढून जवळच्या कातडी बॅगमध्ये घालतो. पडद्यांत माधव 'रंगनाथ, अरे रंगनाथ' अशी हाक मारतो.)

रंगनाथ--आलोंच. (बॅग घेऊन जातो. पडदा पडतो.)

प्रवेश ४ था

[माधव व रंगनाथ]

रंगनाथ--पुन्हा आलास तर ? मी तसें भाकितच केलें होतें. मी ललितेशीं लग्न करूं नये, असा हुकूम फर्माविण्याकरितांच आला असशील ?

माधव--मी तसें म्हणणें अशक्य आहे, हें तुला माहीत आहे. रंगनाथ, काय केलेंस हें ? जिने विश्रांति घेण्याकरितां तुझ्या मांडीवर विश्वासाने मान ठेविली, तिचा गळा तूं निर्दयपणें चिरलास. हें पातक तूं कोठे फेडशील ?

रंगनाथ--तुझ्या मांडीवर तिने मान टेकली असती, तर तूं तिची निराळ्याच प्रकाराने संभावना केली असतीस, हें मला माहीत आहे. पण पापापुण्याचा विचार करण्याइतकी स्वस्थता माझें दारिद्र्य मला मिळूं देत नाही, त्याला मी तरी काय करणार ? मी जर तें संकटमुक्ततेचें नाटक केलें नसतें, तर त्या तीन चिठोऱ्यांकरितां तीस हजार रुपये मला मिळवितां आले असते का ? त्या पत्रांची किंमत शतपटीने, सहस्रपटीने वाढावी, म्हणून मला कांही अवधीपर्यंत अज्ञात-वासांत राहावें लागलें. गिऱ्हाइकांत भर पडत गेली, म्हणजे वस्तूचें मोल जसें वाढत जातें, तशी त्या अवधींतील एक एक दिवस त्या पत्रांची किंमत वाढवीत होता.

माधव—त्या पत्रांकरितां तूं तीस हजार रुपये घेतलेस, त्याबद्दल माझें कांही म्हणणें नाही. तूं द्रव्यहरणाकरितां ललितेशीं लग्न लाविलें असतेंस तरी तें मी क्षम्य मानिलें असतें. पण तिच्या शीलाला कायमचा कलंक लावून तूं अक्षम्य अपराध केला आहेस. त्याचें अंशतः परिमार्जन करण्याचा एकच उपाय आहे.

रंगनाथ--तिच्याशीं लग्न करणें हाच ना ?

माधव--होय, तोच.

रंगनाथ—मी नीच, स्वार्थी, कार्यसाधु, दगलबाज हें माहीत असतां तूं मला ललितेसारखी सरळ व निष्कपट पोर अर्पण करणार ?

माधव--तो प्रसंग येऊं नये, पण आला आहे खरा.

रंगनाथ--तूं तिचा वल्लभ ना ? लहान-पणापासून तिच्या शरीराची, मनाची, शीलाची एखाद्या विश्वासू रक्षकाप्रमाणे जपणूक करणारा माधव आपल्या हाताने ती माझ्यासारख्या दरोडे-खोराला दान करितो, हें नवल नाही का ?

माधव—तूं तिच्या शरीरावर, मनावर आणि शीलावर पूर्वीच दरोडा घातल्यावर दुसरा काय उपाय राहिला ?

रंगनाथ—माझ्याशीं तिने कोणताहि संबंध ठेवूं नये, म्हणून तुझा आणि त्या पद्माकराचा केवढा अट्टहास! आणि, माझ्या हालचालीवर पहारा ठेवण्याकरितां तुमची कोण धडपड! पण मूर्खांनों, तुम्ही तिला सावध करीत होतां, तेव्हा तुमचा वैरी तुमच्या तोंडची त्याची नालस्ती आणि तुम्ही तिला दिलेला धोक्याचा इशारा दाराशीं कान देऊन ऐकत होता, आणि तुम्ही त्याच्या शोधार्थ शहरभर पायपीट करीत होतां, तेव्हा तो ललितेच्याच घरीं विलासांत दंग होऊन गेला होता, याची तुम्हांला दादहि नव्हती ना? वाहावा रे चाणाक्षपणा! तुमची खरोखर गुप्तपोलीस खात्यांतच नेमणूक करायला हवी!

माधव--ललितेचें अंतःकरण, नंतर शील आणि अखेरीस संपत्ति हस्तगत करून घेण्यांत तुझा जो धूर्तपणा दिसून आला, तो आमच्या अंगीं नव्हता, हें मी तावडतोब कबूल करितों. मग वाद कोठें राहिला? पुढे काय करायचें, हेंच आता पाहिलें पाहिजे. तूं ललितेशीं लग्न करायला कोणत्या अटीवर तयार आहेस, हें सांग. तिने तुजवर दाखविलेल्या निर्मल प्रेमाचें बक्षीस म्हणून, किंवा तूं तिच्याशीं केलेल्या कपटाचें प्रायश्चित्त म्हणून तूं तयार होशील, असें आतापर्यंतच्या अनुभवावरून वाटत नाही.

रंगनाथ--येथे मात्र तुझा चाणाक्षपणा वाखाणण्यासारखा आहे खरा!

माधव--मग सांग तर तुझी अट.

रंगनाथ--अट उघड आहे. तूं सत्तर हजार रोख मोजावेस आणि मी लग्नाला उभें रहावें.

माधव--तूं ललितेचीं पत्रें परत देतांना तीस हजार रुपयांचा आधीच अपहार केला आहेस. तेव्हा आणखी सत्तर हजार रुपये मागणें अन्याय आहे.

रंगनाथ--तोहि अपहार नव्हता आणि हाहि अन्याय नाही. ते तीस हजार ज्या अटीवर घ्यावयाचे मीं कबूल केलें, ती अट मीं प्रामाणिकपणें पार पाडली. आणि हे सत्तर हजार रुपये ललितेने तुझ्या संमतीने लग्न केल्यास तिला मृत्युपत्राप्रमाणेच मिळायचे आहेत. आणि, ती व मी आता एकत्र होणार आहोंत.

माधव—पण हा प्रकार माहीत असता तर मी त्या पत्रांना किंमत कशाला दिली असती?

रंगनाथ--ती किंमत तूं दिलीस, ती मजपासून शहाणपण शिकण्याबद्दल दिलीस; आणि ही मात्र माझ्या संमतीकरितां देतो आहेस. चल, काढ सत्तर हजार रुपये.

माधव--मी तुला सत्तर हजार रुपये द्यायला तयार आहें. पण ते ललितेच्या लग्नापूर्वी मिळणार नाहीत. लग्नानंतर मिळतील!

रंगनाथ—तें कां?

माधव—कां? तुझा मला विश्वास वाटत नाही, म्हणून. तूं मजपासून खरा प्रकार लपवून तीस हजार रुपये लुबाडलेस, तसे हेहि रुपये घेऊन लग्न न करितांच पळून गेलास, तर तुझें काय घ्यायचें? मी हा शहाणपणा तीस हजारांच्या बदल्यांत तुझ्यापासूनच शिकलों आहें. त्याचा या वेळीं नाही तर केव्हा उपयोग करायचा?

रंगनाथ—माझा तुला विश्वास वाटूं नये, असें माझें तुझ्याशीं आजपर्यंत वर्तन झालें आहे खरें. पण तूं माझा विश्वास धरीत नाहीस, तर मी तरी तुझा कां धरावा? मीं ललितेशीं लग्न केलें आणि तूं रुपये दिले नाहीस तर?

माधव—तुझा मजबद्दलचा पूर्वीचा अनुभव काय आहे? तुला दिलेला एक शब्दहि मी कधी खोटा केलेला तुला आठवतो का? शिवाय, मी आपलें वचन पार पाडण्याची तुला खात्री वाटावी, म्हणून खुद्द ललितेलाच तुझ्या स्वाधीन करायचें आहे ना? मी तुझे रुपये बुडविले, तर त्याचा सूड तुला तिच्यावर उगवितां येईलच!

रंगनाथ—रुपये पदरांत पडल्यावर मी तिला मायाळूपणाने वागवीन, अशी तुला खात्री असेल, तरच मी तिला निर्दयपणें वागविण्याची तुला धास्ती वाटणार! शिवाय तुला ललितेबद्दल आता जो कळवळा वाटतो आहे, तो क्षणिक आहे. आम्ही विवाहबद्ध होऊन आनंदाने नांदूं लागलों, म्हणजे त्याचें द्वेषांत रूपांतर होण्याला

मुळीच उशीर लागणार नाही. मला यापेक्षा भरवशालायक कांहीं तरी पाहिजे.

माधव—त्याकरितांच मीं एक योजना तयार केली आहे. ही पाहिलीस का माझ्या मृत्युपत्राची नक्कल ? (खिशांतून कागद काढून रंगनाथास देतो.) अस्सल मृत्युपत्र मी मोहरबंद करून पद्माकराच्या ताब्यांत बंदोबस्ताने ठेविलें आहे.

रंगनाथ—(वाचीत) आरंभीं तूं आपल्या ढासळलेल्या प्रकृतीचें वर्णन केल्यासारखें दिसतें. तुझी प्रकृति चिंताजनक झाली आहे खरीच. त्यापुढे मृत्युपत्र माझ्या नांवें करण्याचें कारण देतांना तूं ललितेच्या नांवाचा उल्लेखहि न करितां आपल्या सहाध्यायाच्या कलानैपुण्याचें व त्याने तत्प्रीत्यर्थ केलेल्या स्वार्थत्यागाचें बरेंच भडक वर्णन केलें आहेस, तेंहि ठीकच आहे. खरें कारण लपविण्याकरितां तें जरूरच होतें! माधव, त्या नैपुण्याकरितां मला एका पंडितेने आपला देह अर्पण केला आहे आणि एक पंडित आपलें वित्त अर्पण करीत आहे, हें पाहून मला किती धन्यता वाटते, म्हणून सांगूं?

माधव—रंगनाथ, ही थट्टेची वेळ नाही, आणि थट्टा सहन करण्यासारखी माझी मनःस्थितीहि नाही, हें तूं विसरतोस.

रंगनाथ—बरें बुवा राहिलें. (पुन्हा वाचीत, दचकून) अरे, याने तर तूं मला बाबासाहेबांचे सत्तर हजार रुपयेच केवळ नाहीत, तर स्वतःचेंहि सारें वित्त दिलें आहेस. इतकें औदार्य कां बुवा ?

माधव—औदार्य कसलें त्यांत ? तूत सत्तर हजार मिळण्यापेक्षा माझ्या मृत्यूनंतर मोठें धन मिळण्याकरितां तरी तूं तोंपर्यंत वाट पाहायला तयार व्हावें, इतकाच माझा हेतु आहे.

रंगनाथ—म्हणजे, मीं हातचें सोडून पळत्याचे पाठीमागे लागावें, असें तुझें म्हणणें ? मी नाही बोवा या गोष्टीला कबूल ! त्यापेक्षा मला लग्नानंतर जिनगी बक्षीस देण्याचा करारच लिहून देईनास ?

माधव—तो तुझ्या विवाहस्वातंत्र्याच्या आड येण्यासारखा असल्यामुळे बेकायदेशीर ठरण्याचा संभव आहे.

रंगनाथ—पण मी या अनिश्चित मृत्युपत्रावर तरी भरंवसा कसा ठेवावा ? लग्न होतांच तूं मृत्युपत्र फाडून टाकलेंस तर ?

माधव—मी ही नक्कल तुझ्या जवळच ठेवितों. जर मी अस्सल मृत्युपत्र फाडून टाकिलें, तर ती गोष्ट जाहीर करून तुला माझी कीर्ति धुळीला मिळवितां येईल !

रंगनाथ—आणि, मी तसें करण्यापूर्वी तूं माझाच खून केलास तर ? तुझा प्रेमभंग झाल्यामुळे तूं जिवावर उदारच झाला आहेस. माझ्या मृत्यूनंतर ही सारी जिनगी पद्माकराला मिळावी, अशी तूं मृत्युपत्रांत जी शर्त घातली आहेस, तिजवरून तो संशय दृढ होतो. नाही तर माझ्या मृत्यूचा येथे प्रश्नच कसा निघतो ?

माधव—सर्वांत श्रेष्ठ हक्कदार मृत्युपत्र करणाराच्या मृत्यूपूर्वीच मरण पावल्यास जिनगी कोणास मिळायची, याची तरतूद प्रत्येक मृत्युपत्रांत केलेली असते. तिचें तुला इतकें नवल काय वाटलें ? मृत्युपत्रांत ललितेचा कोणत्याहि प्रकारचा संबंध आणायचा नसल्यामुळे आणि ती मजकडून मिळणाऱ्या एका कपर्दिकेसहि स्पर्श करणार नाही, हें माहीत असल्यामुळे मी सारी जिनगी तुझ्या मृत्यूनंतर तिला न देतां पद्माकराला दिली आहे. यांतहि कांही विशेष नाही.

रंगनाथ—माधव, मला लग्नासारख्या कायमच्या बंधनाचा मनस्वी तिटकारा आहे ! मी ललितेशीं लग्न करणार, तो गृहसौख्य मिळण्याकरितां करणार नसून केवळ द्रव्यप्राप्तीकरितां करणार आहें ! ती द्रव्यप्राप्ति तुझ्या आयुष्याच्या लांबीवर अवलंबून असणार ! लग्न झाल्यावर हातीं जपमाळ घेऊन तुझ्या आयुष्याचा एक एक दिवस मोजीत बसण्याखेरीज तूं मला गत्यंतरच ठेविलें नाहीस ! तुझ्या मरणाचा उपाय हा एकच माझा तरणोपाय राहील !

माधव—येथेहि तुझी चूक आहे. या दीड महिन्यांत माझ्यांत किती फरक पडला, हें तूं पाहत नाहीस का ? तुझें लग्न होईपर्यंत माझा अस्थिपंजर होऊन जाईल. मग त्यांतून माझा प्राण उडून जायला काय वेळ ? हल्ली मला

ललितेच्या अब्रूचें रक्षण हें जगण्याला कारण तरी आहे. लग्न झाल्यावर तें नाहींसें होईल. अर्थातच मी महिना-पंधरा दिवसांचा काय तो सोबती असणार. तितक्याहि दिवसांचा अवधि तुला खपणार नसेल, तर तूं मला एकांतीं विषाचा पेला आणून दे. तो मी आनंदाने घेईन, आणि विषापेक्षाहि असह्य अशा जीवनांतून मुक्तता केल्याबद्दल तुझे उलट उपकारच मानीन! तुजवर खुनाचा आरोप येऊं नये, म्हणून आत्महत्येचा कबूली जबाबहि लिहून ठेवीन! तुला निस्सीम प्रेमाचा अनुभव नसल्यामुळे माझें हें आश्वासन खोटें वाटेल. पण त्यांत एका अक्षराचेंहि अंतर पडणार नाही!

रंगनाथ--मी लग्न लावतांच तूं मृत्यु-पत्राबद्दल बक्षीसपत्र करून देण्याला तयार आहेस?

माधव—होय वरदक्षिणा म्हणून लग्नांतच बक्षीसपत्र तुझ्या पदरांत घालीन.

रंगनाथ—पण मी तुझ्या आश्वासनावर विश्वास ठेवण्यापेक्षा तूंच माझ्या लग्नाच्या अभि-वचनावर विश्वास ठेविलास तर? मी लग्न केल्या-वर या जिनगीचा मालक व्हायचा, त्यापेक्षा या घटकेसच आत्महत्या करून मला मृत्युपत्रान्वयें जिनगी मिळण्याची निश्चिती केलीस, तर नाही का चालणार? नाही तरी तुला स्वतःच्या जिवाची पर्वा वाटत नाहीच!

माधव—लग्नापूर्वीच आत्महत्या करून तुझ्यासारख्या बेमानी व बेजबाबदार खविसाच्या हातीं ललितेची अब्रू देऊं? छें, छे! त्याची स्वप्नांतहि आशा बाळगूं नकोस!

रंगनाथ—या गोष्टीचा मला जरा स्वस्थपणाने विचार केला पाहिजे. मी लग्न केल्यावर लागलीच तूं आत्महत्या केलीस, किंवा बक्षीसपत्र करून दिलेंस, तर मला बाबासाहेबांचे सत्तर हजार रुपये आणि तुझी सारी जिनगी मिळणार! बरें, मीं लग्न न केलें, तर माझें काय नुकसान होणार?

माधव—लग्न न केलेंस, तर तूं या साऱ्या जिनगीला तर मुकशीलच पण तुला पत्रां-बद्दल गैरसमजाने दिलेले तीस हजारहि मी तुज-पासून हिरावून घेईन.

रंगनाथ—आणि, मी त्या दरोड्याची पोलिसांत वर्दी देऊन ललितेबद्दलचा सारा खरा प्रकार चव्हाट्यावर आणिला तर?

माधव—तुझ्यासारखा अधम तसेंहि करायला चुकणार नाही. पण तूं त्याबद्दल बभ्रा करूं लागलास, तर मी तुझा गळा दाबून प्राण घेईन! तूं मघाशीं म्हटल्याप्रमाणे मी खरोखरच जिवावर उदार झालों आहें! ललितेची अब्रू संभाळण्याकरितां मला फासावर लटकावें लागलें, तरी बेहत्तर.

रंगनाथ—छे, छे! तेथपर्यंत मजल मी येऊंच देणार नाही.

माधव—तें मला माहीत आहे. द्रव्य-लोभाशिवाय प्राणहानीच्या भीतीनेच काय तें तुझ्यावर दडपण पडणार!

रंगनाथ—मग मी काय करूं, तें सांग.

माधव—प्रथम तुझ्याजवळचे तीस हजार रुपये माझ्या स्वाधीन कर.

रंगनाथ—ते माझ्याजवळ शिल्लक राहिले आहेत कोठे?

माधव—खोटें बोलूं नकोस. ते तूं माझ्या देखत आपल्या बॅगमध्ये ठेवलेस. उघड ती बॅग आणि काढ ते रुपये. (रंगनाथ बॅग उघडून नोटा काढितो व माधवाला देतो.)

रंगनाथ—हा तर तूं खरोखरच मजवर दरोडा घातलास.

माधव—हें धन तूं दगलबाजीने मिळविलें आहेस. त्यावर तुझी मुळीच मालकी नाही. पण ते रुपये मलाहि नको आहेत. हं, आता खिशांतून ती मृत्युपत्राची नक्कल काढ आणि माझ्या स्वाधीन कर.

रंगनाथ—तूं आपल्या शक्तीच्या जोरावर मला हवा तसा वाकवितो आहेस. पण याद राख. याचा वचपा काढीन, तरच नांवाचा रंगनाथ!

माधव—मी सांगेन तसतसें तूं जर निमूट-पणें करीत गेलास, तर हें धन आणि ही नक्कल मी तुला बिनबोभाट परत करीन.

रंगनाथ—मी आणखी काय काय करायचें?

माधव—लग्नाच्या नोंदणीच्या कायद्यान्वयें द्यावयाच्या नोटिशीचा नमुना मी तयार करून आणिला आहे. त्यावर तूं प्रथम सही केली पाहिजेस. कुठे आहे दौत लेखणी ?

रंगनाथ— आंत जाऊन आणतों. पण मी आंत गेल्यावर तूं चलाखीने या नकलेबद्दल दुसरीच नक्कल ठेवून दिलीस, तर काय करायचें ? म्हणून प्रथम या नकलेवर मी आपली सही व तारीख...(खिशांतून पेन्सील काढून तसें करितो व नंतर आंत जाऊन गुप्ती घेऊन येतो.)

माधव—तूं दौत लेखणी आणणार होतास ना?

रंगनाथ—आणणार होतों, पण ही गुप्ती दिसतांच विचार बदलला. ही करितों लेखणी; आणि ती तुझ्या शरीरांत बुडविली, म्हणजे निराळ्या दौतीचें कारणच नाही!

माधव—माझा खून करणार ?

रंगनाथ—तूं जर तावडतोब आत्महत्या करून मला संपत्ति मिळवून देण्याऐवजी माझीच संपत्ति खुनाच्या धाकाने लुबाडूं लागलास, तर मला तरी दुसरा कोणता उपाय राहिला ? मला ती संपत्तीहि परत मिळविली पाहिजे आणि स्वतःचा प्राणहि बचाविला पाहिजे !

माधव—आणि, माझ्या वित्तावर हल्ला करण्याकरितां तूं माझा खून केलास, असा आरोप येऊन तुला उद्या फाशी जावें लागलें, तरी तुझी तयारी आहे म्हणतोस ?

रंगनाथ—माझ्यावर आरोप येऊं नये, अशी मी आधीच तरतूद केली आहे. तुझें प्रेत येथून दुसरीकडे नेऊन पोचविणें एवढेंच एक काम मला करावें लागेल! आणि, तें मला सहज उरकतां येईल!

माधव—तुला खुनाचें काम सोपें वाटत असेल. पण तुझ्यासारख्या व्यसनी आणि दुर्बळ माणसाला तें पार पाडणें दुर्घट आहे ! मनगट आणि मन खंबीर असल्याशिवाय तुझें शस्त्र काय करणार ?

रंगनाथ—या सुधारणेच्या कालांत सशस्त्र पोर सुद्धा निःशस्त्र पुरुषाला भारी असतें! मग मी तर काय,जवान आहें आणि तुझी अलीकडे काय दशा झाली आहे, हें तुझ्या चेहऱ्यावरून दिसतच आहे!

माधव—माझा सत्पक्ष आहे, या विश्वासाने ती उणीव दूर होईल. पाहूं या काय प्रकाश पाडतोस तो. (रंगनाथ माधवाच्या अंगावर धावून जातो, व त्याच्या पोटांत गुप्ती खुपसण्याचा प्रयत्न करितो. माधव वार चुकवून गुप्ती रंगनाथाच्या हातांतून हिसकावून घेण्याचा प्रयत्न करितो. उभयतांच्या झटापटींत माधव गुप्ती रंगनाथाच्या पोटांत खुपसतो, व घाबरून उठून दिवा मालवितो व निघून जातो! इतक्यांत पद्मा प्रवेश करिते व दिवा लावून रंगनाथाच्या प्रेताकडे पाहते व घाबरून त्याची बॅग घेऊन निघून जाते. पडदा पडतो.)

प्रवेश पांचवा

(पद्माकर सचिन्त मुद्रेने फेऱ्या घालीत आहे, इतक्यांत पद्मा हातीं बॅग घेऊन प्रवेश करते व पद्माकर समोर येतांच मटकन् खाली बसते.)

पद्माकर—कोण ? पद्माबाई ?

(पडदा पडतो.)

अंक चवथा

प्रवेश १ ला

[माधव, ललिता व पद्मा]

माधव—ललिते, आता तुला चांगली शक्ति वाटूं लागली ना ?

ललिता—दुर्दैवाने वाटूं लागली आहे.

माधव—यापुढे अशी उदासीन नको राहूंस, गडे.

ललिता—माधव, मला आयुष्यांत आनंद वाटायला कांही तरी कारण राहिलें आहे का? बाबा गेले, काका कैदेंत पडले आणि मी मरण आणि कैद यांपेक्षाहि भयंकर आपत्तींत पडलें आहें. बाबा कायमचे दुःखमुक्त झाले. काका लौकरच तसे होणार ! मी मात्र मरणाच्या दारीं बसलें असतां तुझ्या आणि पद्माबाईंच्या शुश्रूषेमुळे

पुन्हा दुःख भोगण्याकरितां खडखडीत बरी झालें ! माधव, आयुष्याचा एक एक क्षण मला मरणापासून दूर दूर नेत असला तरी अपकीर्तीच्या दरीकडे ओढून नेतो आहे. पद्मावाई, मला औषधाऐवजी विष कां हो नाही दिलेंत ? रात्रंदिवस अलोचन जाग्रणें करून माझी महानिद्रेपासून सुटका तरी कां केलीत ? असें कोणतें सुख आता दैवाने मला ठेविलें आहे ?

माधव—ललिते, मनुष्याला स्वतःचें सुख नसलें, तरी दुसऱ्याच्या सुखांत वाटेकरी होऊन सुखाचा अनुभव घेतां येतो ना ? तसें पाहशील, तर मला आणि पद्मावाईला तरी जगण्यासारखें कोणतें सुख उरलें आहे ? पण तुझ्या प्रकृतीला आराम पडत आहे, यांतच सुख मानून आम्ही जीविताचा भार वाहतोंच आहोंत की नाही ? खुनाची भयंकर वार्ता कानीं पडतांच तूं भावी विटंबनेच्या विचाराने किंकाळी फोडून मूर्छित झालीस, तेव्हा आमची स्थिति काय झाली, म्हणून सांगूं ? आमच्या शिरावर वज्राघातच झाल्यासारखें आम्हांला क्षणभर वाटलें ! पण आमच्या स्वतःच्या विवंचना बाजूस सारून तुझ्या स्थितीकडे लक्ष पुरवावें लागलें. तूं तापाने फणफणत किती तरी दिवस जीवितसंशयांत पडून होतीस. त्या वेळीं आमचाहि जीव आशा आणि निराशा यांमधील संशयाच्या संधिकालांत घुटमळत होता. त्याच अवधींत पद्माकराच्या अटकेची बातमी कळली. त्या संकटाने आमच्यावर आकाशच कोसळल्यासारखें झालें. परंतु आमची तळमळ बाजूला ठेवून आणि पद्माकराच्या स्थितीकडेहि दुर्लक्ष करून तुझ्या प्रकृतीकडे लक्ष्य पुरवावें लागलें. तुला किंचित् बरें वाटतांच तुझ्या कानांवर ती दारुण बातमी युक्तीयुक्तीने घालावी लागली, आणि स्वतःचा धीर सुटला असतां तुला धीर द्यावा लागला ! तुला जसजसें बरें वाटूं लागलें, तसतसा आमच्या जिवांत तकवा येऊं लागला. याप्रमाणे आम्ही जसा तुझ्या दुःखांत वाटा घेतला, तसें तुलाहि आपल्या आप्तेष्टांच्या सुखांत समाधान मानितां नाही का येणार ?

ललिता—माधव, मी फार आपलपोटी आहें, मला क्षमा कर. तुम्हीं माझ्याकरितां रात्रीचा दिवस केला, जिवाचें रान केलें, इतकेंच नव्हे, तर आपलें दुःख व काळजी आंतल्या आंत गिळून टाकलींत. तुमचे उपकार मजकडून जन्मोजन्मीं फिटणार नाहीत ! ते स्मरावयाचे तर राहोच. उलट मी त्यांची फेड तुम्हांला दुःखीकष्टी करूनच करीत आहें ! पण मी तरी त्याला काय करूं ? जिकडे पाहावें, तिकडे मला शून्य आणि भयाण अंधार दिसतो ! आनंदाचा किंवा आशेचा एक किरणहि दिसत नाही ! सामान्य माणसांच्या स्थितीहूनहि माझी स्थिति विपरीत झाल्यामुळे सुखदुःखाच्या माझ्या कल्पनाच बदलून गेल्या आहेत ! बाबांच्या मरणाचा खेद मानावा, की माझी लज्जास्पद स्थिति पाहायला ते जिवंत नाहीत, याचें समाधान मानावें, याबद्दल मी बुचकळ्यांत पडतें ! माझ्या पतीचा खून झाल्याचें दुःख मानावें, की आनंद मानावा, याचीच मला भ्रांति पडली आहे ! अपत्याच्या जन्माचा विचार मला आशादायक वाटतो की, भीतिप्रद, हेंच कळेनासें झालें आहे ! तुम्ही मला मरणाच्या दाढेंतून वाचविलें, पण तो तुमचा उपकार की अपकार, याचेंहि मला गूढ पडलें आहे !

माधव—दुर्दैवाने अशी स्थिति झाली आहे खरी ! पण ईश्वर करील, तर तुझ्या सुखाची बिघडलेली घडी पुन्हा नीट होऊन सारें कांही सुरळीत चालूं लागेल !

ललिता—अशी आशा करायला मला थोडी तरी जागा आहे का माधव ?

माधव—संपूर्ण आकाश मेघाच्छादित झालें, म्हणजे सुद्धा पुन्हा सूर्यदर्शन होण्याची आशा अशीच मावळत असते ! अंधकारामागून प्रकाश, दुःखामागून सुख हा सृष्टीचा क्रमच आहे !

ललिता—आशावादीपणाने मनाला स्वस्थता वाटून तात्पुरतें समाधान होतें खरें. पण त्याबरोबरच निष्काळजीपणा उत्पन्न होऊन कायमच्या दुःखाची तयारी होते. काकाच्या संकटाचीच गोष्ट घेईनास. तो निर्दोषी म्हणून खात्रीने सुटणार, असें म्हणून आपण हात जोडून

स्वस्थ बसलों आहोंत. त्याला सोडविण्याची आपण कांहीं तरी तजवीज केली आहे का ! म्हणतां म्हणतां त्याजवर खुनाचा आरोप ठेवण्यांत येऊन खटल्याचें स्वरूप बरेंच गंभीर आणि भयंकर झालें आहे !

माधव--तुझ्या आजारामुळे मजकडून त्या बाबतींत बरीच हयगय झाली खरी. पण आता तूं बरी झाल्यामुळे मला तिकडे लक्ष्य द्यायला चांगली फुरसद मिळेल. पद्माकर खास सुटणार, अशी तुझी खात्री असूं दे !

ललिता--अशा कोरड्या आशीर्वादावर स्वस्थ बसायला आता वेळ तरी किती उरला आहे ? पुरांत सापडलेल्या माणसाच्या गळ्याशीं पाणी आलें आहे ! तरी अजून ओठाशीं आलें नाही, असें म्हणणें काठावरच्या तमासगिरांना शोभेल. जिव्हाळ्याच्यां माणसांना शोभणार नाही ! माधव, हा केवळ तुझा आणि माझाच प्रश्न आहे, असें समजूं नकोस. पद्माबाईंनाहि काकाच्या भवितव्याची कशी सारखी काळजी लागून राहिली आहे ! मघापासून त्या याच विवंचनेंत चूर होऊन बसल्या आहेत !

माधव—तें माझ्या लक्ष्यांत आहे. पण पद्माकराच्या सुटकेच्या उपायाला लागण्यापूर्वी मला प्रथम तुझी सुटका केली पाहिजे. ती झाली, म्हणजे मी निश्चिंत मनाने तिकडे लागेन.

ललिता—माझी मृत्यूपासून सुटका झालीच आहे. काकाची सुटका मृत्यूपासून करायची आहे, तशी अपकीर्तीपासूनहि करायची आहे.

माधव—आणि, तुझी नाहीं का अपकीर्तीपासून करायची ?

ललिता—माझ्या अब्रूचें रक्षण करण्याचा जो उपाय होता, तो त्यांच्या मृत्यूने नाहीसा झाला. माझ्या मृत्यूनेहि माझ्या अब्रूचें रक्षण झालें असतें ! पण तुमच्या कनवाळूपणाने तोहि मार्ग खुंटविला आहे ! मी प्राणत्याग केला, तर अजूनहि मला अपकीर्ति टाळतां येईल. पण माझ्या प्रमादाचें प्रायश्चित्त माझ्या बाळाला कां बरें मिळावें ? त्याने बिचाऱ्याने काय पाप केलें आहे ? तें कांहीं नाही. मला स्वतःच्या हत्येबरोबर त्याची हत्या करण्यापेक्षा त्याचें रक्षण करण्याकरितां स्वतःचें रक्षण केलें पाहिजे. आता मला देशोधडीला लागण्यावाचून इलाजच राहिला नाही.

माधव—आम्ही तुला देशांतर करूं देऊं होय ?

ललिता—मग काय मी येथे राहून माझ्या मलिन कीर्तीने तुमच्या तोंडाला काळें फासूं ? त्यापेक्षा स्वतःचें तोंड काळें करणें चांगलें नाही का ?

माधव—आमचीं तोंडें उजळ आहेत, तोंपर्यंत आम्ही तुझें तोंड मलिन होऊं देऊं कसें ?

ललिता—येथे इच्छेचा प्रश्न नाही. सामर्थ्याचा प्रश्न आहे. आणि, माझें तोंड उजळ करणें आता मानवी सामर्थ्याच्या पलीकडचें आहे !

माधव—मला नाही असें वाटत. तुझें आणि तुझ्या घराण्याचें नांव निष्कलंक राखण्याचा एक उपाय अजूनहि उरला आहे.

ललिता—माधव, मग तो सांगण्याला उशीर कशाला करितोस ? यापूर्वीच का नाही सांगितलास ?

माधव--तुझी प्रकृति आजारामुळे आणि पद्माकराच्या काळजीमुळे इतकी क्षीण झाली होती की, तो उपाय सांगून तुझ्या चित्ताला धक्का देण्याचें मला धैर्य होईना !

ललिता—इतका का भयंकर तो उपाय आहे ? व्याधीपेक्षा औषधच भयंकर तर ?

माधव—इतरांना तो उपाय विशेष भयंकर वाटणार नाही. किंबहुना, आनंददायकच वाटेल. पण तुझी स्थिति अगदी विपरीत झाल्याचें तूं जें मघाशीं सांगितलेंस, त्यामुळे शंका वाटते.

ललिता—कळूं तरी दे असा कोणता उपाय तो.

माधव—विवाह !

ललिता--त्या शब्दाचा उच्चारहि करूं नकोस ! विवाहानेच तर माझ्यावर ही आपत्ति आली आहे !

माधव—आणि ती विवाहानेच दूर होणार आहे ! काट्यानेच काटा काढिला पाहिजे ! तुझ्या

विवाहाला विवाह म्हणायचें तरी कसें ? तो कायद्याने विवाह ठरत नाही. ज्याने तुझ्याशीं विवाह केला, त्याचा तुझ्याशीं विवाह करण्याचा उद्देश नव्हता. तो केवळ '**मायाविवाह**' होता ! मायामृगाप्रमाणे तो आभास होता. त्याची एखाद्या दुष्ट स्वप्नापेक्षा अधिक किंमत नाही !

ललिता—तो मायाविवाह असला, तरी विवाहाचें कार्य त्याने पार पाडिलें आहे ! तें स्वप्न असलें, तरी त्याने जागृतीचा कटु अनुभव आणून दिला आहे. कांही दिवसांपूर्वी त्यांत सात्त्विक प्रेम, निर्मल कीर्ति आणि शुद्ध आनंद हीं साठवल्यासारखीं वाटत होतीं. पण आता त्यांत नीच कामुकता, भयंकर अपकीर्ति आणि निर्भेळ दुःख हींच दिसत आहेत !

माधव—अजून तुला त्या स्वर्गीय वस्तूंचा अनुभव मिळवितां येईल.

ललिता—पतित स्त्रीला प्रेम, कीर्ति आणि आनंद मिळविण्याचा काय हक्क उरला ! जोंपर्यंत तिच्या हृदयांत गतपापाचें शल्य सलत आहे आणि तिच्या उदरांत त्या पापाचा साक्षीदार वाढत आहे, तोंपर्यंत तिने प्रेमाची भिक्षा कोणत्या तोंडाने मागायची ? कीर्तीची आशा कशी धरायची ? आणि, आनंदाचे ते दोन उगम दूषित झाल्यावर आनंद तरी कसा मिळवायचा ? मोकळेपणा आणि प्रामाणिकपणा हा तर वैवाहिक सुखाचा पाया. तो नसल्यावर तें सुख कसें मिळायचें ! चोरटेपणा व कपट हेच आता माझ्या जन्माचे सोबती होऊन बसणार आणि माझ्या अति उत्कट सुखाच्या वेळीं त्यांत संशयाचें आणि मत्सराचें विष कालवून त्याची नासाडी करणार !

माधव--असें म्हणूं नकोस. तुझें गतचरित्र माहीत असूनहि तुला पत्नी करायला एखादा पुरुष तयार होणें मला अशक्य वाटत नाही !

ललिता—पण असा महात्मा भेटेपर्यंत मला किती जणांना आपलें रहस्य सांगावें लागेल, याचा काय नेम ? जें रहस्य अत्यंत जिव्हाळ्याच्या माणसाच्या स्वाधीन असतांहि माझें जिणें नकोसें करून टाकीत आहे, तें चव्हाट्यावर आलें, तर माझा प्राण तरी राहील का, तूंच सांग !

माधव—तुझें रहस्य कळलें असूनहि तुझ्याशीं लग्न करण्याला उत्सुक असलेला एक मनुष्य मला माहीत आहे.

ललिता—केवळ एका पतितेचा उद्धार करण्याकरितां तिच्याशीं लग्न करण्याला तयार असणारा महात्मा ?

माधव—नाही, नाही ! तिच्याशीं लग्न करून स्वतःचा उद्धार झाला, असें समजणारा एक प्राकृत मनुष्य !

ललिता—कोण तो ?

माधव—अजूनहि तुला तर्क करितां येत नाही ? मग मी खरोखरच दुर्दैवी आहें ! कारण तुझ्या विपत्तींत तुला उपयोगी पडण्याचें भाग्यहि माझ्या ललाटीं लिहिलेलें दिसत नाही !

ललिता—काय, माधव ? तूं माझ्याशीं लग्न करणार ? तुझ्यासारखा पुण्यात्मा माझ्यासारख्या भ्रष्ट स्त्रीशीं विवाहबद्ध होऊन आपलें आयुष्य व्यर्थ घालविणार ?

माधव—ज्या दिवशीं तुझें माझ्यावर प्रेम नाही, असें पुरतें कळून चुकलें, त्याच दिवशीं माझें जीवित कवडीमोल ठरलें ! तुझ्या किंचित् उपयोगी पडतां आलें, तर त्याचें थोडेंबहुत सार्थक होईल. तें व्यर्थ कसें जाणार ?

ललिता—तुझ्या आयुष्याला नुकताच प्रारंभ झाला आहे. त्याची अकालीं वार्धक्य आलेल्या माझ्या आयुष्याशीं सांगड कशाला घालतोस ? तुझें मन आरशासारखें निर्मळ आहे. त्याला माझ्यासारखीच्या काळ्याकुट्ट संसर्गाने दूषित कशाला करतोस ?

माधव—ललिते, स्वतःला अशीं नसतीं दूषणें देऊं नकोस. तूं जर माझी अर्धांगी होऊन आपल्या दुःखाचा अर्धा भार माझ्या शिरावर घालायला आणि माझ्या निर्मल प्रेमाची स्वामिनी होण्याला तयार होशील, तर मी स्वतःला अत्यंत धन्य समजेन ! याहून अधिक तें काय सांगूं !

ललिता—पण माझ्याशीं लग्न करून तुला जो हीनपणा येणार, तो दुसऱ्याच एका कारणामुळे

येणार आहे. तूं ज्या दिवशीं माझ्याशीं लग्न न करण्याची प्रतिज्ञा केलीस, त्या दिवशीं तूं माझ्या दृष्टीने या प्राकृत जगांतून उडून दैवी जगांतील अत्यंत श्रेष्ठ अशा पदावर विराजमान झालास! ती भीष्मप्रतिज्ञा तूं केवळ माझ्या मोहाने मोडलीस, तर तुझा पुन्हा अधःपात होईल! माधव, मी तर क्षुद्र, पतित, पातकी स्त्री आहें. पण माझ्या माधवाने त्या उच्च स्थानावरून पुन्हा प्राकृत भूतलावर उतरावें, ही कल्पनाच मला सहन होत नाही! माझ्या सर्वनाशापेक्षा तुझा अधःपातच मला भयंकर वाटतो!

माधव--मी लग्न करायला उद्युक्त झालों, तो केवळ तुझ्या देहाच्या मोहाने, असें कधी म्हटलें? अजून माझी प्रतिज्ञा माझ्या मनांत जागृत आहे; आणि ती पुढेहि तशीच राहील, अशी मनांत पक्की खात्री बाळग. मला तर कामुक प्रेमापासून प्रेरणा मिळाली नाहीच, पण तुझ्याबद्दलचें प्रेम शुद्ध नसून विषयी आहे असा मला थोडा जरी संशय आला असता, तरी मी तुझ्याबरोबर एकत्र राहण्याचें धाडस करण्याला प्रवृत्त झालों नसतों. मी तुला बंधूसारखा आहें, म्हणूनच मी तुला पत्नी करणार आणि, तुला मी जरी पत्नी केलें, तरी तुझ्या देहाला ज्या क्षणीं मी स्पर्श करीन, तो माझ्या आयुष्यांतला शेवटचाच क्षण होईल!

ललिता—शाबास! माधव, तूं पुन्हा आपल्या दिव्यपदावर आरूढ झालास!

पद्मा--माधवराव, तुम्ही आणि ललिताताई अशीं दोघेंच धन्य आहांत, असें नाही, तर तुमच्या दिव्य प्रेमाचा आणि स्वार्थत्यागाचा हा साक्षात्कार पाहणारी मी सुद्धा धन्य आहें! तुम्ही आज मला मार्गदर्शक झालांत.

माधव—पद्माबाई, निर्मल प्रेमाचा ध्रुवतारा तुमच्या चित्तासमोर अखंड असतां तुम्हांला दुसऱ्या मार्गदर्शकांची जरूर काय?

ललिता—माधव, माझ्या जीविताच्या चुकलेल्या नौकेला तूं दीपस्तंभ आहेस. यापुढे कोणत्या वाटेने जायचें त्याचा मला उपदेश कर. तूं म्हणशील तेव्हा मी तुझ्याबरोबर बोहल्यावर चढायला तयार आहें. पण माधव, विवाहविधींत तुला मला स्पर्श करावा लागणार नाही का?

माधव—आपणाला नोंदणी कायद्याप्रमाणे विवाह करावा लागणार. आणि त्यांत वधूवरांना एकमेकांना स्पर्श करण्याची जरूर नसते. विवाहाची नोंदणी करण्यापूर्वी वधूने किंवा वराने एका पंधरवड्याची नोटीस द्यावी लागते.

ललिता—मग आणखीहि कांही दिवस आपणाला खोळंबून रहावें लागेल म्हणतोस?

माधव—त्याची मी पूर्वीच योजना केली आहे. खुनाच्या दुसऱ्या दिवशींच, म्हणजे पद्माकराला अटक होण्यापूर्वी, तुझी संमति गृहीत धरून मी तुझ्याशीं विवाह करण्याची नोटीसहि देऊन टाकली!

ललिता—माझी संमति घेतली असती, तर कोठे बिघडलें असतें?

माधव—त्या वेळीं तूं बेशुद्धींत असून संमति देण्याच्या अवस्थेंतच नव्हतीस. जरी असतीस, तरी खुनाच्या दुसऱ्याच दिवशीं तूं लग्नाला कितपत संमति दिली असतीस, याचीहि शंकाच आहे!

ललिता—आणि, मी आज संमति दिली नसती तर? तुझी फार अवघड स्थिति झाली असती नाही, माधव?

माधव—झाली असती, पण माझी त्याला तयारीच होती. गाजराची पुंगी वाजली तर ठीकच, नाही तर मोडून खाल्ली, इतकीच मी या नोटिशीची किंमत समजत होतों!

ललिता—तुझ्या औदार्याचा जों जों अंत पाहूं लागावें तों तों तें अनंतच दिसूं लागतें! तुझ्या या आटोकाट दूरदर्शीपणाच्या योजनेवरून तुझ्या कोमल व उदार हृदयाची ओळख नसलेल्या माणसाला असेंहि वाटायचें की, माझ्याशीं लग्न करण्याकरितां तूंच तो खून केलास! पण काका अटकेंत असतां लग्न करणें बरें दिसेल का?

माधव—लग्नाची नोटीस अटकेपूर्वीच दिली आहे. तेव्हा त्यांत गैर दिसण्याचें कारण नाही. तुझें लग्न एकदा पार पडलें, म्हणजे तुझ्या विवंचनेमुळे हतवीर्य झालेल्या पद्माकराला

स्वतःचा बचाव करण्याचे कामीं दुप्पट बळ येईल. म्हणून हें लग्न तुझ्या मनःस्वास्थ्यालाच केवळ नव्हे, तर त्याच्या सुटकेलाहि जरूर आहे. तेव्हा आता विलंब नको. नोंदणीच्या कार्यालयांत लग्नाच्या वेळीं दोन साक्षीदारहि हजर असावे लागतात. त्यांना बोलावणें पाठवितों. तोंपर्यंत तूं तेथे जाण्याची सिद्धता कर. (माधव एका बाजूने आणि ललिता आणि पद्मा दुसऱ्या बाजूने जातात.)

प्रवेश २ रा

[कृष्णा व राधा]

कृष्णा—डाक्टरसाहेब अटकेंत पडल्यापासून मला इकडे तिकडे करायला क्षणाचीहि फुरसद सापडत नाही. तूं मधून मधून येथे चहा आणण्याच्या निमित्ताने येऊन माझ्या कामाला हातभार लावतेस म्हणून जरा सोपें जातें. हं, तो चहाचा पेला आण इकडे आणि हा खलबत्ता घेऊन या औषधाची पूड कर. (राधा खलबत्ता घेऊन कुटूं लागते.) तोंवर मी चहा घेतों.

राधा—आज ताईसाहेबांची प्रकृति पुष्कळच सुधारली असल्यामुळे आप्पासाहेबांनी आणि पद्माबाईंनी मला चार तासांची सुट्टी दिली आहे. म्हणून इकडे यायला तरी सापडलें!

कृष्णा—आज सुट्टी देण्याचें कारण कळलें का तुला? आप्पासाहेबांनी ललितताईशीं लग्न करण्याची नोटीस देण्याला आज दोन आठवडे झाले. आज त्यांचें लग्न होईल, असें दिसतें.

राधा—मुहूर्तावाचूनच वाटतें?

कृष्णा—अग, अलीकडच्या इंग्रजी पद्धतीला मुहूर्त नाही लागत.

राधा—मुहूर्त नाही लागत, तरी मांडव, वाजंत्री, घाणा, उष्टीहळद, तेलफळ, रुखवत, होमहवन, हव्यकव्य, वरात, नळेचंद्रज्योती हीं तर हवींत ना?

कृष्णा—छेः, त्यांचीहि गरज नसते. नोंदणी अंमलदारासमोर मिय्याबिबींनी आणि दोन साक्षीदारांनी कागदावर सह्या करायच्या. हाच काय तो विधि आणि हेंच काय तें हव्यकव्य!

राधा—इश्श! आणि, त्या अंमलदारासमक्ष नवरानवरीने उखाणे घ्यायचे नाहीत, विडया तोडायच्या नाहींत आणि घासही द्यायचे नाहीत म्हणतां? काय बाई एक एक विलायती तऱ्हा निघतील त्या खऱ्या! आणि, नवरानवरींबरोबर सह्या करणारे जे साक्षीदार असतात म्हणतां, ते पाणजावईच ना? आणि, ते नवऱ्या मुलाला अंगठीसाठी रुसवीतहि नाहीत?

कृष्णा—या लग्नांत नवराहि रुसत नाही, आणि विहिणीकरवल्याहि रुसत फुगत नाहीत.

राधा—आणि, पंगतींत विहिणींनी एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढायच्या, उखाणे घेऊन एकमेकांना मर्मी झोंबण्यासारखीं दुरुत्तरें बोलायचीं, भांडणें करायचीं हाहि सर्वमान्य प्रघात या लग्नांत दिसून येत नसेल तर?

कृष्णा—या धर्मबुडव्या कायद्याने त्या साऱ्या उखाळ्यापाखाळ्या, दुरुत्तरें, शिव्याशाप नामशेष करून टाकिले आहेत. आता शिमगा जसा नामशेष झाला आहे, तसा लग्नविधीहि नांवाचाच उरला आहे!

राधा—पण मुहूर्ताची वाट न पाहतां, भटाभिक्षुकांची आणि शिष्टाचारांची पर्वा न बाळगतां इतक्या घाईने हें लग्न उरकण्याचें कारण तरी काय?

कृष्णा—दिवसांतून दहा वेळ माझ्या वाटेकडे डोळे लावून बसणारी तूंच का हा प्रश्न विचारते आहेस? अग, या घिसाडघाईचें कारण अलोट प्रेम. या प्रेमामुळे वधूवरांना नुसता रूढीचाच विसर पडला असें नाही, तर डाक्टरसाहेबांसारख्या निकटच्या आप्ताचाहि पडला. वरच्या कोर्टांत डॉक्टरसाहेबांच्या विरुद्ध पुरावाहि संपत आला. तरी यांची हेळसांड आणि डोळेझाक कायमच आहे! उलटपक्षीं, लग्न लावायच्या कामीं मात्र यांची गुढग्याला बाशिंग बांधण्यापर्यंत मजल गेलेली! काय म्हणावें याला?

राधा—मला एक संशय येत आहे. सांगूं का?

कृष्णा—सांगशील तर त्याचा खरेपणा पडताळून तरी पाहतां येईल?

राधा—मला वाटतें हा लग्नाचा बेत घाईने ठरलेलाच नसावा. अप्पासाहेबांच्या व ताईसाहेबांच्या गुप्त भेटी बऱ्याच दिवसांपासून होत आल्या असाव्यात. मागे एकदा ताईसाहेबांनी मला रात्रीचीं दोन तीन ताटें तयार करायला सांगितलीं होतीं आणि दुसरे दिवशीं सकाळीं त्यांना निजून उठायला उशीर लागला होता हें मी आपणाला सांगितलें होतें ना !

कृष्णा—बरं मग ?

राधा—त्या रात्रीं अप्पासाहेबच बहुधा ताईसाहेबांच्या भेटीला आले असावेत. त्यांच्या लग्नाचा बेतहि त्याच वेळीं ठरला असावा.

कृष्ण—तुझा तर्क सयुक्तिक दिसतो. पण मग लग्नाला इतकी दिरंगाई कां लावली ?

राधा—त्यांच्या गुप्त भेटींचा बोभाटा होण्याचा संभव पहिल्याने दिसला नसेल. तो दिसूं लागला, तेव्हा नोटिस दिली. आणि, पुढे तर ताईसाहेब आजारी पडल्यामुळे अप्पासाहेबांना डॉक्टरसाहेबांच्या खटल्याकडे लक्ष द्यायला फुरसदच झाली नाही !

कृष्णा—आजपर्यंत फुरसद झाली नाही आणि आता फुरसद होईल, तेव्हा लक्ष्य देण्यापासून कांही फायदा होणार नाही ! बिचारे डॉक्टरसाहेब मात्र मधल्यामध्ये फुकट प्राणाला मुकणार ! (डोळे पुसतो.)

राधा—कदाचित् डॉक्टरसाहेबांविरुद्ध असलेला पुरावा इतका बळकट असेल की, प्रयत्न करून सुद्धा त्यांची सुटका होण्यासारखी नसेल !

कृष्णा—प्रतिकूल पुरावा भक्कम आहे खरा. पण त्यांना अनुकूल पुरावा तयार करितां येणार नाही की काय ? खुनाच्या रात्रीं आपण कोठे होतों, याचा डॉक्टरसाहेबांना खुलासा करितां येत नाही आणि झडतीच्या वेळीं त्यांच्या खिशांत रक्ताने भरलेला रुमाल सापडला, याच गोष्टी त्यांना विशेष नडण्यासारख्या आहेत ना ? अप्पासाहेबांनी माझी साक्ष भरली असती, तर मी शपथेवर सांगितलें असतें की, डॉक्टरसाहेब खुनाचे रात्रीं रंगनाथाचे घरीं गेले नसून एका नायकिणीच्या जलशाला गेले होते. तेथे नाच चालू असतां जो रंग उडाला त्याने त्यांचा हातरुमाल भिजला !

राधा—म्हणजे डॉक्टरसाहेबांसारख्या भारदस्त पुरुषाला रंगेल करून सोडणार तर ?

कृष्णा—असें खऱ्याचें खोटें केल्याशिवाय आणि वडाची साल पिंपळाला चिकटविल्याशिवाय का खटले जिंकितां येतात !

राधा—आणि, खुनाच्या जागीं डॉक्टरसाहेबांची गुप्ती आणि त्यांच्या कपाटांत खून झालेल्या माणसाची बॅग सापडली, त्यांची वाट काय ?

कृष्णा—गुप्ती डॉक्टरसाहेबांच्या घरून बाहेर कशी गेली हें मला माहीत आहे. तरी ती बॅग गुप्तीच्या मोबदल्यांत खुनी माणसाला विकत दिली होती हें प्रत्यक्ष डोळयांनी पाहिल्याचें मी सांगितलें असतें !

राधा—पण तो खुनी मनुष्य कोण ? तो दिसण्यांत कसा होता, अशी संशयास्पद अदलाबदल करण्याचें कारण काय, असें विचारलें असतें, तर आपण काय सांगितलें असतें ?

कृष्णा—तें नसतें बोवा आपणांला सांगतां आलें !

राधा—आपण साक्ष दिली नाही, हेंच चांगलें झालें. दिली असती, तर ती डॉक्टरसाहेबांना चांगलीच भोवली असती !

कृष्णा—ती कशी काय बुवा ? कळूं तरी दे.

राधा—आपणांला असा प्रश्न विचारला असता की, खुनापूर्वी डॉक्टरसाहेबांची आणि रंगनाथाची किती दिवसांत गाठ पडली नव्हती तर आपण या प्रश्नाला काय उत्तर दिलें असतें ?

कृष्णा—डॉक्टरसाहेब दीड महिना पाळतीवर असतां त्याची एकदाहि गाठ पडली नाही, असें मी छातीवर हात ठेवून सांगितलें असतें !

राधा—डॉक्टरसाहेब त्याच्या पाळतीवर होते, याने त्यांजवरील आरोपाला बळकटी नसती का आली !

कृष्णा—अरेच्चा ! खरेंच की ! मला वाटतें, तूं सैपाकिणीपेक्षा किंवा परिचारिकेपेक्षा

वकीलच चांगली झाली असतीस! माझा तर तुझ्यापुढे क्षणभरहि निभाव लागला नसता! तुझ्या सवालापेक्षा तुझ्या डोळ्यांनीच माझी गाळण उडविली असती, आणि तुझ्या हास्यानेच मला रडकुंडीला आणलें असतें! हे पाहा, रोगी सुद्धा औषधाचें निमित्त पुढे करून तुझ्याभोवती घिरट्या घालायला लागले! का, घेलाभाई, औषध मिळायला क्षणभर उशीर झाला असता, तर तुमचा प्राण गेला असता की काय? तूं हें चहाचें सामान घेऊन जा कशी! मीहि तिकडे जाऊन रोग्यांचा परामर्श घेतों. (दोघे जातात.)

प्रवेश ३ रा

[पद्माकर व पद्मा]

पद्माकर—आज ललितेचें आणि माधवाचें लग्न होणार तर! रंगनाथ ललितेशीं लग्न लावण्यापूर्वीच मरण पावल्यामुळे माधवाची त्या वेळीं जी निराशा झाली होती, ती या लग्नाने नाहीशी होऊन त्याला तर आनंद झालाच असेल. पण मला सुद्धा ही बातमी ऐकून फार आनंद झाला! आमच्या घराण्याला अपकीर्तीचा डाग लागणार, ही माझ्या मागची एक मोठी काळजी दूर झाली. आता मला मरण जरी आलें, तरी मी समाधानाने मरेन! एका शठाच्या खुनाचा आरोप मी दूषणापेक्षा भूषणच समजतों!

पद्मा—पण आपण असे निराश होण्याचें कारण तरी काय?

पद्माकर—माधवासारखा माझा कायदेपंडित स्नेही सुद्धा जेथे निराशेने हातपाय गाळून स्वस्थ बसला, तेथे मी निराश होऊं नको, तर काय करूं?

पद्मा—माधवराव निराशेमुळे स्वस्थ बसले आहेत, असें नाही मला वाटत!

पद्माकर—मग?

पद्मा—त्यांना तुमच्या निर्दोषीपणाची पूर्ण खात्री आहे, म्हणूनच ते निश्चिंत आहेत. योग्य संधि आली, म्हणजे ते खरा खुनी उजेडांत आणतील!

पद्माकर—खुनी इसम कोण, याचा खुद्द मलाहि थांग लागत नाही, मग माधवाला कसा लागणार? आणि, खून करण्यांत त्याचा हेतु काय असावा? मृत्युपत्रांत रंगनाथानंतर माधवाची सर्व जिनगी मला मिळावयाची असें असतां, खुनी माणसाला खून करून काय लाभ झाला? माधवाने रंगनाथाला पन्नास हजार रुपये दिले होते, ही गोष्ट पोलिसाला माहीत नसली, तरी तुम्हांला व मला माहीत आहे. ते रुपये झडतींत सापडले नाहीत. यावरून त्याकरितां तर खून झाला नसेल ना, अशीहि एखादे वेळीं शंका येते!

पद्मा—द्रव्यलोभाप्रमाणे मत्सराचेंहि या खुनांत अंग असेल!

पद्माकर—असेलहि कदाचित्. कारण रंगनाथाने बऱ्याच स्त्रियांना फसविलें होतें. त्यांच्यापैकी एखादीने किंवा तिच्या वल्लभाने खून केला असण्याचा संभव नाही, असें नाही!

पद्मा—मी संशय घेतें, याची क्षमा असावी. पण यांत माधवरावांचें तर कांही अंग नसेल ना?

पद्माकर—छेः छेः, तुम्हांला मनुष्यस्वभावाची पारख नाही, म्हणून तुम्ही असें म्हणतां! त्याच्यासारख्या सच्छील, पापभीरु आणि कच्च्या दिलाच्या माणसाला खुनासारखें निर्दयपणाचें कृत्य शक्यच नाही! त्याला रंगनाथाचा मत्सरहि वाटत नव्हता, आणि, त्याला त्या पन्नास हजारांचा लोभहि नव्हता! त्याने खून केला असता, तर त्याने खुनाच्या दुसऱ्या दिवशीं रंगनाथाच्या मृत्यूने आपली भयंकर निराशा झाल्याचें बोलून दाखविलें नसतें! आणि, त्याच्या नियोजित पत्नीशीं लग्न करण्याची नोटीस देण्याचें धाडसहि केलें नसतें! उलट पक्षीं, तो आपल्या गुन्ह्याची कबुली देऊन तावडतोब सरकारच्या स्वाधीन झाला असता आणि त्याने माझी मान फासांतून सोडविली असती!

पद्मा—खुनी इसम सापडत नसेल, तर निदान आपल्या बचावाकरितां विरुद्ध पुरावा तरी ढासळून पाडायला नको का? खुनानंतर लगेच मी आपल्या दवाखान्यांत आलें, तेव्हा गुप्ती रंगनाथाने नेल्याची हकीकत मी आपणांला सांगि-

तली. तसेंच, माझी जखम बांधतांना आपण आपल्या हातरुमालाने रक्त पुसून—

पद्‌माकर—हो, त्या प्रसंगाची गोड आठवण म्हणून मी तो हातरुमाल जपून ठेवून दिला!

पद्‌मा—तसेंच, मी आणलेल्या बॅगमधून अंगठी व पत्रें काढून घेऊन कपाटांत ठेवून दिलीं. त्या साऱ्या गोष्टी जर आपण न्यायासनासमोर सांगाल, तर आपल्यावरील आरोपाचें आपोआपच निरसन होणार आहे! यापूर्वीच आपण त्यासंबंधाने मुग्धता स्वीकारावयास नको होती!

पद्‌माकर—मी जर ती स्वीकारिली नसती तर खुनाचा आरोप तुमच्यावर येण्याचा संभवच नव्हे, तर खात्री होती! तुमच्या निर्दोषीपणाबद्दल माझी मनोदेवता जर साक्ष देत नसती, तर मीहि तो आरोप खरा मानिला असता आणि तो आरोप तुमच्यावर स्थापित होण्यापेक्षा मजवर मरणाची आपत्ति जरी आली, तरी तिला मी सादर आहें!

पद्मा—माझ्यासारख्या पतितेच्या प्राणांचा आपल्या प्राणांपुढे तो काय बडेजाव असणार?

पद्‌माकर—पद्माबाई, तुमचें शरीर जरी कलंकित झालें असलें, तरी मन तसें नाही. स्त्रियांचें शील असें शठांच्या अत्याचाराने भ्रष्ट होऊं लागलें, तर या शठमय जगांत सुशील स्त्री मिळणेंच कठीण होईल! शरीराने भ्रष्ट परंतु मनाने पवित्र अशी तुमच्यासारखी स्त्री आपली म्हटल्यापासून मला कोणता कमीपणा येणार?

पद्मा—तर काय आपलें तें पूर्वीचें प्रेम अजूनहि कायम आहे, अशी गोड आशा मी मनांत बाळगावी?

पद्माकर—कायम आहे, इतकेंच नाही, तर मध्यंतरीं आलेल्या विघ्नामुळे अनिवार झालें आहे! खुनाच्या रात्रीं तुमच्यापाशीं मागणी करणें अनुचित झालें असतें. योग्य काल लोटल्यावर मीं ती मागणी निःसंशय केली असती. पण त्यापूर्वीच मी कैदेंत पडलों! आता तर त्याची आशाच करावयास नको!

पद्मा—नका, नका, असें बोलूं नका. तुम्ही माझ्या प्राणासाठी आपला प्राण द्यायला तयार आहांत, तर मी सुद्धा स्वतःचा प्राण आपणासाठी संकटांत घालणें योग्य होणार नाही का?

पद्‌माकर—मृत्युपत्राने मजवर आलेल्या संशयाचें जोपर्यंत निर्मूलन होत नाही, तोंपर्यंत तुमच्या साक्षीने माझा फायदा न होतां तुमचा मात्र सर्वस्वनाश होईल! तुम्ही माझ्या साथीदार होतां, असें ठरल्याने तुम्ही मजबरोबर शिक्षेला पात्र तर व्हालच, पण तुम्हांला साक्षींत आपल्यावरील अत्याचाराची कहाणी मांडावी लागून तुमची अपकीर्ति होईल!

पद्‌मा—माझ्या अपकीर्तीने मला आपलें मरण चुकवितां येईल तर मी स्वतःला कृतार्थ समजेन!

पद्‌माकर—पण त्या साक्षींत ललितेच्या रहस्याचाहि तुम्हांला स्फोट करावा लागेल, त्याची वाट काय?

पद्मा—त्यांच्या रहस्याचा परिस्फोट न करितां जर मला साक्ष देतां आली, तर आपली कांही हरकत नाही ना?

पद्‌माकर—तो तुमचा नुसता आत्मघात होणार आहे! अशा प्रकारें एकाबद्दल दोन जीव नाहक गमावण्यांत काय फायदा?

पद्मा—सती जाण्यांत जो फायदा व्हायचा, तोच फायदा होईल!

पद्माकर—पद्माबाई, आणि आपल्या वल्लभाप्रीत्यर्थ आत्मयज्ञ करणाऱ्या स्त्रीला तुम्ही अजून पतितच म्हणणार का? तुम्हांला प्रेमाने बाहुपाशांत घ्यायला मी कसा आतुर झालों आहें. पण तसें करण्याचा हक्क मिळण्यापूर्वीच मी त्या हक्काचा उपभोग घेऊं लागलों, तर त्या नीच रंगनाथांत आणि माझ्यांत कांहीच अंतर राहणार नाही! त्या स्वर्गसुखाला पात्र ठरण्याकरितां आपणाला बरोबरच स्वर्गारोहण करण्याची तयारी केली पाहिजे, ही तुमची सूचना कितीहि गोड असली, तरी तिलाहि मला संमति देतां येत नाही. पण तो पाहा, माधव इकडे येत आहे, तेव्हा तुम्ही आता जा. ललितेची अब्रू संभाळण्याची खबरदारी

अनुक्रमणिका

घेण्याचें आश्वासन मात्र लक्ष्यांत राहूं द्या, म्हणजे झालें. (पद्मा जाते. माधव प्रवेश करितो.)

पद्माकर—माधव, मला कडकडून भेट आणि तुझ्या विवाहाबद्दल मला प्रथम तुझें अभिनंदन करूं दे. ललितेसारखी सुंदर व सद्गुणी पत्नी मिळणें हें भाग्य प्रत्येकाच्या वाट्याला येत नाही!

माधव—ती प्रतिअप्सरा आहे, आणि तिच्या स्वामीला स्वर्गसुख मिळालें तर नवल वाटायला नको!

पद्माकर—मग तूं असा खिन्न काय म्हणून होतोस?

माधव—पद्माकर, मी तिचा स्वामी होणार आहे कुठे, की मला या लग्नांत इतका आनंद वाटावा? तुला माझ्या प्रतिज्ञेची आठवण आहे ना? तिच्या देहाला स्पर्श करणार नाही, ही माझी प्रतिज्ञा आहे आणि ती मी आजन्म पाळणार? आता आजन्म याचा अर्थ काय, हें ठरविणें अर्थात् दैवाधीन आहे!

पद्माकर—माधव, तूं तरी मला विचित्रच दिसतोस! अशी प्रतिज्ञा कोणी पाळण्याकरितां कां करीत असतें? आणि, ही प्रतिज्ञा तुझ्याकडून पार पडणार तरी कशी?

माधव—तो मलाहि प्रश्नच आहे! पण ज्या क्षणीं त्या प्रतिज्ञेचा मजकडून भंग होण्याचा संभव दिसेल, तो क्षण माझ्या आयुष्यांतील शेवटचा, असें मात्र समजण्यास हरकत नाही!

पद्माकर—मग ज्या लग्नांत प्रेम नाही, आनंद नाही—असें लग्न केलेंस तरी कशाला?

माधव—विषयोपभोगापासून मिळणारें एकच सुख जगांत असतें, असें नाही! आपल्या आवडत्या माणसाच्या उपयोगीं पडण्यापासून त्या सुखापेक्षाहि उत्कट आणि विपुल सुख प्राप्त होतें! पद्माकर, ललितेचें जरी मजवर प्रेम नसलें, तरी माझें तिजवर निःसीम प्रेम आहे; आणि तिच्याशीं लग्न केल्याने तिच्या घराण्याचें नांव रहाणार, तिला पतीचें आणि तिच्या अपत्याला पित्याचें नांव लावितां येणार, हा विचार त्या निःसीम प्रेमाचें समाधान करण्याला समर्थ आहे! मग या लग्नांत प्रेम नाही, आनंद नाही, असें म्हणतोस तरी कसें?

पद्माकर—तुझ्यासारखा लहरी आणि विक्षिप्त माणूस स्वर्गीय सुखाला पात्र नाही, असेंच म्हटलें पाहिजे!

माधव—स्वतःच्या निश्चयापासून न ढळणाऱ्या मनुष्याला अविचारी, अदूरदृष्टि, उतावळा हीं विशेषणें शोभतील कदाचित्. पण लहरी व विक्षिप्त हीं विशेषणें खास शोभणार नाहीत. तसें पाहिलें, तर मी यांत अविचार व उतावळेपणा तरी काय केला? स्त्रीला जर पतीच्या संगतीपासून सुख होत नाही, तर ती संगति तिजवर लादण्यापासून त्याला तरी काय सुख मिळणार? तो तिच्यावर निव्वळ अत्याचार होईल! आणि अशा पतीची योग्यता रंगनाथाहून अधिक कोणीहि समजणार नाही. त्याच्या पत्नीच्या त्याज-विषयीच्या औदासीन्याचें अशा हृदयशून्य वर्तनाने द्वेषांत रूपांतर होतें, आणि त्याचे स्नेही सुद्धा त्याला सहवासास अयोग्य समजून टाळूं लागतात! मी आपली प्रतिज्ञा तडीला नेली, तर मला निर्भेळ सुख मिळणार नाही खरें. पण पत्नीचा आणि स्नेह्याचा आदर मात्र खास मिळेल! पण मी हें काय बोलत आहें! स्नेह्यांच्या आदरावरचा पूर्ण हक्क स्थापित करण्यापूर्वीच मी त्यावर हक्क सांगत आहें! जोंपर्यंत माझा पद्माकर दुसऱ्याच्या अपराधाचें प्रायश्चित्त भोगीत तुरुंगांत हालअपे-ष्टांमध्ये दिवस काढीत आहे, आणि मी त्याच्या-करितां कांही एक प्रयत्न न करितां लग्नाच्या आनंदांत गर्क होऊन राहत आहें, तोंपर्यंत त्याला मजबद्दल आदर कसा वाटणार? उलट त्याने अशा मित्रद्रोही स्नेह्याचा तिरस्कारच केला पाहिजे! पद्माकर, माझी उपेक्षा पाहून तुला मजबद्दल भयंकर तिटकाराच वाटत असेल, नाही? तुझ्या गळ्याभोवतालचा फास मी सैल करावयाचा, तो उलट आवळीतच चाललों आहें! पद्माकर, माझा अपराध फार भयंकर दिसतो खरा; पण त्याला माझा इलाज नव्हता! लग्न करण्यापूर्वी तुझ्या सुटकेच्या प्रयत्नाला लागणें मला शक्य नव्हतें. मला क्षमा कर. तूं जर मला पाठमोरा झालास, तर

अनुक्रमणिका

मला प्रेमाचें आणि विसाव्याचें एकहि स्थान उरणार नाही ।

पद्माकर--माधव, असें काय वेड्यासारखें बोलतोस ? मी तुजबद्दल गैरसमज कसा करून घेईन ? ललितेशीं लग्न करण्यांत तुला असा कोणता स्वार्थ साधावयाचा होता, की मी त्याबद्दल तुला दोष द्यावा ? तुझ्या अकृत्रिम स्नेहावर माझा पूर्ण विश्वास आहे. आणि, तुझें वरकरणीं दिसणारें औदासीन्य सकारण होतें, अशी माझी पुरेपूर खात्री आहे. माझ्या निरपराधीपणावर तुझा कितपत विश्वास आहे, याची मात्र मला जबरदस्त शंका आहे !

माधव—माझ्या निर्दोषीपणाबद्दल तुझी जितकी खात्री आहे, तितकीच माझीहि तुझ्या निर्दोषीपणाबद्दल आहे ! तुझ्याविरुद्ध कितीहि भक्कम पुरावा असला आणि खटल्याचें स्वरूप कितीहि भयंकर झालें असलें, तरी त्याच्या परिणामाबद्दल तूं मुळीच चिंता वाहूं नकोस. ऐन वेळीं मी अपराध्याला खेचून न्यायासनासमोर उभा करीन !

पद्माकर—मी निर्दोषी आहें, याबद्दल तुझी जितकी खात्री आहे, तिच्याहूनहि अधिक अर्थात्च माझी स्वतःची आहे. पण प्रतिकूल पुरावा ढासळून पाडण्याची तुला जितकी खात्री वाटते, तितकी मात्र मला वाटत नाही !

माधव—साराच पुरावा हाणून पाडीन, असें मी म्हणत नाही. पण बहुतेक पुरावा हाणून पाडीन, अशी माझी खात्री आहे. खुनाच्या वेळीं तूं काय करीत होतास, तुझ्या खिशांत तो हातरुमाल व तुझ्या कपाटांत ती बॅग कुठून आली आणि तुझें नांव कोरलेली गुप्ती रंगनाथाच्या घरांत कशी सापडली, याचा मात्र तुझ्याप्रमाणे मलाहि उमज पडत नाही !

पद्माकर—त्याचा उलगडा तुला करितां न आला, तरी मला सहज करितां येईल.

माधव—मग जबाब देतेवेळीं गप्प कां राहिलास !

पद्माकर—त्याला तसेंच जबरदस्त कारण होतें. तें कारण तुझ्यासारख्या जिवलग मित्रालाहि मला सांगतां येत नाही. पुराव्यांतील ज्या गोष्टींचा मला मुळीच उलगडा होत नाही, अशाहि कांही गोष्टी आहेत. उदाहरणार्थ, खुनी माणसाचा खून करण्यांत उद्देश काय होता, यावर मी कितीहि विचार केला, तरी प्रकाश पडत नाही ! आणि, खुनी कोण, हें तर मला एक मोठें कोडेंच होऊन बसलें आहे !

माधव--तुला जें कोडें वाटतें, तें मला स्वच्छ काचेंतून पाहिल्याप्रमाणें स्पष्ट कळतें ! आणि, मला जें गूढ वाटतें, त्यांत तुला अगम्य असें कांहीच दिसत नाही ! आपण दोघांनी आपापली माहिती एकमेकांना सांगितली, तर आपणाला तुझ्याविरुद्ध असलेल्या पुराव्याचा डोलारा जमीनदोस्त करितां येईल !

पद्माकर--पण मला असलेली माहिती तुला देतां येणार नाही, असें मीं मघाशींच तुला सांगितलें. ती माहिती तुला दिली तर माझ्या एका आवडत्या माणसाबद्दल तुझ्यासारख्या चाणाक्ष कायदेपंडिताला चांगलाच वहीम आल्यावाचून राहणार नाही ! आणि तसा वहीम कोणाच्याहि मनांत क्षणभर येणें मला असह्य होईल !

माधव—तर मग मलाहि आपली माहिती तुला देतां येणार नाही ! कांही झालें तरी खरा गुन्हेगार न्यायासनासमोर येणार, याची मात्र खात्री असूं दे !

पद्माकर--माधव, तुझ्या बोलण्याचा रोख काय आहे, याबद्दल मला भय वाटूं लागलें आहे ! न्यायासनासमोर आलेल्या कांही पुराव्यावरून माझ्या एका आवडत्या माणसावर वहीम येण्यासारखा आहे !

माधव—होय, तें मला माहीत आहे; आणि तो वहीम निराधार नाही, हेंहि माहीत आहे !

पद्माकर—आणि, त्या माणसाला का तूं न्यायासनासमोर ओढणार ?

माधव—तुझा प्राण वाचविण्याकरितां मला तसें करावेंच लागणार !

पद्माकर—माधव, कृपा कर आणि तसें कांही एक करूं नकोस, त्या माणसावर खुनाचा

आरोप लागू झाला, तर मला शिक्षा न होतांच माझा प्राण निघून जाईल, आणि मला वाचविण्याचें श्रेय तुला मुळींच मिळणार नाही !

माधव—तुझे प्राण गेले, तरी प्राणांपेक्षाहि मोलाची तुझी अब्रू वाचविण्याचें तरी समाधान मला प्राप्त करून घेतां येईल ना ? पुष्कळ झालें. खुनाच्या किंवा मनुष्यवधाच्या गुन्ह्याने लागणारा कालिमा तूं क्षुल्लक समजतोस का ?

पद्माकर—रंगनाथाचा वध मी मनुष्य-वधच समजत नाही. तो पशूचा वध आहे ! किंबहुना, तो हिंस्र पशूचा वध आहे ! त्याने समाजाची हानि झाली नसून कल्याणच झालें आहे ! आणि, तो वध माझ्या त्या आवडत्या माणसाच्या हातून खरोखरच झाला असेल, तर तें माणूस मला हल्ली आहे त्याहूनहि अधिक प्रिय होईल ! पण तो त्याजकडून झाला नाही या-बद्दल माझी खात्री आहे. मी जितका निर्दोषी, तितकेंच तेंहि माणूस निर्दोषी आहे, असें मला अंतःप्रेरणेने निःसंदेहपणें वाटत आहे !

माधव—तुला तशी खात्री अंतःप्रेरणेने वाटत असेल. पण ती निराधार असल्याबद्दल खुद्द माझे डोळे ग्वाही देत आहेत ! तर तुझी खात्री माझ्या काय उपयोगीं पडणार ?

पद्माकर—रंगनाथाची हत्या करितांना तूं त्या माणसाला डोळ्यांनी पाहिलेंस ? खोटें ! अगदी साफ खोटें ! मृदु अंतःकरणाची आणि कोमल हातांची अबला हें घोर कर्म कसें करील ?

माधव—अबला ? म्हणजे खुनी मनुष्य स्त्री आहे, असें तुला वाटतें की काय ?

पद्माकर—खुनी स्त्री नाही, असें म्हण-तोस तर ? मग त्याला न्यायासनासमोर ओढून त्याच्या पदरांत गुन्ह्याचें पुरें माप घालण्याला माझी तुला पूर्ण परवानगी आहे ! त्या कामीं, झालें तर मजकडून तुला साह्यच होईल !

माधव—मला हें ऐकून फार आनंद झाला. मी जें कृत्य करणार आहें, त्याला माझ्या सर्व स्नेह्यांचा पाठिंबाच पाहिजे. (तुरुंगाचा अधिकारी प्रवेश करतो. त्याकडे पाहून) मला आता गेलें पाहिजे. यापुढे तुझ्यासमोर खुनी माणसाला उभा करीन, तेव्हाच तुझें दर्शन घेईन ! (जातो. पडदा पडतो.)

अंक पांचवा

प्रवेश १ ला

[ललिता, पद्मा व राधा]

ललिता—पद्माबाई, आज मी माधवाला आश्चर्यचकित करून सोडणार आहें हो ! नोकर-चाकरांच्या मदतीने दोन तासांत घरांतलें सगळें सामान कसें जिथल्या तिथे आणि नीटनेटकें लावून ठेविलें आहे. लग्न लागल्यावर आपण या घरीं राहायला आलों, आणि पाहतें तों चोहोंकडे एकच अव्यवस्था आणि गोंधळ माजलेला ! अविवाहित तरुणाच्या घरीं मुळीच शिस्त नसते म्हणतात, तें कांही खोटें नाही ! सैंपाकघरांत दुधादह्याच्या कपाटांत मेतकूट, मसाल्याचे डबे आणि लोणच्या मुरंब्याच्या बरण्या आणि फळांवर दूधदुभतें ठेवलेलें दिसलें. कोठीच्या खोलीला कुलूप नाही, कांही नाही ! नोकरांनी कितीहि धान्य लांबविलें, तरी त्याची दाद ना फिर्याद ! माजघरांत झालें तरी तीच गत ! कपड्यांच्या कपाटांत कपडे, पान-सुपारीचा डबा, पुस्तकें, चहाचें सामान, अत्तरांची पेटी, औषधांच्या बाटल्या, साबणाच्या पेट्या, उदबत्त्या, केशर, बूट, जोडे, ब्रश यांची खिचडी झालेली; तशीच बसण्याउठण्याच्या खोलींत टेबला-वर सुद्धा पुस्तकें, पानसुपारी, चहाच्या कपबशा, टाक दौत यांची अगदी गल्लत झाली होती !

राधा—ताईसाहेब, आणि देवघरांतल्या उपकरणांच्या तबकांत केस विंचरायचा ब्रश आणि लहान आरसा आणि गीतेच्या पुस्तकाबरोबर संगीत नाटकें पडलीं होतीं, तीं नाही सांगितलीं ?

ललिता—माधवाची आणि देवघराची गाठ पडते आहे कशाला ? तें खातें असायचें पुजाऱ्याच्या ताब्यांत. त्यांनी देवांना गंधाक्षता फुलें वाहाण्याच्या ऐवजी स्वतःचाच शृंगार केला, आणि

मंत्रांबद्दल पदें-लावण्या म्हटल्या, तरी तें कोणाला कळणार ? अशा चंगी भंगी लोकांना मी आता देणार आहे रजा, आणि सगळा कारभार घेणार आहें आपल्या ताब्यांत. आज संध्या-काळचा सैपाक मी आपल्याच हातांनी करणार आहें. आचाऱ्याने आणि राधाबाईनी आज खुशाल सुट्टी घ्यावी ! शिकलेल्या बायकांचें पुस्तकें वाचण्या-पलीकडे कशांतहि लक्ष्य नसतें म्हणतात. त्या आरोपाचें मी आज खासें खंडन करणार आहें !

पद्मा—खरेंच, माधवराव घरीं परत येत तोंपर्यंतच त्यांना गृहव्यवस्थेंत किती तरी सुधारणा दिसून येईल !

राधा—झोपायची खोली तर ओळ-खायलाहि येणार नाही, इतकें तिच्यांत अंतर पडलें आहे ! छपरपलंगावरील गादी, उशा, चादर, अभ्रे, मच्छरदाणी सारें सामान कसें पांढरें शुभ्र आणि आरशासारखें स्वच्छ दिसतें आहे. आणि त्यावर गुलाबपाणी शिंपडल्यामुळे सगळी खोली कशी सुगंधाने दरवळून गेली आहे !

ललिता—बिचाऱ्या माधवाचा माझ्या आणि काकाच्या काळजीमुळे डोळ्याला डोळा कसा तो लागला नाही ! इतक्या दिवसांत आजच त्याला सुखाने झोप येईल. पण ती सुद्धा काका-कडचें वर्तमान खुशालीचें असेल, तरच येणार !

पद्मा—देव करील, तर सारें ठीक होईल. (माधव प्रवेश करितो.)

ललिता—राधाबाई, तुम्ही जा आता, तुम्हांला आज सुट्टी आहे. दवाखान्यांत चहा घेऊन गेलांत, तरी चालेल.

माधव—आज न्यायसभेंत पद्माकराचा खटला इतर सर्व खटले झाल्यावर निघणार आहे. अजून थोडा अवकाश आहे, तोंपर्यंत आपणांला सारी तयारी केली पाहिजे.

पद्मा—मीहि जातें आणि न्यायसभेंत जाण्याची तयारी करितें. (जाते.)

ललिता—मलाहि गेलें पाहिजे. पण काका सुटण्याची आशा असेल, तरच जाईन. नाही तर मला कांही तिकडे जाण्याला धीर होणार नाही ! खटल्याचें स्वरूप कसें दिसतें आहे ?

माधव—दुसरें कसें दिसायचें ? पद्माकर सुटणार खास ! प्रत्यक्ष खुनी माणूसच न्याय-सभेपुढे पुराव्यानिशी उभा केल्यावर न्याया-धीशाला तरी पद्माकराला सोडण्याशिवाय दुसरा कोणता मार्ग मोकळा राहणार ?

ललिता—कोणा मेल्याचे हात असें भयंकर कृत्य करायला धाडवले, तें तरी कळूं दे !

माधव—इतक्यांत नाही. योग्य प्रसंग आला, म्हणजे तें आपोआपच कळेल !

ललिता—मोठा बेरड असेल नाही तो ?

माधव—तें कांही विचारूं नकोस. त्याला पाहिलें की, त्याचें पुन्हा दर्शन घेऊं नयेसें तुला वाटायला लागेल.

ललिता—केवढासा आहे तो ?

माधव—माझ्याच वयाचा का म्हणेनास !

ललिता—अरेरे !

माधव—त्याची अशी कीव करूं नकोस ! अशा माणसांना काळें पाणी न देतां मृत्यूचीच शिक्षा दिली पाहिजे !

ललिता—त्याच्या शिक्षेशीं आपल्याला काय करायचें आहे ? काका सुटणार, यांत सारें कांही आलें. माझा जीव खाली पडला. तुलाहि हायसें वाटलें असेल !

माधव—होय.

ललिता—पण मग तुझी मुद्रा अशी खिन्न कां ?

माधव—दगदगीमुळे थकवा आला आहे. आणि कपाळहि किंचित् दुखतें आहे !

ललिता—मग कांही खातोस का ?

माधव—पद्माकराचा खटला आटपेपर्यंत मी कांही न खाण्याचें ठरविलें आहे.

ललिता—मग जरा कपाळ चोळूं का ? अंगहि चेपतें हवें तर ?

माधव—तूं माझें कपाळ चोळणार ? आणि अंग चेपणार ?

ललिता—काय हरकत आहे ? तुझें सुख आणि समाधान हें यापुढे माझें एकच ध्येय राहणार. तुला बरें वाटावें, म्हणून मी घरांतील सगळी अव्यवस्था मोडून त्याला निराळीच कळा

आणिली आहे. आज संध्याकाळीं सुटल्यावर त्याला आणि तुला मी स्वतःच्या हातचें अन्न वाढणार. पण काका सुटण्यापूर्वी तुला बरीच मेहनत करावी लागणार आहे, तेव्हा म्हटलें, जरा पलंगावर पड. डोकें आणि अंग चेपून घे. म्हणजे तितकेंच बरें वाटेल.

माधव—तुझ्या हातचें अन्न खाण्याचें संध्याकाळीं पाहतां येईल. पण मला तुजकडून कपाळ चेपून घेतां येणार नाही, हें मात्र खास.

ललिता--कां बरें ?

माधव—मला तुझा स्पर्श होतां कामा नये !

ललिता—खरेंच ! तुझ्या प्रकृतीच्या विवंचनेंत मी तें अगदी विसरूनच गेलें होतें !

माधव—तूं विसरून गेली असशील. पण माझी प्रतिज्ञा माझ्या स्मृतीवरून तापलेल्या सांडसाने डागलेली आहे ! ती मी कशी विसरणार ?

ललिता—प्रतिज्ञा झाली, म्हणून काय झालें ? ती अशा किरकोळ गोष्टींत पाळायची की काय ? तुझा-माझा आता जन्माचा संबंध जुळून आला आहे. तुझी सेवाचाकरी भगिनीप्रेमानेच का होईना, मी नाही, तर करायची कोणी ?

माधव—किरकोळ गोष्टींनीच मोहाचें पोषण होत असतें. आणि, म्हणूनच मी इतकी प्रखर प्रतिज्ञा केली ! ती मला तितक्याच प्रखरपणाने पार पाडिली पाहिजे ! ललिते, तूं माझें कपाळ आणि अंग चेपलेंस, तर मला बरें वाटेल, असें तूं म्हणतेस. पण त्याने माझ्या अंगाचा कसा भडका उडेल, याची तुला कल्पना नाही ! तुझा निकटचा सहवास कितीहि मधुर असला, तरी मला विषासारखा कडू वाटतो ! तुझें शीतल आणि गोड भाषण माझ्या कानांना तप्त तेलाप्रमाणे लागतें ! तुझा मधुर स्पर्श तर विषारी सर्पाच्या दंशाप्रमाणे माझा तात्काल प्राणच घेईल !

ललिता—इतकी का तुला मी नकोशी झालें !

माधव—तूं माधुर्याची आणि सद्गुणांची पुतळी असतां कोणाला नकोशी होशील, हें संभवतें तरी का, ललिते ?

ललिता—मग माझा असा कंटाळा कां करितोस ? माझा तुला इतका त्रास कां वाटावा ?

माधव—तुझा कंटाळा ? तुझा त्रास ? चंद्रापासून अग्निकणांचा कधी तरी वर्षाव होईल का ? माझें हृदय तुझ्या सहवासांत विरघळतें आणि उचंबळूनहि येतें. पण तें अग्नीच्या आचेने विरघळणाऱ्या नवनीताप्रमाणे व भयभीत होऊन दूर सरणाऱ्या दुधाप्रमाणे नव्हे, तर चंद्रदर्शनाने स्रवणाऱ्या चंद्रकांत मण्याप्रमाणे व वर उचंबळणाऱ्या सागराप्रमाणे. पण याप्रमाणे मला मोहाला बळी पडतां कामा नये; तर मन घट्ट केलें पाहिजे.

ललिता—तुझा स्वभाव इतका निग्रही असल्यावर तुला क्षुद्र मोहाचें असें भय कां वाटावें ?

माधव—क्षुद्र मोह जिंकून प्रतिज्ञा शेवटाला नेण्याची मला आशाच नाही ! त्याकरितां मला तुझ्या सहवासाचा मोह बाजूलाच सारला पाहिजे. जर मी या मोहाला बळी पडलों, तर जन्मभर मला अत्यंत घोर शिक्षा भोगीत तळमळत राहावें लागेल !

ललिता—कोणती ती शिक्षा, माधव ?

माधव—तान्हेलेल्या ओठांपासून वितीच्या अंतरावर असलेल्या अधरामृताकडे अधाशीपणाने पाहत बसण्याची ! यापेक्षा कोणतीहि जन्मठेप भयंकर असेल, असें वाटत नाही ! ललिते, मला तुझ्या गोड सहवासाला अंतरलेंच पाहिजे. आणि तूंहि मला आनंदाने निरोप दिला पाहिजे !

ललिता—माधव, मी पाया पडतें, पण मला अशी दूर लोटूं नकोस ! तुला मजपासून सुख होत नसेल, तर तूं आपल्या पसंतीच्या दुसऱ्या कोणत्याहि स्त्रीशीं लग्न कर. मी त्याला मुळीच आड येणार नाही. फार काय सांगूं ? तुझ्या दुसऱ्या बायकोशीं मी सख्ख्या बहिणीप्रमाणे प्रेमाने वागेन, तिची सेवाचाकरी करीन, तिचीं लुगडीं धुईन, तिचीं मुलेंबाळें संभाळीन. पद्माबाईबरोबर प्रेमळ सवत म्हणून राहायला मी तयार झालेंच होतें. विचार पाहिजे तर त्यांना !

माधव—ललिते, तुझ्या प्रेमळपणाबद्दल कोण संशय घेईल ? पण तुझी इच्छा असली, तरी मी दुसऱ्या स्त्रीशीं विवाह करणार नाही. माझी इच्छा असती, तरी कायद्याने मला दुसरें लग्न करूं दिलें नसतें. त्या कायद्याखाली विवाहबंधनांतून मुक्त होण्याचा घटस्फोट हा एकच मार्ग आहे !

ललिता—घटस्फोट ? आणि लग्नाच्याच दिवशीं त्याची चर्चा ?

माधव—तुला पति आणि तुझ्या बाळाला पिता देण्याचें लग्नाचें कार्य होतें, तें त्याने केलें आहे. आता घटस्फोट करण्याला कांही हरकत नाही. ललिते, मला दुसरी पत्नी करून सुखी होण्याची तूं सूचना करावी, आणि मी मात्र तुझ्याकरितां दुसरा पति पाहण्याची कांहीच तजवीज करूं नये का ?

ललिता—माधव, तुझें माझ्यावर प्रेम आहे म्हणतोस आणि हे वाग्बाण तुला सोडवतात तरी कसे ? ते सोडण्याइतकें तूं आपलें मन घट्ट केलें असशील. पण ते सोसण्याइतकें माझें मन घट्ट नाही ! माझा एकदा गांधर्वविवाह झाला, दुसऱ्याने नोंदणी कायद्याप्रमाणे झाला आणि तिसरा ब्राम्ह विवाह करावा अशी तुझी इच्छा आहे ?

माधव—ते दोन्ही मायाविवाह होते. एकांत तुझा पति तुला फसवीत होता आणि दुसऱ्यांत आपण दोघांनी जगाला फसविलें ! तुला खरें संसारसुख मिळायला कपटाचा संसर्गहि नसलेला विवाहच केला पाहिजे !

ललिता—मला मिळालें तेवढें संसारसुख पुष्कळ झालें ! नव्याने संसार थाटण्याइतकी मला हौसच उरली नाही ! मला दूर ढकलण्याची तुला तळमळ लागलीच असेल, तर घटस्फोट करून घेण्याला माझी तयारी आहे ! तुझ्या मर्जीवरच आता माझा संतोष अवलंबून आहे !

माधव—घटस्फोटाची मला तरी तहान लागली आहे का, ललिते ? प्रेमविहीन पतिपत्नीस घटस्फोट तारक असेल, पण त्या शब्दाचा उच्चार—किंबहुना, त्याचा अस्पष्ट प्रतिध्वनीहि—प्रेमळ दम्पत्यांना मारक असतो. आणि, तो अपरिहार्य असल्याशिवाय तीं त्याचा कधीच अवलंब करीत नाहीत. आपलें दम्पत्य एकाचें प्रेम पतीचें आणि दुसऱ्याचें भावंडाचें याप्रमाणे जरी अस्वाभाविक असलें, तरी अत्यंत प्रेमळ आहे, यांत शंका नाही. छे, छे, घटस्फोटाची नुस्ती कल्पनाहि मला सहन नाही होत ! घटस्फोटाची पूर्वतयारीच किती भयंकर असते, हें कळलें, म्हणजे तुला थरकापच सुटेल !

ललिता—अगबाई ! असें काय असतें त्या तयारींत ?

माधव—तुला मुळीच माहीत नाही ना ? कुठून असणार ? जिने गांधर्वविवाहाचे परिणाम ठाऊक नसतां तो विवाह केला, नोंदणीच्या लग्नाचें स्वरूप माहीत नसतां जी त्या लग्नाला उभी राहिली, तिला घटस्फोटाची पूर्वतयारी तरी कुठून अवगत असणार ? ऐक ! घटस्फोट मागण्यापूर्वी पतिपत्नींपैकी एकाने दुसऱ्यावर हिडीस आणि भयंकर अपराधाचा आरोप केला पाहिजे. तूं करशील का मजवर तसा आरोप ?

ललिता—छेः ग बाई ! प्राण जाईल, पण ती गोष्ट मजकडून होणार नाही !

माधव—मी सुद्धा तुझ्यावर तसा आरोप करण्यापूर्वी प्राण सोडीन !

ललिता—तुला माझ्याशीं भावाप्रमाणे एकत्र राहायलाहि नको आणि घटस्फोटहि करून घ्यायला नको. मग तुझें म्हणणें तरी काय आहे ? मी तुझ्याशीं पत्नीधर्माने राहूं का ? बोल. 'होय' हा एकच शब्द म्हण. आणि, त्याच क्षणीं ही ललिता तुझ्या बाहुपाशांत—

माधव—काय ? पत्नीचें प्रेम नसतां माझ्याशीं स्त्रीधर्मानें वागणार ?

ललिता—हो, त्याला काय हरकत आहे ? एकमेकांवर काडीचेंहि प्रेम नाही, अशीं शेंकडो-हजारों जोडपीं नाहींत का आपल्यांत नांदत ? त्यांतलेंच आपलेंहि जोडपें होईल !

माधव—काडीचें प्रेम नसलें, तर काडीमोड करून घ्यावी !

ललिता—आपल्या जोडप्यांत वैवाहिक प्रेम मुळीच नाही, असेंहि म्हणतां येणार नाही. कारण तुझें मजवरील प्रेम त्याच स्वरूपाचें आहे.

माधव—मजवर पत्नीचें प्रेम नसतांना तूं माझ्याशीं पत्नीप्रमाणे व्यवहार करणें म्हणजे शुद्ध वेश्याचार होईल! आणि, तुझें मजवर प्रेम नसतांना मी तुझ्याशीं पतीसारखा व्यवहार ठेवणें केवळ अत्याचार होईल!

ललिता—मला दूर लोटण्याचा तुझा हट्टच आहे तर?

माधव—तुला दूर लोटण्याचा नव्हे, तर तुझ्या प्रेमळ दृष्टिकक्षेंतून हद्दपारी मिळविण्याचा माझा आग्रह आहे!

ललिता—तसा आग्रहच असेल, तर जा चापडा. मी कोण तुला अडवणार? त्याला कायदेशीर उपायाचें सोंग तरी कशाला पाहिजे?

माधव—सोंग येवढ्यासाठी, की माझ्या किंवा तुझ्या वर्तनाने समाजाला तुझ्याबद्दल कुशंका काढण्याला जागा राहूं नये. असा एक कायदेशीर उपाय आहेहि. त्याचा आश्रय करण्याला तूं मला आनंदाने परवानगी मात्र दिली पाहिजेस. त्या उपायांत तूं मजवर किंवा मी तुजवर कसलाहि गलिच्छ आरोप करण्याचें कारण नाही; आणि समाजाने तुझ्याबद्दल नसते तर्कवितर्क करण्याचेंहि कारण नाही.

ललिता—कोणता तो उपाय?

माधव—मी स्वतःवरच अशा एखाद्या भयंकर गुन्ह्याचा आरोप आणावयाचा, की ज्याला जन्मठेपीहून कमी शिक्षा होणारच नाही!

ललिता—गुन्ह्यावाचून आरोप?

माधव—मला खोटा आरोप ठेवून घ्यावा लागूं नये म्हणून मी गुन्हा करण्याची तरतूदहि आगाऊच करून चुकलों आहें!

ललिता—तूं गुन्हा केलास? आणि तो कसला?

माधव—मनुष्यवधाचा!

ललिता—आणि ही गोष्ट माझ्यापासून आजपर्यंत लपवून ठेवलीस?

माधव—लग्नापूर्वीच सांगितली असती, तर तुझी एका मोठ्या अडचणींतून सोडवणूक करण्याचें पुण्य मला पदरांत पाडून घेतां आलें नसतें. खुनी पुरुषाशीं कोणती स्त्री विवाह करील?

ललिता—पतित स्त्रीने केलाहि असता!

माधव—तिलाहि करतां आला नसता, असेंच त्या गुन्ह्याचें विलक्षण स्वरूप आहे!

ललिता—तो भयंकर गुन्हा माझ्यापासून हा वेळपर्यंत लपवून ठेविलास! मग तो आताच का सांगतोस?

माधव—त्यालाहि कारण आहे! तुझ्याशीं माझें जें कर्तव्य होतें, तें बऱ्याच अंशीं मजकडून पार पडलें आहे. पण माझें पत्राकरासंबंधाने जें कर्तव्य आहे, तेंहि तितकेंच पवित्र आहे. आणि तें पार पाडण्यासाठी मला तो गुन्हा कबूल केला पाहिजे!

ललिता—तुझ्या गुन्ह्याचा आणि त्या कर्तव्याचा फारच निकट संबंध असेल?

माधव—फारच निकट आहे! कारण मी जो गुन्हा केला आहे, त्याचाच खोटा आरोप पत्राकरावर आला आहे! त्यांतून त्याची सुटका केली नाही तर तो विनाकारण प्राणाला मुकेल!

ललिता—काय तूंच खून केलास?

माधव—खून नाही, मनुष्यवध—समर्थनीय मनुष्यवध!

ललिता—खून करून सवरून त्याचें समर्थन करतांना तुझी जीभ तरी कशी झडून जात नाही? चांडाळा, मला सौभाग्य मिळवून देण्याचें वचन दिलेंस आणि वैधव्य मिळवून देऊन त्या वचनाचा आणि माझा घात केलास! असें घोर कर्म करण्यांत तुझा हेतु तरी कोणता होता? तुला माझी अब्रू राखायची होती, तर तें काम त्यांची हत्या न करितां नसतें का साधितां आलें? हें घोर कृत्य तूं सूड उगविण्याच्या बुद्धीनेच खास केलें असलें पाहिजेस. किंवा, त्यापेक्षाहि नीच हेतु त्याच्या मुळाशीं असावा! ते तीस हजार रुपये हिसकावून घेण्याचा तर तुझा हेतु नव्हता ना?

माधव—ते रुपये मला परत मिळाले खरे!

ललिता—करून सवरून निर्लज्जपणें कबूल करतोस? मोठा निर्भीडपणाचा दिमाख दाखविलास आणि शेवटीं द्रव्यलोभाला बळी पडलास!

माधव—ललिते, मला ते रुपये नको होते !

ललिता—मग काय माझ्यासाठी हा खून केलास ? तसं असेल, तर मी त्या तीस हजारांनाच काय, पण बाकीच्या सत्तर हजारांनाहि शिवणार नाही आणि उलट खुनी मनुष्याला न्यायासनापुढे आणण्याच्या कामीं मदतच करीन. अशा दरोडेखोर खुनी विश्वासघातक्याला मृत्यूचीच शिक्षा पाहिजे !

माधव—ललिते, तूं मला देशांतराला जायला संमति देशील की काय, ही मला शंका पडली होती. पण जन्मठेपीपेक्षाहि भयंकर शिक्षा द्यायला तुझी तयारी आहे, हें पाहून माझें समाधान झालें ! आता मी आनंदाने फासावर चढेन ! अशा निर्वाणीच्या प्रसंगीं मला तुझे दोन गोड शब्द ऐकायला मिळत नाहीत, येवढेंच त्या आनंदांत एक वैषम्य राहिलें ! पण माझी ही तळमळ तरी किती वेळ राहाणार ? जन्मभर राहिली, तरी एखाद्या आठवडयापेक्षा दीर्घकाल राहणार नाही. ललिते, मी न्यायसभेंत चाललों. या खुनी मनुष्याचें तोंड पुन्हा तुझ्या दृष्टीस पडणार नाही ! (जाऊं लागतो.)

ललिता—(त्यास अडवून) नाही नाही ! माधव, माझी चूक झाली ! मी पदर पसरतें, मला क्षमा कर !

माधव—मी तुला क्षमा करणार कोण ? पतीचा घात केल्याबद्दल तूंच मला क्षमा केली पाहिजेस !

ललिता—माधव, असें म्हणूं नकोस. मी पतित झालें असतां तूं माझा उद्धार केलास ! मी मनाने वरलेला पति द्रव्यलोभी, वंचक, प्राणघातक होता, त्याबद्दल तूं मला निर्लोभी, परोपकारी व सदय अंतःकरणाचा बंधु दिलास, हे तुझे मजवर थोडे का उपकार झाले ? त्यांबद्दल मी तुला कृतज्ञता दाखवायची, की तुला शिव्याशाप द्यायचे ? मी शतशः अपराधी आहें !

माधव—असा स्वतःला बोल लावून घेऊं नकोस. मला ही हत्त्या कां करावी लागली, हें माहीत नसल्यावर तुला माझा इतका संताप येणें साहजिक होतें !

ललिता—हत्येचें कारण माहीत नसलें, म्हणून काय झालें ? तुझा स्वभाव तर माहीत होता ना ? आणि, ती हत्या त्या स्वभावाला सोडून थोडीच घडणार ? तिच्यांत तुझा कांही तरी उच्च हेतूच असणार !

माधव—नाही. केवळ स्वसंरक्षणाचा स्वार्थी हेतूच होता.

ललिता—म्हणजे ?

माधव—रंगनाथाने तुझ्याशीं लग्न करावें या शर्तीवर बाबासाहेबांचे उरलेले सत्तर हजार रुपये आणि माझी सारी संपत्ति मृत्युपत्राने त्याला देण्यास आणि लग्नानंतर त्याच्या हातून मरण्यासहि मी कबूल झालों होतों. पण त्याने त्यानें समाधान झालें नाही. लग्न न करितां केवळ माझा खून करूनच मृत्युपत्राच्या आधारें तावडतोब ती सारी दौलत पदरांत पडून घेण्याच्या इराद्याने त्याने माझ्या अंगावर हात टाकिला, आणि म्हणून मला निरुपायाने त्याला ठार मारावें लागलें !

ललिता—आणि, याला का तूं स्वार्थी हेतु म्हणतोस ? माधव, तुझ्या गुन्ह्यांत सुद्धा तुझा थोरपणा दिसून येतो ! अशा पुण्यात्म्यावर मीं पतितेने हवें तसें तोंडसुख घेतलें ! माधव, या अक्षम्य अपराधाबद्दल देव तरी मला क्षमा करील का ?

माधव—ललिते, तुझ्या संशयाबद्दल इतकें कांही वाईट वाटायला नको. दुर्दैवाच्या आघातांमुळे तुझा जगावरचा विश्वासच उडून गेला आहे, हें मला दिसत का नाही ?

ललिता—माधव, एकदा माझें मन एखाद्या अर्भकाच्या प्रमाणे विश्वासपूर्ण होतें. पण माझ्या विश्वासाचा त्या भयंकर रीतीने घात झाल्यावर मला साध्या गोष्टींत सुद्धा कपट दिसूं लागलें, याबद्दल तुला माझा राग न येतां कीवच आली पाहिजे. दुधाने तोंड पोळलें की माणूस ताक सुद्धा फुंकून पितें. मग माझ्या श्रद्धाळूपणावर निखारा पडल्यावर मीं शंकेखोर होऊं नये तर काय करूं ?

माधव—त्याबद्दल मी तुला दोष देत नाही. उलट तुझा विश्वास परत आल्याचें पाहून

मला धन्यता मात्र वाटते. पण आता मला न्यायसभेंत जाण्याची घाई केली पाहिजे !

ललिता—(त्यास अडवून) मी नाही तुला जाऊं देणार ! अशा महात्म्याचा प्राण मला कसेंहि करून वाचविलाच पाहिजे. न वाचविला तर मी जगाचें भयंकर अकल्याण करून त्याची अपराधी ठरेन !

माधव—मला हरकत करून तूं आपल्या चुलत्याची हत्या करणार ?

ललिता—(दूर होऊन) हाय, हाय ! मी किती तरी अडचणींत सापडलें आहें. माधव, आजपर्यंत माझी अडचणींतून सुटका तूंच करीत आलास ना ! मग तुलाच नको का माझी याहि अडचणींतून सुटका करायला ?

माधव—हल्ली इतरांच्या अडचणींपेक्षा मला पद्माकराच्याच अडचणीला प्राधान्य दिलें पाहिजे.

ललिता—पण त्याची मान फासांतून सोडविण्याकरिता तुला जो कबुलीजबाब द्यावा लागेल, त्याने तुझा प्राण तर जाईलच, पण तुला माझ्या दुर्भाग्याची कहाणी सांगावी लागून आजपर्यंत माझ्या अब्रूचें रक्षण करण्याचें जें श्रेय संपादन केलेंस तेंहि गमावून बसावें लागेल. पण मी हें काय बोलतें ? तुझ्यासारख्या उदार पुरुषाला कर्तव्यापासून परावृत्त करण्याकरिता स्वार्थाचें निमित्त पुढे करितें ! छेः छेः ! माधव, काकाला वाचविण्याकरितां तूं माझी अब्रू खुशाल चव्हाट्यावर आण.

माधव—मी अशी एक युक्ति करणार आहे, की मला तुझ्या दुर्भाग्याची वाच्यताहि करावी लागूं नये आणि मलाहि शिक्षा होऊं नये !

ललिता—खरेंच का हें ?

माधव—मी कधी विनाकारण खोटें बोलेन का ?

ललिता—अहाहा ! असें होईल, तर माझ्यासारखी भाग्यवान् मीच ! आता मी तुला आनंदाने निरोप देतें. काकाची आणि तुझी सुटका झाल्यावर आज संध्याकाळीं माझ्या हातचें जेवण जेवण्याचें वचन आहे ना लक्ष्यांत !

माधव—मी तुझ्या मर्जीबाहेर थोडाच आहें !

ललिता—मर्जीबाहेर नाही, असें तोंडाने मात्र म्हणतोस आणि मला स्पर्श न करण्याची प्रतिज्ञा मोडायला मात्र तयार नाहीस. शोभतें का हें तुला ?

माधव—तशी वेळ येईल तर प्रतिज्ञाहि मोडीन.

ललिता—काकाच्या सुटकेच्या आनंदांत मला कडकडून भेटावेसें तुला वाटलें, तर त्यांत नवल नाही ! आज रात्रीं मी तुझ्याकरिता सुंदर त्रयोदशगुणी तांबूल मुद्दाम तयार करणार आहें. आणि, कान जरा इकडे कर; (त्याच्या कानांत सांगते) आपल्या हाताने तुझ्या तोंडांत घालणार आहें. आपलें बहीणभावंडांचें नातें संभाळून तुला जितकें सुख मला देतां येईल, तितकें मी देणार आहें. तूंहि माझ्या पाटीवरून हात फिरविला पाहिजेस. वास्तविक पाहिलें, तर इंग्रज लोकांत बहीणभावंडें एकमेकांशीं वागतांना जितकी सलगी करतात, तितकी तुला व मला करायला काय हरकत आहे ?

माधव—ललिते, माझें कपाळ चढून गेलें आहे. मी जातों न्यायसभेंत निघून. पद्माबाईंची तयारी झाली असेल, तर त्यांना इकडे पाठवून दे. तूं आणि राधाबाई मागाहून आलांत, तरी चालेल.

ललिता—ही मी जातेंच आणि लगेच पद्माबाईंना पाठवूनहि देतें. (जाते)

पद्मा—(प्रवेश करून)—ही मी तयार आहें. चलावें.

माधव—निघण्यापूर्वी मला तुमच्याशीं थोडें बोलायचें आहे. मी आज पद्माकराला भेटलों, हें तुम्हांला माहीत आहेच. त्याचें माझें जें बोलणें झालें, त्यावरून तुम्हांला खुनासंबंधाने बरीच माहिती असावी असें दिसतें.

पद्मा—त्यांनी आपणांला तसें सांगितलें का ?

माधव—नाही. ती गोष्ट षट्कर्णी करण्याचा त्याचा विचारच नाही. मी ती गोष्ट तर्काने ओळखली.

पद्मा--आपला तर्क चुकीचा नाही. खून झाला, त्या वेळीं मी आंतल्या खोलींत मूर्च्छित होऊन पडलें होतें. सावध होऊन बाहेर येऊं लागलें, तों त्या खोलींत एकदम गडद अंधार झालेला दिसला आणि त्या अंधारांत एका पुरुषाची आकृति बाहेर पडतांना दिसली.

माधव--ती आकृति पद्माकराची नव्हती ना ?

पद्मा—छेः, मुळीच नाही.

माधव--ती आकृति माझ्यासारखी तरी होती का ?

पद्मा--होय.

माधव--बरें, पुढे ?

पद्मा--नंतर मी दिवा लावून पाहतें, तों तो भयंकर प्रकार! माझी अंगठी आणि पत्रें बॅगमध्ये होतीं. म्हणून ती बॅग मी हातीं घेतली आणि तडक दवाखान्याचा रस्ता धरिला. डॉक्टरसाहेब झोपण्याच्याच बेतांत होते. पण त्यांनी माझी जखम बांधली आणि बॅग आपल्या कपाटांत ठेवून दिली. ठेवण्यापूर्वी तिच्यांत असलेल्या सर्व प्रेमपत्रिका जाळून टाकल्या होत्या !

माधव—एकट्या तुमच्या साक्षीवर प्रतिकूल पुराव्याचा बराच भाग हाणून पाडितां येण्यासारखा आहे तर ?

पद्मा—ती गुप्ती तेथे कशी गेली, हें सुद्धा मला सांगतां येईल.

माधवा—वाः मग तर सर्वोत्कृष्ट झालें ! पण एका साक्षीदारावर पंच कितपत विश्वास ठेवतील, याची शंका आहे. शिवाय उलटतपासणींत तुमचा आणि पद्माकराचा नाजूक संबंधहि बाहेर येणार. तेव्हा तुमची साक्ष पक्षपातीपणाची ठरण्याचा बराच संभव आहे. सरकारी वकिलांचा स्त्रीदाक्षिण्याबद्दल बराच लौकिक आहे. पण दाक्षिण्य कर्तव्यनिष्ठेपुढे कितपत टिकेल, कोण जाणे !

पद्मा--माधवराव, मग डॉक्टरसाहेबांची सुटका होणार नाही का ? सांगा, सांगा. भीतीनें मी अगदी गांगरून गेलें आहें ! तुमचा शब्द मी न्यायाधीशाच्या निकालाइतकाच विश्वसनीय समजतें ! डॉक्टरसाहेबांना सुटकेची आशा आहे ना ! होय, किंवा नाही, यावरच माझें जीवन किंवा मरण अवलंबून आहे ! 'होय' म्हणा आणि एका अबलेला प्राणदान आणि चुडेदान दिल्याचें श्रेय घ्या.

माधव--अशा घाबरूं नका. तुमच्या जबानीच्या पुष्टीकरणार्थ जो साक्षीदार पाहिजे आहे, तो मी आधीच तयार करून ठेविला आहे. पद्माताई, पद्माबाई, पद्माकर माझा जिवलग मित्र आहे. त्याला मीं फासावर कधीच चढूं देणार नाही, ही खात्री बाळगा !

पद्मा—जन्मठेप तरी होईल का ?

माधव—छेः, तीहि नाही.

पद्मा—मला किती तरी धीर आला ! पण डॉक्टरसाहेब माझी साक्ष कधीहि घेणार नाहीत. मग मला माहीत असलेल्या गोष्टी पुढे मांडण्याची संधि तरी कशी मिळायची ?

माधव—त्याचीहि योजना मी केली आहे. आज मी पद्माकराच्या वकिलाजवळ बसून खटल्याचें निरीक्षण करणार आहे. तुमची साक्ष घेण्याची मी त्याला सल्ला देईन.

पद्मा—माधवराव, हे तुमचे उपकार मी कसे फेडूं ?

माधव—माझ्या कर्तव्याला जर आपण उपकार समजत असाल, तर तो फेडण्याचा एक मार्ग आहे.

पद्मा—सांगा.

माधव—साक्षींत ललितेच्या गत आयुष्याचा मुळीच संबंध येणार नाही, याबद्दल खबरदारी घ्या; म्हणजे मजवर मोठे उपकार होतील !

पद्मा—आपणहि कर्तव्याला उपकार समजतां. ललितताईंचा आणि आपला जसा जिव्हाळ्याचा संबंध आहे, तसाच माझा आणि डॉक्टरसाहेबांचा आहे. तेव्हा त्यांच्या पुतणीच्या गतचरित्राची मजकडून वाच्यता होण्याची भीतीच नको !

माधव—खरंच, तें मी विसरलोंच होतों. पद्माबाई पद्माकराची सुटका झाल्यावर तुम्ही

दोघांनी आनंदानें संसार करावा, येवढीच माझी इच्छा आहे. याचप्रमाणे ललितेला अनुरूप पति मिळवून देऊन मला त्यांचा योग घडवितां आला असता, तर कृतार्थ झाल्यासारखें वाटलें असतें!

पद्मा—आपलें नांव धारण करण्यांत त्यांना जो अभिमान वाटतो, तो दुसऱ्या कोणाहि पुरुषाबद्दल वाटणें शक्य नाही!

माधव—शिवाय मी जिवंत आहे, तोपर्यंत तिला लग्न करणें शक्यहि नाही!

पद्मा—इडापिडा टळो आणि अमंगळ पळो!

नोकर (प्रवेश करून)—डॉक्टरसाहेबांचा खटला आता लौकरच उभा राहील, अशी सूचना देण्याकरिता त्यांच्या वकीलसाहेबांनी मला पाठविलें आहे.

माधव—आलोंच, तूं जा. (नोकर जातो.) पद्माबाई, चला, जाऊं. मला कृष्णाशीं थोडें काम आहे. तें मी उरकतों, तोंपर्यंत तुम्ही जरा दवाखान्याबाहेर उभ्या रहा. दोन मिनिटांतच मी आपलें काम आटोपून परत येतों. (जातात)

प्रवेश २ रा

[कृष्णा व राधा]

कृष्णा—आज तुला सुट्टी मिळाली आहे म्हणून मला कितीतरी आनंद व्हायचा! पण डॉक्टरसाहेबांच्या काळजीमुळे कांही सुचत नाही आणि हा चहासुद्धा, गोड लागत नाही!

राधा—येथे काळजी करीत बसल्याने ती दुणावते मात्र. त्यापेक्षा न्यायसभेंत जाऊन खटला पाहणें बरें.

कृष्णा—तुझी सूचना मला पटली. पण जाण्यापूर्वी मला दवाखान्यांतला मृत्यूचा दरबार बरखास्त केला पाहिजे. आजच्या खटल्यापुढे त्याची मातब्बरी ती किती?

माधव—(प्रवेश करून)—अरे वा! राधाबाई येथेच आहेत का? राधाबाई, तुमच्या मालकिणीला न्यायसभेंत खटला पाहायला जायचें आहे. ती तुमचीच वाट पाहत बसली आहे.

राधा—बरें तर, मलाहि तिकडेच जायचें होतें. (जाते)

माधव—कृष्णा, मी आज पद्माकराला भेटायला गेलों होतों.

कृष्णा—ते सुटण्याची कांही आशा आहे का?

माधव—आशा कां? खात्रीच आहे म्हणेनास! मी त्याला तसें आश्वासनहि दिलें. आणि, त्याने त्याचें समाधानहि झालें. पण न जाणों, तें आश्वासन खोटें ठरलें, आणि त्याला फाशीची किंवा जन्मठेपीची शिक्षा झाली, तर ती शिक्षा भोगण्यापेक्षा प्राणत्याग करण्याचा त्याचा निर्धार झाला आहे. आणि त्याकरिता त्याने दवाखान्यांतून एक भयंकर विष मागितलें आहे!

कृष्णा—त्याचें नांव? (माधव त्याच्या कानांत सांगतो) अरे बापरे! तें तर साऱ्या विषांचा राजा! त्यावर कोणताच उतारा नाही! आणि त्याने होणाऱ्या वेदनांचे वेग जरी अंतराअंतराने आले, तरी दोन घटकांतच 'राम' म्हणायला लावल्याशिवाय तें राहावयाचें नाही! इतकें जलाल विष दिसतें तरी कसें, पाहूं तर दे.

कृष्णा—(कपाटांतून कुपी काढून माधवास दाखवितो व परत ठेवितो) पण माझा प्राण गेला तरी हें देऊन मी स्वामिहत्या मुळीच करणार नाही!

माधव—वेडा आहेस! अरे, संभावित माणसाचा अब्रू हाच प्राण असतो! हें दिलेंस तर तूं आपल्या मालकाला जीवदानच दिल्यासारखें होणार आहे.

कृष्णा—माफ करा. हें काम माझ्या हातून साफ होणार नाही.

माधव—शाबास खरा स्वामिभक्त आहेस! मी तरी मित्रहत्या कसा करीन? तुझी नुसती परीक्षा पाहिली झालं. आता आपणाला खटल्याचा निकाल होईपर्यंत यापैकी एकहि विष कोणाच्या हातीं लागणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे. कोण, राधाबाई? इतक्यांतच आलांत? (प्रवेश करते. कृष्णा वळून तिजकडे

पाहतो तोंच माधव कपाटांतील कुपी काढून खिशांत ठेवितो. कपाट बंद करतो)

राधा--(कृष्णास) ताईसाहेबांनी आपणांलाहि आमच्याबरोबरच यायला सांगितलें आहे.

कृष्णा—दवाखाना बंद करून आलोंच. तूं पुढे हो. (राधा जाते)

माधव—या कपाटाला माझ्यादेखत कुलूप लाव पाहूं (कृष्णा कुलुप लावतो) आणि ती किल्ली मला दे. (कृष्णा त्याप्रमाणे करतो, माधव जातो. मागाहून दवाखाना बंद करून कृष्णा जातो.)

प्रवेश ३ रा

[न्यायसभेचा देखावा—न्यायाधीश, शिरस्तेदार, कारकून, पंच, सरकारी वकील व आरोपीचे वकील आपापल्या स्थानीं बसले आहेत. आरोपीच्या वकिलाजवळ माधव बसला आहे. पद्माकर आरोपीच्या पिंजऱ्यांत उभा आहे. प्रेक्षक आपल्या स्थानीं वसले आहेत.]

न्यायाधीश—शिपाई, प्रेक्षकांतली गडबड मोडून तावडतोब शांतता कर !

चपराशी—खामोष, खामोष ! (प्रेक्षक शांत होतात. इतक्यांत ललिता, राधा व कृष्णा येऊन प्रेक्षकांत बसतात.)

न्यायाधीश—हं, पद्माबाई, तुमची जबानी पुढे वाचून दाखवितों, ती लक्ष्यपूर्वक ऐका. (वाचितो) "खुनाच्या ठिकाणाहून बॅग घेऊन मी जी निघालें, ती थेट आरोपीच्या दवाखान्यांत गेलें. दवाखाना बंद झाला होता. आणि आरोपीहि जेवणखाण उरकून झोपण्याच्या तयारींत होता. पण त्याने माझ्या जखमेवर तावडतोब योग्य उपचार केला आणि ती धुवून नीट बांधिली. मुद्देमालापैकी हातरुमालाला लागलेलें रक्त माझेंच असून तें जखम पुसतांना लागलेलें आहे. नंतर आरोपीने हातरुमाल खिशांत ठेवून बॅग कपाटांत ठेवून दिली. ती ठेवण्यापूर्वी तिच्यांतील अंगठी मीं काढून घेतली होती. मुद्देमालांतील बॅग मी मृताच्या घरून आणलेली बॅगच होय. तिजवर मृताचें नांव आहे. खुनी मनुष्याची आकृति आरोपीच्या आकृतीशीं मुळींच जुळण्यासारखी नसल्यामुळे त्याने खून केला नाही असें मी प्रतिज्ञेवर सांगूं शकतें. शिवाय माझा पूर्व अनुभव आरोपीच्या निर्दोषीपणास इतका अनुकूल आहे की, त्याजकडून हा भयंकर खून झाला असेल, असें मला स्वप्नांतहि खरें वाटणार नाही !" पद्माबाई, तुम्ही आरोपीच्या वकिलांच्या सवालांना जबाबादाखल दिलेली जबानी येथे संपली. आता सरकारी वकिलांच्या सवालांस तुम्ही काय जबाब दिले ते ऐका. "आरोपी पाठशाळेंत शिकत होता आणि मी परिचारिकेचें शिक्षण घेत होतें, तेव्हा त्याचा आणि माझा प्रथमतः स्नेह झाला. एकमेकांशीं लग्न करण्याचीं आमचीं वचनेंहि झालीं होतीं. पण त्यानंतर लौकरच मला कांही कारणांमुळे तें वचन मोडून मृताशीं लग्न करण्याचा संकल्प करावा लागला. तें कारण आरोपीच्या विश्वासघातामुळे मुळीच उपस्थित झालें नसून मृताच्या विश्वासघातामुळे उपस्थित झालें होतें. तें न्यायासनापुढे मांडण्याला मला स्त्रीसुलभ लज्जेमुळे संकोच वाटतो. न्यायमूर्तींनी आज्ञा केल्यास तें जाहीर करण्यास मी तयार आहें. मुद्देमालांतली गुप्ती आरोपीनेच मला स्वसंरक्षणाकरितां दिली होती, हें मी पूर्वी सांगितलेंच आहे. ती गुप्ती मृत इसम खुनाच्या दिवशीं मजपासून माझ्या इच्छेविरुद्ध घेऊन गेला होता. मृत इसम माझ्याशीं लग्न करण्यास तयार होण्यापूर्वी माझ्या बोटांतील अंगठी मागूं लागला; परंतु ती देण्यास मी तयार नव्हतें. म्हणून ती हिसकावून घेण्याकरितां त्याने मला जोराने ढकललें व त्या धक्क्यानेच पडून मी मूर्च्छित झालें. यावरून मृत इसम त्या वेळीं खून करण्याच्या मनःस्थितींत होता, हें उघड आहे. उलट पक्षीं, आरोपी मला भेटला त्या वेळीं त्याच्या मनाची कोणतीहि चलबिचल झालेली दिसली नाही. या गोष्टी मी पूर्वी संक्षेपाने सांगितल्या आहेतच. त्या आता किंचित् विस्ताराने सांगितल्या, इतकेंच. माझ्या भेटीच्या प्रसंगाबद्दल आरोपीने जें मौन स्वीकारिलें आहे, तें माझा खुनाच्या आरोपापासून बचाव करण्याच्या उद्देशानेच स्वीकारिलें असावें. परंतु मृताचा सूड घेण्याकरितां

किंवा माझी त्याच्या कचाट्यांतून मुक्तता करण्याकरिता आरोपीने हा खून केला, असें मला वाटत नाही. मी आज हा खटला चालण्यापूर्वी आरोपीची भेट घेण्याकरितां तुरुंगाच्या अधिकाऱ्यांच्या परवानगीने गेलें होतें, ती आरोपीपासून साक्ष देण्याची परवानगी मिळविण्याकरितांच गेलें होतें. माझ्या जबानींत बाहेर आलेल्या गोष्टींवरून मजवर खुनाचा आरोप होण्याचा संभव आहे, हें मी जाणून आहें व त्याचे परिणाम भोगण्याला माझी तयारी आहे." पद्माबाई, संपली तुमची जबानी. ही बिनचूक आहे ना ?

पद्मा—होय.

सरकारी वकील--या साक्षीदाराविरुद्ध सरकारला खटला उभा करावा लागेल, असें दिसतें !

माधव--वकीलसाहेब, ती तसदी आपणांला मुळीच पडणार नाही. कारण यापुढे ज्या इसमाची साक्ष व्हावयाची आहे, त्याच्या जबानीने आरोपीवरील आरोपाबरोबर पद्माबाईवरील आरोपहि निराधार ठरणार आहे. (साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत जाऊन उभा राहतो.)

न्यायाधीश—आप्पासाहेब, हें काय करितां ?

माधव--साक्षीदार म्हणून उभा राहिलों आहें ! कारण खटल्यांतील पुढील साक्षीदार मीच आहें !

न्यायाधीश—काय ? आपण ?

माधव--होय. न्यायदानास मदत म्हणून आपण स्वतःच माझी साक्ष घ्यावी अशी विनंती आहे.

न्यायाधीश—आतापर्यंत आरोपीच्या वकिलाचे सल्लागार होतां ना ?

माधव—आतापर्यंत वकिलांचा सल्लागार होतों. या घटकेस साक्षीदार म्हणून उभा आहें ! पुढील घटकेस कदाचित् विश्वाच्या सर्वसाक्षी न्यायाधीशापुढे आरोपी म्हणून उभा राहीन !

न्यायाधीश—आप्पासाहेब, आज सकाळीं आपला विवाह लागला आणि संध्याकाळीं आपणांला स्नेह्यावरील खुनाच्या खटल्यांत भाग घ्यावा लागत आहे ! उत्कट आनंद आणि उत्कट चिंता यांचा लागोपाठ अनुभव घेऊन विलक्षण चित्तक्षोभ झाल्यामुळे आपणांला भ्रम झाला आहे खास !

माधव—मी चांगला शुद्धीवर आहें, असें माझ्या साक्षीवरून आपल्या नजरेस येईल ! विलंब लावूं नये !

न्यायाधीश—ठीक आहे.

माधव--माझी साक्ष आपणांला आणि पंचांना खरी वाटावी, म्हणून मला प्रथम शपथ घेतली पाहिजे. पण माझ्या खरेपणाचें शपथेपेक्षाहि बिनतोड प्रमाण मी आपणांपुढे मांडतों. म्हणजे शपथेचें कांही कारण राहणार नाही. (खिशांतून कुपी काढून तिच्यांतील विष पितो.)

पद्माकर—अरे, कोणी याच्या हातून ती कुपी हिसकावून घ्या ! त्याने कुपी सबंधच्या सबंध रिकामी केली ! माधव, काय केलेंस हें ?

माधव—जिगीषु सेनानायक नौका जाळून पळपुट्या सैनिकांच्या पलायनाचा मार्ग बंद करितो आणि या रीतीने त्यांना जिवावर उदार होऊन निकराने लढायला लावितो, त्याप्रमाणे मीहि प्राणांच्या लोभाने खोटें बोलण्याचा मोह पडूं नये, म्हणून हा मार्ग स्वीकारिला आहे ! मानवी न्यायासनासमोर मी कदाचित् खोटें बोलेन. पण दोन घटकांत ईश्वरी न्यायासनासमोर उभा राहणारा इसम खोटें बोलूं शकतच नाही ! माझ्या साक्षींत कायदेशीर औपचारिक विघ्नें न येतां माझ्या गुन्ह्याला तावडतोब योग्य शिक्षा मिळावी हाहि या विषप्राशनाचा एक हेतु आहे !

न्यायाधीश—काय विषप्राशन !

पद्माकर--होय, महाराज. माझ्या मित्राने भयंकर विष घेतलें आहे ! या विषावर उतारा नाही !

न्यायाधीश—शिपाई, तावडतोब डॉक्टरला घेऊन ये !

माधव—महाराज, आरोपीपेक्षा विद्वान डॉक्टर कोण असणार आहे ? त्याने आपला निर्णय दिला आहे ! तेव्हा आता माझ्या प्रकृतीच्या विवेचनेंत साक्षीचा अमोल वेळ दवडूं नये. खऱ्या अपराध्याचा प्राण वाचविण्याच्या निष्फळ प्रयत्नांत

निर्दोष आरोपीचा मात्र विनाकारण प्राण जाईल! (न्यायाधीश लिहूं लागतो.) माझें नांव आपणांला माहीत आहेच. तेव्हा मुद्द्याचा मजकूरच एकदम सांगून टाकतो! महाराज, मृत रंगनाथाचा खून आरोपीने केला नाही, किंवा पद्माबाईंनीहि केला नाही. त्याचा वध या हाताने झाला आहे!

पद्माकर--अशक्य! अगदी अशक्य!

माधव—मघाशीं आरोपीच्या वकिलांनी पद्माबाईंची साक्ष घेतांना खुनी माणसाच्या आकृतीशीं न्यायसभेतील कोणत्या मनुष्याच्या आकृतीशीं साम्य आहे असें विचारिलें असतां त्यांनी मजकडे बोट दाखविलें, तेव्हा आपण पर्यायाने खुनी मनुष्यालाच नेमकें दाखवीत आहोंत, असें त्यांना मुळीच वाटलें नाही. रस्त्यावरील लाकडी मार्गदर्शिकांचा अंगुलिनिर्देश जितका निर्हेतुक असतो, तितका त्यांचाहि होता! पण तो तितकाच अचूकहि होता!

न्यायाधीश—आप्पासाहेब, आपल्यासारख्या संभावित मनुष्याने विनाकारण मनुष्यवध करणें शक्य दिसत नाही!

माधव--विनाकारण केला नाही. स्वसंरक्षणार्थ केला!

न्यायाधीश—स्वसंरक्षणार्थ केला असेल, तर तो गुन्हा होत नाही.

माधव--पण तो स्वसंरक्षणार्थ होता, असें मी शाबीत कसें करूं शकणार? खुनाच्या जागेजवळच पद्माबाई होत्या, पण त्या बेशुद्ध अवस्थेत होत्या! पुराव्याच्या अभावीं मला निदान जन्मठेपेची तरी शिक्षा झाली असती! आणि, ती तर मरणाहून भयंकर. तेव्हा मला स्वतःलाच मृत्यूची शिक्षा सुनावून ती तावडतोब अमलांतहि आणावी लागली. पण महाराज, माझ्या सर्वांगाला कापरें सुटलें आहे! उभें देखील राहवत नाही! माझी साक्ष लौकर उरका!

न्यायाधीश—(शिपायास) यांना बसायला खुर्ची दे. (शिपाई खुर्ची आणून ठेवितो. माधव तिजवर बसतो.) आप्पासाहेब, आत्मसंरक्षण करण्याचा तुमच्यावर प्रसंग तरी कसा आला?

माधव—मयताने एका सुशील कुमारिकेला लग्नाचें वचन दिलें होतें. पण तें पार पाडण्याची तो टाळाटाळ करूं लागला! अखेरीस मी त्याला मृत्युपत्राने माझी सारी जिनगी देण्याचें कबूल केल्यावर तो लग्नाला कबूल झाला. पण लग्न करून स्वतःस गुंतविण्यापेक्षा माझा खून करून तावडतोबच ती जिनगी मिळविण्याचा त्याला मोह पडला! आणि त्या मोहाच्या भरांत ती गुप्ती तो अंगांत भोसकणार हें पाहून मला बचावासाठी धडपड करावी लागली! आणि त्या धडपडींतच त्याचा वध झाला! मी त्याला दाखविण्याकरितां बरोबर मृत्युपत्राची नक्कल नेली होती. तिजवर त्याने सही व तारीख घातली होती. ही पहा ती नक्कल. इजवरील सही व आकडे मयताच्या बॅगमध्ये सापडलेल्या टिपण वहींतल्या अक्षरांशीं व आकड्यांशीं जुळतात की नाही हें आपणांस पाहतां येईल. महाराज, माझ्या तोंडाला कोरड पडली आहे. बोलतां येत नाही.

न्यायाधीश—त्या कुमारिकेचें नांव सांगतां येईल का?

माधव—कृपाकरून तिचें नांव मजकडून वदवूं नका.

न्यायाधीश—आपल्या स्नेह्याची प्रियकरीण पद्माबाईच असावी ती. पण मी नांव सांगण्याचा आपणांला आग्रह करीत नाही. (शिपायास) एक पाण्याचा पेला घेऊन ये लौकर आणि यांना दे. (शिपाई पडद्यांत जाऊन पेला आणतो व माधवापुढे ठेवतो. सरकारी वकिलास) आपणांस उलट तपासणी करायची आहे?

सरकारी वकील--अशा निर्वाणीच्या प्रसंगीं माझ्या व्यवसायबंधूचे हाल करणें निर्दयपणाचें होईल!

न्यायाधीश--ठीक आहे तर. आप्पासाहेब, हा कागद वाचून त्यावर सही करा. (माधव सही करितो.) आप्पासाहेब, आपली जबानी संपली!

माधव--मी गुन्हेगार म्हणून अटकेंतच राहिलें पाहिजे. तेव्हा आपण येथेच एखादी जवळची कोठडी माझ्या उपयोगासाठी दिली, तर

अनुक्रमणिका

मला माझे निर्वाणीचे क्षण माझ्या पत्नीच्या सहवासांत घालवितां येतील. आरोपीची सुटका झाली, तर त्याच्याहि समागमाचा लाभ होऊन माझा अंतकाल सुखाचा जाईल !

न्यायाधीश--तशी व्यवस्था तावडतोब होईल. (शिपायाच्या कानांत सांगतो. शिपाई जातो.) आता आपण खुशाल जावें. आपल्या कुटुंबाची या करुण प्रसंगीं फारच शोचनीय स्थिति झाली आहे ! आपणांला आणि त्यांना बाहेर नेण्याला आपले नोकर आहेत ना ? (कृष्णा व राधा पुढे येतात.) आप्पासाहेब, पुढे आलेल्या पुराव्यावरून पंचांना निर्णय द्यायला वेळ लागेलसें दिसत नाही. आपण समाधानाने जा. डॉक्टरसाहेबहि आपणांला लौकरच भेटतील. आपण जर विषसेवन केलें नसतें, तर न्यायदेवतेने आपणांला निर्दोषीच ठरविलें असतें ! पण आता आपला न्याय मानवी न्यायासनासमोरून ईश्वरी न्यायासनासमोर गेला आहे. तेव्हा आता आमचा निरुपाय आहे !

माधव—आपले फार उपकार झाले. ईश्वर आपलें कल्याण करील. (माधव कृष्णाच्या हाताचा आधार घेत पडद्यांत जातो. मागाहून ललिता राधेच्या हातावर टेकत स्फुंदत स्फुंदत पडद्यांत जाते. न्यायाधीश पंचांच्या कानांत कुजबुजतो. पंच आंत जातात. पडदा पडतो.)

प्रवेश ४ था

(शिपाई बिछाईत घालतात व एक आरामखुर्ची आणून ठेवितात व निघून जातात. माधव कृष्णाच्या हाताचा व ललिता राधेच्या हाताचा आधार घेत प्रवेश करितात. कृष्णा माधवास आरामखुर्चीवर बसवितो. ललिता त्याच्या पायाशीं बसते.)

कृष्णा—ताईसाहेब, आम्ही दोघें बाहेर दाराशींच बसतों. कांही लागलें की बोलवावें. (ललिता मान हलविते. कृष्णा व राधा जातात.)

ललिता—माधव, तुझा आत्महत्येचा बेत माझ्यापासून चोरून ठेवून तूं मला फसविलेंस. तूं तोंडाने कांही म्हटलेंस, तरी उलटतपासणींत माझ्या रहस्याचें रक्षण होऊन मला पुन्हा लग्न करण्याची मोकळीक राहावी, हाच तुझ्या उदार आत्मसमर्पणाचा हेतु होता. असें कपट करणें तुला शोभतें का ?

माधव—ललिते, मी सचोटीने वागून तुला दवडून बसलों आणि कपटाने वागून मला तुझ्या उपयोगीं पडतां आलें. मग मी कपटाचा आश्रय केला, यांत वावगें काय केलें ?

ललिता—माधव, तुझ्या औदार्याचा फायदा घेऊन मी पुन्हा लग्नाला तयार होईन, असें तुला वाटलें तरी कसें ? ज्या माझ्या लज्जेचें तूं इतका भयंकर आत्मयज्ञ करून रक्षण केलेंस, त्या लज्जेवर तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाचा हक्क असणार ? आणि, असा प्रेमळ पति गेल्यावर माझ्यासारखी निग्रही पत्नी दुसरा पति तरी कशी करणार ?

माधव—माझ्यावर भगिनीतुल्य प्रेम करणारी ललिताच का हें बोलत आहे ?

ललिता—माधव माझी चूक झाली. माझें तुझ्यावर नेहमीं स्त्री प्रेमच होतें. तूं मला पहिल्याने मागणी घातलीस, त्या वेळीं त्याचें स्वरूप मला माहीत नव्हतें आणि म्हणून माझ्या हृदयाच्या आंतल्या गाभ्यांत लपलेलें त्याचें बीज मला दिसलें नाही. त्या बीजाचा आज एका दिवसांत तुझ्या स्वार्थत्यागाच्या जादूने प्रचंड वृक्ष झाला आहे !

माधव—ललिते, मी ऐकतों हें खरें का ? तुझें माझ्यावर वल्लभेचं-पत्नीचें-प्रेम ?

ललिता—माधव, आजपर्यंत तरी मी तुला कधींच फसविलें नाही. मी स्वतःलाच फसवीत होतें ! त्यांच्या मायावी उपकाराच्या मोहिनीने मला भुरळ घातली होती ! आज तुझ्या आत्मयज्ञाने माझ्या हृदयाला विजेचा धक्का देऊन माझे डोळे उघडले आणि माझें स्त्रीप्रेम पूर्वावस्थेंत माझ्या दृष्टीला पाडिलें !

माधव—ललिते, तूं माझ्या अंतसमयीं मला खोटें स्त्रीप्रेम दाखविलें असतेंस, तरी माझें समाधान झालें असतें ! मग या खऱ्या प्रेमाने मी

आनंदगिरीचें शिखर गाठलें, तर नवल काय ? प्रत्येक शब्दांत खऱ्या नाण्याचा नाद निघत आहे. तेव्हा तुझें म्हणणें मी खोटें कसें समजूं ?

ललिता--माधव, माझें प्रेम अंतःकरणापासून आहे. पण तें कळून येण्याकरितां तुला व मला किती तरी भारी मोल द्यावें लागलें !

माधव--ललिते, तें प्रेम तितक्याच योग्यतेचें आहे. प्राणाचें मोल देऊनहि तें प्रेम मिळेल अशी मला आशा नव्हती ! पण त्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार मला होत आहे ! या अखेरच्या क्षणांत एका दीर्घ आयुष्याचें सुख साठविलेलें आहे.

ललिता--माझें हें प्रेम मला अगोदर कळलें असतें, तर हा दुःखाचा दिवस कशाला उगवला असता ? पण अदृष्टांत लिहिलेल्या गोष्टी चुकणार कशा ? माझें प्रेम मला कळून चुकण्यापूर्वीच त्याचा आधार नाहीसा झाला !

माधव—आणि, माझ्या सुखाचा झरा वाहूं लागण्यापूर्वीच आटून गेला ! हरहर !

ललिता—माधव, असा शोक करून माझें दुःख दुणावूं नकोस !

माधव—ललिते, मी चुकलों ! तुझे प्रेमाचे शब्द मला आयुष्याच्या अखेरीस तरी ऐकायला मिळत आहेत, हें काय कमी भाग्य आहे ? ललिते, बोल, तुझे प्रेमळ आणि मंजुळ शब्द मला अधाशी कानांनी ऐकूं दे. हे शब्द ऐकण्याकरितां माझे कान किती दिवस तरी तान्हेलेले होते ! आता मरेपर्यंत तेच माझ्या कानांत घुमत राहूं दे !

ललिता—आणि, नुसत्या शब्दांवरच तुझी तहान भागेल का माधव ?

माधव—तुझ्या शब्दांनी माझ्या कानांची तृप्ति होत आहे, त्याप्रमाणे तुझ्या मनोहर मूर्तीने माझ्या डोळ्यांचीहि होत आहे. ललिते, तुझ्या अंगाच्या सुवासाने माझ्या घ्राणेंद्रियाचीहि तृप्ति होऊं दे !

ललिता—यापलीकडचें सुख देण्याचें माझ्या नशीबीं नाहीच का माधव ? तुझें अंग विषाने कसें भाजत असेल ! त्याला स्पर्श करून शांत करण्याचें पुण्य तूं मला मिळूं देणार नाहीस का ?

माधव—ललिते, या क्षणापर्यंत कठोरपणें प्रतिज्ञा पाळून या क्षणींच तिचा भंग करणें बरें होईल का ? पण तूं हिरमुसली होत असलीस, तर त्यालाहि माझी तयारी आहे !

ललिता—माधव, प्रतिज्ञाभंगाचें पाप मी तुझ्या शिरावर न देतां स्वतःच्याच शिरावर घेतें ! मीच तुला स्पर्श करितें, म्हणजे त्याचें पाप तुझ्या माथीं राहणार नाही. माझ्या अश्रूंनी तुझे पाय भिजविण्याला मी कशी आतुर झालें आहें. आता मला नाहीच राहवत ! (माधवाचे पाय धरिते व त्यावर डोकें टेकते.) माधव, माझ्या साऱ्या अपराधांबद्दल मला क्षमा कर ! तुला प्रतिज्ञाभंग करायला लाविला, हें माझें सर्वांत घोर आणि अखेरचें पाप आहे ! पण तें केवळ मोहामुळे मजकडून घडलें !

माधव—तुला त्याबद्दल खंत वाटूं देऊं नकोस. मी तुला स्पर्श करणार नाही व केलाच, तर तो क्षण माझ्या आयुष्यांतील शेवटचा, अशी माझी प्रतिज्ञा होती, ती मजकडून अक्षरशः पार पडत आहे !

ललिता—नाही, हा क्षण तुझा अखेरचा होणार नाही ! घाबरूं नकोस, माधव, ही ललिता तुझ्या पायाशीं बसली असतां प्रत्यक्ष यमधर्मालाहि तुला स्पर्श करण्याचें धैर्य होणार नाही ! मी आपलें सगळें बळ एकवटून तुझ्या प्राणांना रोखून धरीन. तुला स्पर्श करण्याची मोकळीक तूं मला उदारपणाने दिलीच आहेस. तेव्हा तुला प्रेमालिंगन देऊन तुझा देह मी अमर करीन ! तुझ्या मुखावाटे अधरामृताची संजीवनी ओतून तुझा प्राणदीप प्रज्वलित करीन.

माधव—खरोखरच, ललिते, तुझा स्पर्श होतांच माझ्या शरीरांत नवा जोम आला आहे ! माझी जीभ कोरडी पडली होती, तिला ओलावा आला आहे ! वाचेला जडत्व आलें होतें, ती आता तरळ झाली आहे ! दृष्टीला मांद्य आलें होतें, ती सतेज झाली आहे ! अंग बधिर पडत चाललें होतें, त्यांत चैतन्य खेळूं लागलें आहे !

विषाने शंकराचा दाह होऊं लागतांच त्याला त्याचें शमन करण्याकरितां गंगा, चंद्र, सर्प, रामनाम असें चोहोंकडून विविध साहित्य गोळा करावें लागलें, पण मला एकट्या तुझ्याच आधाराने माझ्या विषाचा दाह शांत करून घेतां येईल ! तूं आपल्या शीतल दृष्टीचा ओघ माझ्या मस्तकावर वळविलास की, गंगेची काय जरूर ? तुझा मुखचंद्र माझ्या कपाळावर ठेविलास, म्हणजे निराळा चंद्र कशाला पाहिजे ? आणि, तुझी सर्पाकार वेणी माझ्या गळ्यांत घालून तुझा अधर माझ्या ओठावर ठेविलास, म्हणजे सर्पाची आणि रामनामामृताची उणीव तरी कुठून भासणार ! अयाई ! (तळमळूं लागतो)

ललिता—माधव, काय झालें तुला एकाएकीं !

माधव—पुन्हा अंगाचा भडका होऊं लागला आहे ! आणि कपाळाला तिडका लागल्या आहेत !

ललिता—माझा हात ठेवूं का कपाळावर ?

माधव—ठेव. (ललिता माधवाच्या कपाळावर हात ठेविते) आता जरा बरें वाटूं लागलें. पण ललिते, तुझ्या स्पर्शाने वाटणारा आनंद क्षणिक आहे ! माझी प्राणज्योति आता स्नेहाने प्रज्वलित होणाऱ्या दिव्याप्रमाणे नसून जातां जातां मोठा होणाऱ्या दिव्याप्रमाणे आहे ! मला आता हें स्वर्गसुख सोडून सुखहीन स्वर्गाला जाण्याची तयारी केली पाहिजे !

ललिता—हाय, हाय ! माधव, जाणारच ना तूं ? माझ्या स्निग्ध चुंबनाचा वर्षाव करून मला तुझी प्राणज्योति तेवत ठेवितां येणार नाही का ? तुझ्याप्रमाणे माझ्याहि ओठांना तहान लागली आहे रे ! अमृताचा पेला कायमचा दूर होत असतांना सुद्धा मी तो ओठांना लावूं नको का ?

माधव—ललिते, तुझ्या ओठांना अमृत आहे, पण माझे ओठ विषाने भरलेले आहेत, म्हणून तें इष्ट नाही !

ललिता—मग तर मी ओठ लावणारच !

माधव—नाही, नाही. माझ्या प्रियमित्राची सुटका होईपर्यंत आपण आपल्या ओठांच्या दीर्घ उपोषणाचें पारणें फेडणें योग्य होणार नाही !

ललिता—निदान माझ्या तोंडावरून हात तरी फिरीव.

माधव—(ललितेच्या तोंडावरून हात फिरवीत) ललिते, मी आजपर्यंत शक्य तितकें तुझ्या सुखाला जपलों. माझ्या पाठीमागे तुझी काय स्थिति होईल, याची काळजी वाटून माझा जीव घाबरा होतो आहे !

ललिता—माझी काळजी मुळीच वाटूं नकोस. तुझ्या सद्गुणांचें अनुकरण करीत मी उरलेलें आयुष्य आनंदाने घालवीन. छे, छे ! आनंद मला कायमचा पारखा झाला ! तूं मला एकटीला दुःखांत टाकून माझा सारा आनंद बरोबर घेऊन जाणार !

माधव—तूं येथे एकटी असतां मला तरी तेथे आनंद कुठचा मिळणार ? ललिते, तुला फार दिवस एकलकोंडें राहण्याचें कारण नाही. अपत्य-जन्मानंतर तुझा आनंद परत येईल !

ललिता—माधव, मला तुझ्यापाशीं एक अखेरचें मागणें करायचें आहे. पण तें केलें तर तुझ्या सौजन्याचा अंतच पाहिल्यासारखें होईल. म्हणून मला भीति वाटते !

माधव—ललिते, तुझ्या आणि माझ्या आत्म्यांचें ऐक्य झाल्यावर भीति ? बोल, बोल, लवकर.

ललिता—तुझ्यावरील अनर्थाला माझें बाळच कारण झालें !

माधव—छे, त्या अजाण अर्भकाने काय अपराध केला आहे ?

ललिता—मग त्याला तूं आशीर्वाद देशील का ?

माधव—माझ्या ललितेच्या बाळाला मी कसा आशीर्वाद देणार नाही ? तें पूर्ण सद्गुणी निपजावें, ही माझी अखेरची इच्छा आहे. आणि, ती ईश्वर पूर्ण करीलच करील !

ललिता—मला त्याच नांव माधव ठेवितां आलें असतें, तर तो सद्गुणी निपजण्याबद्दल निर्वाळा देतां आला असता !

माधव—त्याला माझें किंवा तुझें नांव ठेवितां आलें नाही, तरी तें आपल्या घराण्याचें नांव धारण करणार आहे आणि तें नांव त्याला

सद्गुणाच्या मार्गावर ठेवण्याला पूर्णपणें समर्थ आहे. गडे ललिते, तूं माझ्या प्रतिज्ञेचा भंग केलास, तसा तुला स्वतःच्या प्रतिज्ञेचा करायला नको का ?

ललिता—मी अशी कोणती घोर प्रतिज्ञा केली होती, की तिचा भंग करण्याचें माझ्या जिवावर यावें ?

माधव—तूं विसरतेस बाबासाहेबांच्या मृत्युपत्रांतील लाख रुपयांना स्पर्श न करण्याची तूं प्रतिज्ञा केली होतीस ना ? मी आज नवें मृत्युपत्र केलें आहे, आणि त्याने ते रुपये माझ्या इतर मिळकतीसह तुला दिले आहेत.

ललिता--अशा अमोल वेळीं किती क्षुद्र गोष्ट काढलीस, माधव ? पण तुझें समाधान होत असेल, तर मी ते रुपये स्वीकारण्याचें कबूल करितें ! ते पापाच्या छायेने दूषित झाले होते, पण तुझ्या हस्तस्पर्शाने ते पुन्हा पावन झाले आहेत. तेव्हा त्यांचा स्वीकार करण्याला मला संकोच कां वाटावा ? माधव, तुला शोभेल असाच मी त्यांचा सदुपयोग करीन.

माधव--पण नुसत्या द्रव्याने तुझ्या सुखाची निश्चिंती कशी होणार ? तुझ्या कल्याणाची माझ्या-इतकी चिंता कोण वाहील ? पण माझा पद्माकर तुझी काळजी घ्यायला असल्यावर मला चिंता तरी कां वाटावी ? काय ? त्याच्या खटल्याचा अजून निकाल लागत नाही ? पद्माकराच्या सुटकेकरिता माझे प्राण खोळंबून राहिले आहेत. (पद्माकर व पद्मा प्रवेश करितात.) पद्माकर, तुझीच काय ती खोटी होती. सुटलास ना एकदाचा ?

पद्माकर—होय. तूं माझ्या सुटकेकरिता स्वतःचा होम केलास, म्हणून सुटलों ! माधव, मी बंधनांतून सुटलों, पण तूं मात्र आम्हां सर्वांचे प्रेम-पाश तोडून जात आहेस ! (डोळ्यांस पदर लावितो.)

माधव—पद्माकर, माझ्यासाठी शोक करूं नकोस. मी आनंदाने मरत आहें ! ललितेने मला अखेरीस स्त्रीप्रेम अर्पण करून माझा अंतकाल सुखाचा केला आहे. पण तिच्या भवितव्याची मला फार चिंता लागली आहे, आणि त्यामुळे हा प्राण कंठाशीं घुटमळतो.

पद्माकर--तूं तिची मुळीच काळजी करूं नकोस. मी आणि माझी अर्धांगी तिची पूर्ण काळजी घेऊं !

माधव—पद्माबाई तुझ्या अर्धांगी ?

पद्माकर—हिने माझ्यासाठी आपला प्राण आणि अब्रू संकटांत घालून हा देह विकतच घेतला आहे !

माधव--मला हें ऐकून फार समाधान वाटलें ! आता ललितेला दोन पाठिराखे मिळाले ! पद्माकर, पद्माबाई, चाललों ! ललिते, चाललों ! राम—! (मरतो. इतर सर्वजण शोक करितात. पडदा पडतो.)

संपूर्ण

अनुक्रमणिका

संपादकीय

(लेखन ता. २३ आक्टोबर १९३६)

युगवाणीचा हा जून–जुलै–आगस्ट महिन्यांचा तिजोड अंक वाचकांच्या हातीं देण्यांत येत आहे. हा अंक विलंबाने बाहेर पडत आहे, पण त्याला अगदी निरुपाय होता. 'युगवाणी' सुरू होण्यास व छापखान्यांतील अडचणी वाढत जाण्यास एकच गाठ पडली! यामुळे त्या त्या अंकाच्या मजकुराची सर्व सिद्धता होऊनहि तो तो अंक प्रसिद्ध होण्यास विलंबच होत गेला! अंक काढण्याची आम्ही सारे जण दर वेळीं शिकस्त करीत असतों. पण छापखान्यांतील संपासारख्या वारंवार उद्भवणाऱ्या अडचणींपुढे आम्हांस हात टेकावे लागत आहेत! होत आहे तेंच कार्य पुष्कळ आहे, असें म्हणून समाधान मानून घेण्यापलीकडे तूर्त कांहीहि करतां येत नाही!

छापखान्यांतील संपामुळेच 'युगवाणी'चा दिवाळी-अंक प्रसिद्ध होण्यास विलंब होत आहे. तो नोव्हेंबरच्या दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यांत बाहेर पडेल, अशी अपेक्षा आहे.

'मायाविवाह' नाटक

'युगवाणी'चे मागारलेले अंक पुरे करण्यासाठी हा तिजोड अंक काढावा लागत आहे, हें तर खरेंच. परंतु तो काढण्याचें दुसरें मुख्य कारण हें होय की, या अंकांत साहित्यसम्राट् कै. **श्रीपाद कृष्ण कोल्हटकर** यांचें 'मायाविवाह' हें नाटक संपूर्ण देण्याचें ठरलें होतें. तें चार–दोन अंकांतून क्रमशः देण्यापेक्षा एकाच अंकांत संपूर्ण देणें सोईचें असल्यामुळे हा तिजोड अंक काढणें मुख्यतः प्राप्त झालें. वाचकांच्या पदरांत त्या दिवंगत साहित्यसम्राटाची अखेरची ललितकृति पूर्णपणें पडत आहे, हें लक्ष्यांत घेतल्यास, या तिजोड अंकाबद्दल त्यांची नाराजी होणार नाही अशी खात्री आहे.

कै. श्री. कृ. कोल्हटकर यांचें मराठी साहित्यांत काय स्थान आहे, हें मीं नव्याने सांगावयास नको. 'साहित्यसम्राट्' ही पदवी अलीकडे रा. न. चिं. केळकर यांस लावण्यांत येत असली, तथापि ती प्रथम कोल्हटकरांनाच लावण्यांत आली होती, ही एकच गोष्ट त्यांच्या अत्युच्च योग्यतेची साक्ष देण्यास पुरेशी आहे. अशा महान् सरस्वती-पुत्राचें 'माया विवाह' हें अखेरचें नाट्यापत्य होय. कोल्हटकर दिवंगत होऊन एक तप लोटलें असतांहि 'माया विवाह' प्रसिद्ध होऊं नये, हें मला ठीक वाटलें नाही. म्हणून त्यांचे चिरंजीव व प्रसिद्ध लेखक, माझे मित्र रा. प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर यांस मीं हें नाटक 'युगवाणीं'त प्रसिद्ध करण्याची परवानगी विचारली. आणि, त्यांनीहि ती निरपेक्षपणें दिली, याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. साहित्यसम्राटांच्या थोडेंफार सहवासांत येण्याचें सद्भाग्य मला प्राप्त झालें होतें व लेखनांत उत्तेजन वगैरे देऊन त्यांनी मजवर अपार ऋण करून ठेवलें आहे. 'माया विवाह' नाटक 'युगवाणीं'तून प्रसिद्ध करून तद्द्वारा साहित्यसम्राटांविषयीं कृतज्ञताबुद्धि जाहीर रीत्या व्यक्त करण्याची सुसंधि मला मिळाली, याबद्दल वाटणारें समाधान येथे नमूद केल्यावाचून राहवत नाही! 'युगवाणीं'त साहित्यसम्राटांची नाट्यकृति प्रसिद्ध होत असल्यामुळे 'युगवाणी'ला एक प्रकारनें महत्त्व प्राप्त होत आहे, हें उघड आहे.

'मायाविवाहा'चे सर्व प्रकारचे हक्क रा. प्र. श्री. कोल्हटकर यांजकडे आहेत.

येथे एका गोष्टीचा उल्लेख करणें अप्रासंगिक होणार नाही. मुंबई-साहित्य-संघाने 'मायाविवाह' नाटकाचा कांही वर्षांपूर्वी संगीत प्रयोग केला होता. प्रयोगांतील पदें अर्थातच कोल्हटकरांचीं नव्हतीं. नाटकाचें संविधानक व हीं पदें संघाच्या त्या वेळच्या 'वीणा' नामक नियतकालिकांत प्रसिद्ध करण्यांत आलीं होतीं. खुद्द कोल्हटकरांना हें नाटक संगीत करावयाचें होतें. पण त्यांच्या हातून पदें लिहिलीं गेलीं नाहीत!

'मायाविवाहां'त कोल्हटकरांच्या प्रतिभेचें तेज पहिल्यासारखें झळकत नसलें, तथापि रंगभूमीवर त्याचे प्रयोग होण्यास हरकत नाही, एवढें येथे सुचवून ठेवतों.

प्रांतांतील परिषदा

प्राच्य-विद्या-परिषदेचें तेरावें अधिवेशन नागपूर येथे १९, २० व २१ आक्टोबर रोजीं यशस्वितेने पार पडलें. परिषदेचे सर्वसाधारण अध्यक्ष विद्वद्वर्य म. म. पां. वा. काणे हे होते.

अनुक्रमणिका

परिषदेचे इतर अनेक विभाग असून त्यांचे निर-निराळे अध्यक्ष नियुक्त करण्यांत आले होते. मराठी विभागाचे अध्यक्ष प्रा. कृ. पां. कुळकर्णी हे होते. या सर्व अध्यक्षांचीं भाषणें त्यांच्या लौकिकास साजेशीं अशींच झालीं.

परिषदेंत ऐतिहासिक वस्तूंचें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें, तें प्रेक्षणीय होतें.

परिषदेला सर्व धर्मांचे व सर्व प्रांतांचे विद्वान् उपस्थित होते. धर्म, जात व प्रांत यांच्या वरून कलह माजविण्याच्या या दिवसांत निदान ज्ञानाचें क्षेत्र तरी या सर्व प्रकारच्या संकुचितपणापासून अलिप्त आहे, असा देखावा या परिषदेंत दिसून आला ! हा व्यापक दृष्टिकोन राजकारणादि इतर क्षेत्रांत कधी प्रत्ययास येणार ?

याच वेळीं पंडितपरिषद् म. म. कृष्ण शास्त्री घुले यांच्या अध्यक्षत्वाखाली नागपुरास पार पडली.

वरील दोन परिषदा नागपुरास झाल्या, तर अखिल भारतीय शारीरिक-शिक्षण-परिषदेचें पहिलें अधिवेशन उमरावती येथे नामदार शरच्चंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वितेने मागील आठवड्यांत पार पडलें. या परिषदेचा जगड्व्याळ व्याप लक्षांत घेतां ती यशस्वी करण्यास केवढें संघटनाकौशल्य लागलें असेल, याची कल्पनाच केलेली बरी ! हें कौशल्य माझे मित्र रा. हरिहरराव देशपांडे व त्यांचे सहकारी यांनी दाखविलें, याबद्दल त्यांची तारीफ करावी तितकी थोडीच आहे !

आक्रमणशील शक्तीपुढे अध्यात्म, विद्वत्ता कला वगैरे गोष्टी लटक्या पडतात, हा अनुभव हिंदुस्थानला गेल्या दीड-दोन हजार वर्षांपासून येत आहे; आणि, पूर्व बंगालमधील सध्या चालू असणारे अमानुष अत्याचार याच सिद्धांताची प्रचीती आणून देत आहेत ! हें सारें उघड्या डोळ्यांनी पाहूनहि जर आपण बलाची उपासना— व त्याचबरोबर संघटना—न केली, तर आपला सर्वनाश फारसा दूर नाही, हें सांगण्यास भविष्यवाद्याची आवश्यकता खचित नाही ! नागपुरची प्राच्य-विद्या-परिषद् ११ आक्टोबरला सुरू झाली व उमरावतीची शारीरिक-शिक्षण-परिषद् १३ आक्टोबरला सुरू झाली. यावरून उमरावतीची शारीरिक-शिक्षण-परिषद् सहा दिवसांनी नागपुरास भरणाऱ्या प्राच्य-विद्या-परिषदेला, जणू काय, असा इशारा देत असल्याचा भास होतो, कीं "विद्वज्जन हो ! केवळ विद्वत्तेने तुम्ही या निर्घृण जगांत जगण्यास पात्र होऊं शकत नाही ! शारदेच्या उपासनेबरोबरच शक्तीचीहि उपासना करा ! तरच तुमची धडगत आहे !"— एकंदरीने प्राच्य-विद्या-परिषदेपूर्वी शारीरिक-शिक्षण-परिषद् भरविण्यांत उमरावतीकरांनी मोठीच मार्मिकता दर्शविली, असें मला म्हणावेंसें वाटतें !

हें मासिक रा. तु. मा. पाटील यांनी श्री० ह. व्या. प्र. मंडळाच्या सरस्वती मुद्रणालयांत छापलें व प्रा० ना. कृ. दिवाणजी, एम्. ए., सरचिटणीस विदर्भ साहित्य संघ, यांनी अमरावती येथे संघाच्या कार्यालयांत प्रसिद्ध केलें.